# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**मा. विशेष महासभा दि. ०३/११/२०१८**

आज शनिवार दि. ०३/११/२०१८ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ०६ दि. ३०/१०/२०१८ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

### उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | डिम्पल विनोद मेहता | महापौर |
| २) | चंद्रकांत सिताराम वैती | उपमहापौर |
| ३) | व्यास रवि वासुदेव | सभापती, स्थायी सामिती |
| ४) | पाटील रोहिदास शंकर | सभागृह नेता |
| ५) | भोईर सुनिता शशिकांत | सदस्या |
| ६) | शाह रिटा सुभाष | सदस्या |
| ७) | तिवारी अशोक सूर्यदेव | सदस्य |
| ८) | पांडेय पंकज सूर्यमणि | सदस्य |
| ९) | गोहिल शानू जोरावर सिंह | सदस्या |
| १०) | कांगणे मीना यशवंत | सदस्या |
| ११) | सिंह मदन उदितनारायण | सदस्य |
| १२) | शेट्टी गणेश गोपाळ | सदस्य |
| १३) | भोईर गणेश गजानन | सदस्य |
| १४) | पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| १५) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| १६) | रावल मेघना दिपक | सदस्या |
| १७) | शाह राकेश रतिशचंद्र | सदस्य |
| १८) | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | सदस्य |
| १९) | धृवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| २०) | जैन गीता भरत | सदस्या |
| २१) | जैन राजेंद्र भवरलाल | सदस्य |
| २२) | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | सदस्या |
| २३) | मोकाशी दिपाली आनंदराव | सदस्या |
| २४) | रकवी वैशाली गजेंद्र | सदस्य |
| २५) | अग्रवाल सुशील गोपीकिशन | सदस्य |
| २६) | परदेशी गिता हरीश | सदस्या |
| २७) | पाटील नरेश तुकाराम | सदस्य |
| २८) | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | सदस्या |
| २९) | शेट्टी अरविंद आनंद | सदस्य |
| ३०) | गेहलोत हसमुख मोहनलाल | सदस्य |
| ३१) | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | सदस्या |
| ३२) | थेराडे संजय अनंत | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ३३) | मुखर्जी अनिता बबलू | सदस्या |
| ३४) | हसनाळे ज्योत्सना जालींदर | सदस्या |
| ३५) | पारधी सुजाता यशवंत | सदस्या |
| ३६) | म्हात्रे सचिन केसरीनाथ | सदस्य |
| ३७) | यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ३८) | म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ३९) | सोनार सुरेखा प्रकाश | सदस्या |
| ४०) | भोईर विणा सुर्यकांत | सदस्या |
| ४१) | म्हात्रे परशुराम पदमाकर | सदस्य |
| ४२) | मांजरेकर आनंद दत्ताराम | सदस्य |
| ४३) | बेलानी हेमा राजेश | सदस्या |
| ४४) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सदस्य |
| ४५) | गजरे दौलत तुकाराम | सदस्य |
| ४६) | नाईक विविता विवेक | सदस्या |
| ४७) | सोंस नीला बर्नाड | सदस्या |
| ४८) | राय विजयकुमार सिस्थन नारायण | सदस्य |
| ४९) | शेख रुबीना फिरोझ | सदस्या |
| ५०) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ५१) | सावंत अनिल दिवाकर | सदस्य |
| ५२) | मेहरा राजीव ओमप्रकाश | सदस्य |
| ५३) | परमार हेतल रतिलाल | सदस्या |
| ५४) | जैन दिनेश तेजराज | सदस्य |
| ५५) | भावसार वंदना संजय | सदस्या |
| ५६) | शाह सीमाबेन कमलेश | सदस्या |
| ५७) | दुबे मनोज रामनारायण | सदस्य |
| ५८) | विराणी अनिल रावजीभाई | सदस्य |
| ५९) | सपार उमा विश्वनाथ | सदस्या |
| ६०) | अहमद साराह अकरम | सदस्या |
| ६१) | इनामदार जुबेर अब्दुल्ला | सदस्य |
| ६२) | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | सदस्य |
| ६३) | भोईर जयेश भानुदास | सदस्य |
| ६४) | म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| ६५) | भानुशाली वर्षा गिरधर | सदस्या |
| ६६) | म्हात्रे विनोद काशिनाथ | सदस्य |

गैरहजर सदस्य -

| | | |
|---|---|---|
| १) | भोईर राजू यशवंत | विरोधी पक्षनेता |
| २) | ढवण निलम हरीश्चंद्र | सदस्या |
| ३) | कदम अर्चना अरुण | सदस्या |
| ४) | नलावडे दिनेश दगडु | सदस्य |
| ५) | गुप्ता कुसुम संतोष | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ६) | **पाटील धनेश परशुराम** | **सदस्य** |
| ७) | **जैन सुनिता रमेश** | **सदस्या** |
| ८) | **रॉड्रीकस मोरस जोसेफ** | **सदस्य** |
| ९) | **परेरा कॅटलीन एन्थोनी** | **सदस्या** |
| १०) | **खंडेलवाल सुरेश जगदीश** | **सदस्य** |
| ११) | **सय्यद नुरजाहॉ नाझर हुसेन** | **सदस्या** |
| १२) | **शेख अमजद गफार** | **सदस्य** |
| १३) | **पाटील जयंतीलाल गुरूनाथ** | **सदस्य** |
| १४) | **घरत तारा विनायक** | **सदस्या** |
| १५) | **पांडे स्नेहा शैलेश** | **सदस्या** |
| १६) | **आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र** | **सदस्य** |
| १७) | **शिर्के अनंत गेणू** | **सदस्य** |
| १८) | **पाटील वंदना विकास** | **सदस्या** |
| १९) | **पाटील संध्या प्रफुल्ल** | **सदस्या** |
| २०) | **पाटील प्रविण मोरेश्वर** | **सदस्य** |
| २१) | **भोईर कमलेश यशवंत** | **सदस्य** |
| २२) | **पाटील अनिता जयवंत** | **सदस्या** |
| २३) | **भोईर भावना राजू** | **सदस्या** |
| २४) | **अरोरा दीपिका पंकज** | **सदस्या** |
| २५) | **भट दीप्ती शेखर** | **सदस्या** |
| २६) | **कासोदारिया अश्विन शामजीभाई** | **सदस्य** |
| २७) | **गोविंद हेलन जॉर्जी** | **सदस्या** |
| २८) | **बगाजी शर्मिला विन्सन्ट** | **सदस्या** |
| २९) | **बांड्या एलायस दुमिंग** | **सदस्य** |

**रजेचा अर्ज - निरंक**

**मा. महापौर :-**

आज के इस विशेष महासभा में उपस्थित आयुक्त, उपमहापौर, सभी आए हुए नगरसेवक/नगरसेविका पत्रकार बंधु, सभी को दिवाली की और नये साल की ढेर सारी शुभकामनायें देती हूँ। और आज की इस विशेष सभा हम सुंदर और खेळीमेळीच्या वातावरण के द्वारा हम पुरी करेंगे ऐसी आशा रखती हूँ।

**नगरसचिव :-**

**मिरा भाईंदर महानगपालिकेची मा . विशेष महासभा शनिवार दि . ०३/११/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र . ०६ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे .** प्रकरण क्र. ९८, **दैनंदिन साफसफाई व घनकचरा व्यवस्थापना सुसुत्रता येण्याबाबत . ( मा. आरोग्य परिरक्षण , वैद्यकिय सहाय्य , उद्यान व शहर सुशोभिकरण समिती सभा दि. ०६/१०/२०१८ रोजीचे शिफारस केलले प्रकरण क्र. ०७, ठराव क्र. ०२)**

**मिरादेवी यादव :-**

मा. महापौर मॅडम में यह जानना चाहती हूँ की, मेरे पास २१४ लोगो की लिस्ट आयी है। अभी आपने आमदार साहब थे, कमिश्नर साहब थे मिटींग हूँआ था। भाडा देने का आज तक अभी किसी के बँक में भाडा आया नही। और २१४ लोगों का लिस्ट आ गया की, हमने भाडा कितने लोगों को दे दिया।

बाकी जो लोग अभी हवा में है, उसका तो कोई ठिकाना नही है। उनका खोज नही है। मगर यह लिस्ट आयी है। यह सही है क्या?

**मा. महापौर :-**

मा. आयुक्त साहेब खुलासा करावा.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर महोदय सन्मा. सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे आणि मागच्या बी.एस.यू.पी. योजनेच्या विषयामध्ये सुध्दा त्यांनी हा मुद्दा आणि जोत्सना हसनाळे मॅडम यांनी हा मुद्दा उपस्थित केला. त्या दोन्ही सदस्या आणि उपमहापौर माझ्या दालनात आले होते. याची सविस्तर आम्ही चर्चा केली आणि ही माहिती समजून घेतली. त्यानंतर महापौर, स्थानिक आमदार, उपमहापौर आणि आपल्या उपस्थित आणि संबंधित अधिकाऱ्यासोबत बैठक झाली. साधारण ५०० जवळपास लोकं याच्यामध्ये सब्जेक्टेड आहे व २ कोटी ६३ लाख लाभार्थी यांना देणे आपले हे आहे. ज्या वेळेस ह्या लाभार्थ्यांची माहिती कलेक्ट करण्याचे काम चालू केले. मात्र पैसे आपण इन हॅन्ड देऊ शकत नाही. त्यांच्या अकाऊंटलाच पैसे द्यावे लागतात. तर साधारतः २५० लोकांचे बँक अकाऊंट जमा झालेले आहेत. आणि त्यांचे आपण १ कोटी ३० लाखाचे बील काल मंजूर करून मी लेखा विभागाला दिलेले आहे. आज किंवा सोमवारपर्यंत हे पैसे त्यांच्या अकाऊंटला येतील. आणि राहिलेल्या लोकांचे सुध्दा बँक अकाऊंट घेण्याचे काम चालू आहे. तर हा विषय आता आपण मान्य करू.

**मिरादेवी यादव :-**

साहब १९ तारीख को महासभा के पहले लिस्ट दिया गया की, हम भाडा दे दिए। अब अभी आप बता रहे है की भाडा...............

**मा. आयुक्त :-**

भाडा देने का निर्णय महासभा के पहले ऐलान करने की बात थी। आणि त्या पध्दतीने आम्ही हा निर्णय घेतलेला आहे. २ कोटी ६३ लाखाला माझी मान्यता सुध्दा झालेली आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, दिवाळी साजरी केली जाईल आणि दिवाळीमध्ये त्यांना.................

**मा. आयुक्त :-**

वह लोग आपको दुवा देंगे।

**मिरादेवी यादव :-**

यह सुनते सुनते ६ साल गया साहब।

**मा. आयुक्त :-**

मॅडम, आता त्याच्यामध्ये किंतु परंतु नाही आहे. फक्त त्या लोकांना लवकरात लवकर बँक अकाऊंटची माहिती द्यायला सांगा. काही अडचण नाही.

**मिरादेवी यादव :-**

२६-७ में जो महासभा अपना हूँआ था। ठराव क्र. ४४ हम लोन का विषय.............

**मा. आयुक्त :-**

आपका और कोई विषय है तो हम मेरे दालन में चर्चा करेंगे।

**मिरादेवी यादव :-**

साहब क्या चल रहा है। मुझे समझ में नही आ रहा है। पब्लिक को जवाब देने में मुश्किल हो रहा है।

**मा. आयुक्त :-**

मुद्दा काय आहे?

**मिरादेवी यादव :-**

मेरा यह मुद्दा है की, अपना काम चालु होगा की नही।

**मा. आयुक्त :-**

देखिए हे काम चालु होण्यासाठी आपल्याला निधीची फार आवशक्यता आहे. महासभेने त्यामध्ये निधी उभारण्यासाठी मान्यता दिलेली आहे. केंद्रशासनाने बी.एस.यु.पी. योजना आता बंद केलेली आहे. नवीन मा. पंतप्रधान मंत्री आवास योजना चालु झालेली आहे. जे कामे अर्धवट राहिलेली आहेत त्याला आपल्याला केंद्रशासनाचा किंवा राज्यशासनाचा निधी भेटणार नाही. आणि जिथे काम सुरू झालेले नाहीत. त्याठिकाणी मा. पंतप्रधान मंत्री आवास योजनेतून निधी भेटतो. तर त्याच्या डी.पी.आर. कन्व्हरर्शनच्या रूपांतरीत करण्याचे काम चालू आहे. ते राज्यशासनाला सबमीट केला जाईल. आणि जे अर्धवट अवस्थेत

सर्व योजना आहेत त्याच्यासाठी महासभेने आयुक्तांना अधिकार दिलेले आहेत. आवश्यक तो निधी आपण हा उभारावा. म्हणजे कर्जाच्या रुपातुन त्याचा सुध्दा प्रस्ताव आम्ही तयार करतो. आणि एम.एम.आर.डी.ए. ला साधारणतः १०० ते १५० कोटी रुपये निधीचा आपण लोन प्रस्ताव करतो. ही एवढी मोठी शृंखला आणि वेळ गेलेला आहे. ते एका दिवसात होण्यासारखे नाही तर आपल्याला याच्यामध्ये पेशन्स ठेवावे लागतील. तुम्ही दर आठवड्याला पाहिजे तर याचे अपडेशन माझ्याकडून घेऊ शकता. आणि जिथे एम.एम.आर.डी.ए. ला ज्यावेळेस आम्ही जाऊ पदाधिका-यांच्या सोबत किंवा सब्जेक्टेड नगरसेवकांना सुध्दा आम्ही सोबत ठेवु. यापुढे जे करायचे आहे ते तुमच्या सहभागाने आम्ही करु.

**मिरादेवी यादव :-**

साहब, एक दिन में होने वाला नही। ३ महिना हो गया ठराव होके।

**मा. आयुक्त :-**

तो दो बाते इसमें हमारे तरफ से फाईनल हो गये है। एक लोन घेण्याचा मुद्दा आणि एक डी.पी.आर. कन्व्हरशनचा. तर साधारणतः दिवाळीच्या नंतर १५-१६ तारखेला आपण एम.एम.आर.डी.ए. ला आपला प्रस्ताव जाईल.

**मिरादेवी यादव :-**

साहब ३ महिना यह ठराव हो गया। २०१७ में बी.एस.यु.पी. योजना है। यह बंद हूआ तो फिर ५ साल क्या कर रहे थे। बार बार वही बात मुझे दोहराना पडता है। प्रशासन की मानसिकता नही है। यह घुमाने का काम कर रहे है बाकी कुछ नही। उनकी परिस्थिती इतनी बेकार है लोग जगह जगह भटक रहे है। उनका थोडा भी प्रशासन का ध्यान नही है। अब जभी हम महासभा में विषय उठाते है।

**मा. आयुक्त :-**

देखिए हा मुद्दा तुम्ही आमच्याकडे मांडला. आम्ही विषय महासभेला दिला त्यानंतर झालेला निर्णय आणि त्यानंतर चालू असलेले काम मी आपल्याला अवगत केले. याच्यापेक्षा अजून काय आपल्याला अपेक्षित असेल तर, माझ्या दालनात आपण चर्चा करू शकतो. याच्यात सभागृहामध्ये निर्णय होण्याची आता काय बाब राहिलेली नाही.

**मिरादेवी यादव :-**

साहब मुझे शोक नही है। बार बार महासभा में मुद्दा उठाना, पब्लिक परेशान करती है। वहा पे कोई झाखने नही जाता है। हम बार बार यही पर मुद्दा उठायें और यही से चुपचाप चले जायें।

**मा. आयुक्त :-**

मी मान्य करतो ज्या वेळेत हे काम व्हायला पाहिजे होते ते झाले नाही. आणि त्याचा रोष नागरिकांचा आपल्यावर राहणे हे साहजिकच आहे. पण आपण या पुढे त्याला गती देऊ.

**मा. महापौर :-**

मा. आयुक्त साहब, उनका जो भी काम है वह आप जल्द से जल्द उनका करने की पुरी कोशिश करे। ताकी उनके वॉर्ड में समाधान मिले। पुढचा विषय घ्या.

**हसमुख गेहलोत :-**

1) **कंत्राटी कामगारांचे दररोज मुकादमांनी सकाळी 7.00 वाजता व दुपारी 3.00 वाजता कामगारांच्या इष्टांकानुसार टप्याटप्याने जागा निश्चित करुन एकाच ठिकाणी उभे करुन क्रमवारी नुसार फोटो घेण्यात यावे. सदरचे फोटो GPS व्हॉट्रसअप वर संबंधित स्वच्छता निरिक्षक व मा. स्थानिक नगरसेवक प्रभाग नुसार Whats app Group तयार करुन त्यावर पाठविण्यात यावे.**
2) **मुकादमांनी कंत्राटी काम गारांचे उपस्थितीचे पाठवलेले फोटो मा . सभापती यांना नियमित स्वच्छता निरिक्षकांनी पाठविण्यात यावेत.**
3) **मुकादमांनी दररोज उपस्थित असलेल्या कंत्राटी कामगारांची हजेरी नोंदवही मध्ये घेण्यात यावी . व त्याचा दैनंदिन अहवाल नियमित स्वच्छता निरिक्षकांना पाठविण्यात यावा.**
4) **प्रत्येक मुकादमांच्या वॉर्डात अतिरिक्त जे .सी.बी.,वाहने, साफसफाई कामास मागविल्यास त्याची नोंदवहीत नोंद घेउन त्यांचा दैनंदिन अहवाल स्वच्छता निरिक्षकांना पाठविण्यात यावा.**
5) **मुकादमांनी वॉर्डामध्ये साफसफाईची कामे समाधानकारक न झाल्यास करारनाम्याच्या अती शर्ती नुसार दंड आकारुन त्याचा अहवाल स्वच्छता निरिक्षकांना पाठविण्यात यावा . सदर ची एक प्रत दररोज संबधित प्रभाग कार्यालय देण्यात येवुन त्याची पोच घेण्यात यावी.**

6) **मुकादमांनी वॉर्डामध्ये दररोज कंत्राटी कामगारांनी गणवेश परिधान न केल्यास दंड आकारुन अहवाल स्वच्छता निरिक्षकांना पाठविण्यात यावा.**
7) **मुकादमासाठी दैनंदिन अहवालाचा नविन फॉर्मट तयार करुन देण्यात यावा.**
8) **सर्व स्वच्छता निरिक्षक त्यांच्या अधिनस्त असलेले वॉर्ड नुसार मुकादमाचे नाव , परिसराचे नाव , मोबाईल क्रमांक याची यादी सर्व स्थानिक सदस्यांना देण्यात यावी.**
9) **प्रत्येक प्रभागा तील कंत्राटी कामगारांना युनिर्फामवर मागच्या व पुढच्या बाजुला अनुक्रमांक (ABC) देण्यात यावा.**
10) **नवीन निविदेमध्ये प्रत्येक कंत्राटी कामगारांना ID क्रमांक देण्यात यावा व सदरचा ID क्रमांक गणवेशावर असणे करारनाम्यामध्ये नमुद करावा.**
11) **स्वच्छता निरीक्षक व मनपा मुकादम दर वर्षी उत्कृष्ट काम केल्याबद्दल सन्मानित करुन त्यांचा प्रस्ताव मा. स्थायी समिती पुढे ठेवण्यात यावा.**
12) **सद्या सुरू असलेले निविदा व नविन निविदेत कंत्राटी कामगारांना कामाचे वाटप करुन त्याची प्रत मा . स्थानिक नगरसेवक यांना देण्यात याव्यात.**
13) **दररोज कचरा उचलणाऱ्या वांहनाचा रूट मॅप मा. स्थानिक नगरसेवकांना देण्यात याव्यात.**
14) **कंत्राटदाराचे कचरा वाहतुक करणाऱ्या वाहने अस्वच्छ आढळल्यास मा. नगरसेवकांनी GPS फोटो काढुन स्वच्छता निरीक्षक यांच्याकडे पाठवावे तसेच स्वच्छता निरीक्षकांनी सदर वाहंनावरती करारनाम्याच्या अटी शर्ती नुसार दंडात्मक कारवाई करुन संबधितांना कळविण्यात यावे.**
15) **नविन निविदेतील करारनाम्यामध्ये इमारतीचे कचऱ्याचे डब्बे वाहतुक करण्यासाठी मुख्य रस्त्यापर्यंत चार चाकी हातगाडी पुरवठा करणेबाबत अटशर्ती मध्ये नमुद कराव्यात.**
16) **नवीन निविदा मध्ये कंत्राटी कामगार प्रभारी मुकादम म्हणुन घेण्यात येवु नये.**

**सध्या कार्यरत पध्दती सुरू ठेवण्यात यावी व येणाऱ्या नविन निविदांमध्ये वरील सुचनेचे अंमलबजावणी करण्यात यावी.**

**सदरचा विषय मा. महासभेपुढे शिफारस करण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.**

**ठराव क्र. :-**

**उपरोक्त गोषवाऱ्यामध्ये समितीने शिफारस केल्याप्रमाणे अवलोकन झाले आहे . प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी असा मी ठराव मांडत आहे.**

**राकेश शाह :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

आरोग्याचा विषय तदर्थ समितीने हा विषय तुमच्याकडे वर्ग केलेला आहे. साहेब तदर्थ समिती आरोग्य विभागाचा आढावा तदर्थ समिती कशाला तयार केली जाते. त्याचे अधिकार किती आहेत. विभागीय आढावा घेऊ शकतात. साहेब यांनी अशा काही सुचना करायच्या असतील तर त्यांनी मा. आयुक्तांना थोडीशी विनंती करायला पाहिजे की, याच्यामध्ये असे असे त्रुटी दिसत आहेत. याला तुम्ही सुधारणा करुन घ्या. एका बाजुला नवीन ठेका देण्याचा प्रस्तावित होता. स्थायी समितीने मंजुरी दिलेली आहे. अजुन त्याला साहेब तुम्ही वर्क ऑर्डर दिलेली नाही. कार्यादेश दिले पाहिजेत. काम सुरू केले पाहिजे. मुदतवाढीवरती काम चालु आहे. तो का प्रलंबित आहे. तो एक विषय समजत नाही. त्याचे स्पष्टीकरण करा. दुसर निविदा प्रक्रियेमध्ये हे सर्व मुद्दे आलेले आहेत. काय केले पाहिजे? किती केले पाहिजे? कर्मचारी कसे आहेत, काय आहेत? त्यांना गणवेश कोण देणार? त्याला वेळोवेळी काय केले पाहिजे? हे सगळे काही मुद्दे त्याच्यामध्ये स्पष्ट केल्यानंतर नवीन तुम्ही त्याच्यामध्ये घुसवता येईल का? साहेब, विशेष सभा लावली कशाला जाते. वेळोवेळी जेव्हा खरोखर शहरामध्ये असा कुठला विषय जो एकदम निगडीत आहे. कामकाजाचा त्यावरती निर्णय घेणे गरजेचे असल्यामुळे विशेष बैठक लावायला पाहिजे. हा विशेष सभेचा विषय नव्हताच. साहेब त्याला मान्यताच तुम्हाला देता येणार नाही. तुमच्या स्तरावर देता येईल का साहेब? त्यामध्ये तुम्ही रद्द बदल करु शकता का?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम, हा विषय फक्त अवलोकनाकरिता आलेला आहे. आणि आरोग्य समितीने तो विषय मंजुर करुन आपल्यापुढे अवलोकनासाठी ठेवलेला आहे. त्याच्यासाठी ही विशेष मिटींग लावलेली नाही.

**जुबेर इनामदार :-**

विशेष कामकाज म्हणजे विशेष सभा कशाला बोलावली जाते. सदस्यांचा वेळ कशाला घेतला जातो. सभा कामकाज कशासाठी चालविली जाते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

याच्यामध्ये आणखीन दुसरा जो विषय आहे तो इम्पॅारटन्ट आहे. त्याच्यापुढे ही विशेष महासभा लावलेली आहे.

**जुबेर इनामदार :-**

सन्मा. सदस्य माझे मित्र ध्रुवकिशोर जी मी प्रशासनाला प्रश्न विचारत आहे. तुम्ही त्यांची भुमिका नका मांडू.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मला पण ती बाजु मांडली पाहीजे ना. जर तुम्ही आरोप केले तर त्या आरोपाचे खंडन केले पाहीजे. की, हा जो विषय आहे हा अवलोकनाकरिता आलेला आहे. आणि त्या आरोग्य समितीने त्यांना जे वाटले त्यांच्या सद्सद्विवेक बुद्धीला जे वाटेल त्यांनी मिटींगमध्ये चर्चा केली. त्यांच्या सदस्यांनी सुचना सांगितल्या. त्या सुचना त्यांनी एक ठराव केला आणि तो प्रशासनापुढे सादर केला. त्याप्रमाणे तो विषय अवलोकनासाठी घेतलेला आहे.

**जुबेर इनामदार :-**

ठिक आहे. अवलोकनाला ठराव करता येतो का?

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य ऐकुन घ्या. असे आहे की, आपण आता सांगितले की, तदर्थ समित्यांकडून हा विषय आलेला आहे. तुम्हाला अवगत करु इच्छितोय. की, मिरा भाईंदर शहराच्या वाढत्या कार्यरक्षा लक्षात घेता तदर्थ समित्यांची जेव्हा आम्ही ह्या सभागृहाने घोषीत केल्या. तदर्थ समित्या त्यावेळेला निवळ प्रक्रिया झाली. आणि तदर्थ समित्यांच्या माध्यमातुन शहराचा विविध अंगी कामाला सुरूवात झालेली आहे. म्हणजे पाणी समित्याबद्दल मी तुम्हाला सांगेन की त्या पाणी समितीच्या सदस्यांनी तातडीने आपल्या पाण्याचा स्त्रोत कुठून आहे. पाणी कसे येते याची माहिती ह्या शहरात दिली. आपल्या माहितीसाठी की, आरोग्य समितीकडे जुन्या टेंडर मध्ये एवढा मोठा गोंधळ आहे. सगळ्यांच्या तक्रारी आहेत. की ते सफाई कर्मचारी कुठे असतात, कधी असतात, किती असतात. परंतु याचे अत्यंत माईक्रो वर्क आरोग्य समितीकडुन करण्यात आलेले आहे. आणि आपली प्रक्रिया होणारच आहे. आपण नवीन निविदा मागविलेली आहे. त्याच्यासाठी नियमानुसार नियमावली तयार केलेली आहे. आणि एक आरोग्य समितीने आपले परिक्षण त्यात नोंदविलेले आहे. आणि ते जर आपल्या सभागृहासमोर आणले असेल महासभा मोठे सभागृह आहे. याच्यात तुम्हाला वाटत असेल तुमची एखादी मोठी सुचना आहे. ह्या शहराचा हितामध्ये ती ठेवू शकता. पण तो ठराव आणला आहे तो ठराव आणणे गरजेचे आहे.

**जुबेर इनामदार :-**

तुमच्या भाषणाच्या पुढे मी काही जाऊ शकत नाही. साहेब तुम्हाला टेन ऑन टॉकटाईम नेहमीच भेटणार त्याच्यामध्ये मात्र हा विषय मी प्रशासनाला प्रश्न केलेला आहे.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर महोदय, सन्मा. सदस्यांनी दोन-तीन मुद्दे या ठिकाणी मांडलेले आहेत. एक विशेष समिती किंवा तदर्थ समितीचे कामकाज पटलावर ठेवले ते अतिअत्यावश्यक आणि फार तातडीचे आहे. सभा लागली म्हणुन कदाचित महापौरांनी तो विषय घेतला असेल पण सन्मा............

**जुबेर इनामदार :-**

याच्यामध्ये साहेब पाठविलेले विषय मला ह्याच्यामध्ये कुठला विशेष विषय असा आहे. तो शहराच्या निगडीत आहे. त्याला कामकाज करण्यासाठी त्यावरती निर्णय घेण्यासाठी ही सभा लावणे गरजेचे होते.

**मा. आयुक्त :-**

दोन-तीन विषय प्रशासनाकडून आलेले आहेत ते फार तातडीचे होते.

**जुबेर इनामदार :-**

सर हा विषय याच्यावर परत येतो साहेब मला सांगा तदर्थ समितीने पाठविले.............

**मा. आयुक्त :-**

प्रशासनाबद्दल जे दिलेले दोन-तीन विषय आहेत ते तातडीचे होते. आणि त्याच्या आधारे ही सभा लागलेली आहे. आणि ही विशेष सभा लावताना आता जे तुम्ही अवलोकनाचे विषय म्हणतात ते रेग्युलर बैठकीला घेता आले असते हा मुद्दा वेगळा आहे. आणि महासभा जेष्ठ सभागृह आहे. महासभेच्या अधिन

ज्या काही समित्या विशेष समित्यांचे कामकाज होते तर ते कामकाज महापौरांना आणि सदस्यांना माहिती होण्यासाठी अवलोकनासाठी जर पाठवत असेल तर त्याच्यात वेगळा विषय नाही. आणि त्याच्यात ठराव करण्याची सुध्दा प्रथा नाही. ठरावाची आवश्यकता नसते. त्याच्यावर जर चर्चा करायची असेल तर चर्चा होऊ शकते. जर एखाद्याला चर्चा वाटली तर मा. महापौराच्या संमतीने चर्चा होऊ शकते. आणि एखादा झालेला निर्णय असेल तर अवलोकनाच्या माध्यमातुन त्याच्यात काही दुरूस्ती होत नाही. त्यासाठी वेगळा प्रस्ताव आणावा लागतो. ह्याठिकाणी तदर्थ समितीने जे कामकाज केलेले आहे. निश्चितच उपमहापौरांनी सांगितलेल्या खुप चांगल्या पध्दतीने त्यांनी नियंत्रणाचे काम करत आहेत. आणि आपण सुध्दा सिनियर आहात. आपल्याही याच्यापुर्वी समित्या कामकाजाचा अनुभव आहे. त्यापेक्षा वेगळ ही आता पण कामकाज होत नाही. आणि विशेष पदाधिकारी सगळे यांच्या उपस्थितीत तदर्थ समितीचे सभापती यांच्याशी सविस्तर आम्ही चर्चा करून आमचा अजेंडा निश्चित केलेला आहे. आणि निश्चित ते महासभेला पुरक आहे. ह्या ठिकाणी केंद्र शासनाच्या विशेष स्वच्छता सर्वेक्षणाचे जे दोन-तीन विषय आहेत ते तातडीचे आहेत. आणि त्यासाठी ही सभा बोलवलेली आहे.

**राजेंद्र जैन :-**

मा. महापौर मॅडम, यह एक विषय लाये है। इन्होंने बोला की, टेंडर के अंदर शर्ते ऐसी है। वह नॉरमल है। मैं बताना चाहता हूँ की, अगर नॉरमल शर्ते इसके अलावाभी हमने इस मे प्रस्ताव लाये है। जिसे की हर साल की, शिकायत नगरसेवको को मालुम नही पडता सफाई कर्मचारी कहा पर है। कितने आये है, कितने काम कर रहे है। उसके उपर कंट्रोल लाया है। नये टेंडर में नगरसेवको को सुचना नही मिलती तो व्हाटस ॲप द्वारा, फोटो द्वारा वह हमने प्रस्ताव लाया वह नया है। दुसरा सबसे इर्म्पोटन्ट पॉइंट यह है की, अभी तक जो करोडो का सोला सो लोग है। सफाई कर्मचारी १६४२ लोग है। उसके उपर कंट्रोल तभी आयेगा जब नगसेवको को सुचना मिलेगी। अभी तक ऐसा कोई अधिकारी महानगरपालिका अधिकार नही था। अधिकारी चाहे तो दे नही तो नही दे। उसके लिये मांग करते थे। अभी हमने यह रूल बनाया है की, हर नगरसेवको को डम्प का रूट मॅप मिलेगा। हर नगरसेवको को उसके वॉर्ड मे कहा आदमी होंगे, कितने बजे वह मिलेगा यह अधिकार महासभा दे रही है। पहिला प्रशासन से मिलता था नही मिलता था। अभी हमने इसको अधिकार लिया है। तीसरी बात अभी तक जो हजेरी का करोडो का बजेट मिलता था वह सिर्फ एस.आय. और हेल्थ डिपार्टमेन्ट से मिलके बनाता था। ऑडीटर साहब से हमने बात की। यह कैसे चेक करते हो। ऑडीटर ने यह बोला हम सिर्फ सर्टिफिकेट देते है की, जो बोल रहे है सही है। हमने अभी चेंज किया है। इनामदार साहब के लिए स्पेशल बोला सेम बोला सेम नही है। हमने प्रस्ताव यह रखा है की, मुकादम आपकी हजेरी भरेगा। मुकादम की हजेरी एस.आय. को जायेंगी। एस.आय. वह हजेरी प्रभाग कार्यालय और हेल्थ डिपार्टमेन्ट में जायेगी। और दोन्हो से टॅली हो के ऑडिटर के पास जायेगी। यानी की हजेरी का जो गडबड होता है वह हमेशा था। द मोर ट्रैन्सपैरन्सि मोर द इलास्टी कॉरपोरेशन हम उसी दिशा मे काम कर रहे है। चार आदमी की बिच की हजेरी को बाट के हम निजी तले पर मुकादम है। हेल्थ डिपार्टमेन्ट है, प्रभाग समिती है और ऑडिटर है। क्योंकी बिच में हमने ऑफर ट्रैन्सपैरन्सि कर दिया है। डेली देने का बंधनकारक कर दिया है। ग्रुप फोटो किया है। ८ बजे कर फाटो यानी की टोटल ट्रान्सपरेन्ट यह जरूरी था। सर अभी तक का सिस्टम.............

**मा. आयुक्त :-**

मेरा इतना इंटरजेशन है। गटनेता कोई दुसरी बात ठेवलेली नाही. दैनंदीन सुपर व्हिजन आढावा ह्या गोष्टी घेता येतात. आणि ते कामकाज तेच करतात.

**जुबेर दनामदार :-**

तदर्थ समितीने रूल बनविले रूल म्हणजे कायदा झाला ना साहेब.

**मा. आयुक्त :-**

एक धोरण त्यांच्या सुपरव्हिजनचे धोरण बनविलेले आहे. त्याच्यात काही फाईनान्शीयली विषय नाही.

**धृवकिशोर पाटील :-**

आरोग्य समितीने जे केले त्यांचे मी अभिनंदन करतो. त्याच्यात त्यांनी काही सजेशन दिले आहेत, कायदे बनविलेले नाहीत. त्यांनी रूल बनविलेले नाहीत. त्यांनी काही जी सिस्टीम..........

**जुबेर इनामदार :-**

तदर्थ समितीचे सभापती बोलले आम्ही रूल बनविले.

**धृवकिशोर पाटील :-**

तुम्ही त्याचा अर्थ वेगळा घेतला.

**जुबेर इनामदार :-**

तदर्थ समिती ह्या महानगरपालिकेच्या राजकीय इतिहासामध्ये एकदा तदर्थ समित्या तयार झाल्या होत्या. आणि त्याच्या विषय तज्ञ विराजमान पिठासीन सदस्या आमचे चंद्रकांत वैती साहेब यांनी केला होता. आणि ह्या समित्या विर्सजन होण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा चालु आहे. मात्र फक्त साहेब तुम्हाला सुचना करू शकतात. आढावा घेऊ शकतात. अशाप्रकारे विषय आणुन सभागृहाचा वेळ वाया घालु नये. मी तुम्हाला साहेब विनंती करतो. स्थायी समितीने घाई घाईने काही ठराव मंजुर केला का? स्वच्छतेचा? नविन आरोग्याचा ठेकेदार त्यांनी घाईघाईने मंजूर केला होता का? त्याच्या आधी ह्या ठिकाणी विषय आणायला पाहिजे होते. त्यांच्या सुचनेत आम्ही त्याला स्थायी समितीला दिले पाहिजे होते. अजून अवधी लावायला पाहिजे होता. फेरनिविदा काढायला पाहिजे होती. निविदेमध्ये सुधारणा करायला पाहिजे होती. कायद्याचे काही आहे की नाही. भान फक्त मी करे सो कायदा तर होऊ शकत नाही. साहेब म्हणून आमची तुम्हाला विनंती आहे की असे विषय आल्यानंतर साहेब तुम्ही त्याच्या तिथेच जागेवर विर्सजन करा. धन्यवाद.

**मा. महापौर :-**

इस विषय पर अभी ज्यादा चर्चा हो गयी है।

**मा. आयुक्त :-**

अवलोकनला काही ठराव होत नाही.

**मा. महापौर :-**

अवलोकन का कोई भी ठराव नही होता है। पुढचा विषय घ्या.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम तुम्ही विशेष समिती लावलेली आहे. महत्वाचा विषय विषयपत्रिकेवर घेतलेला आहे. मला एक सांगा महापौर मॅडम हे आपण कॉन्ट्रॅक्ट पाच वर्षासाठी दिलेला आहे.

**मा. महापौर :-**

चार.

**अनिल सावंत :-**

एक वर्ष कमी केल बरोबर आहे. टर्म ॲन्ड कंडीशन ठेवलेल्या आहेत याच्यामध्ये १२ नंबरमध्ये लिहिलेले आहे की, निविदा आणि नविन निविदेत कंत्राटी कामगारांची कॉपी नगरसेवकांना देण्यात येणार. याच्याबरोबर दिली असती तर बरे झाले असते. आम्हाला टर्म कंडीशन कळल्या असत्या. माझा मुद्दा एकच आहे. मागे आपल्या महापालिकेचे पदाधिकारी महापौर मॅडम सहीत इंदौरला जाऊन आले. त्याचा अहवाल ह्या सभागृहामध्ये दिला गेला. सभागृहामध्ये अहवाल दिल्यानंतर इंदौरप्रमाणे आपण ह्या शहरातील साफसफाईचे जे ठेकेदार आहेत किंवा जी व्यवस्था आहे त्याप्रमाणे करणार. अहवाल झाला पालिकेचे पैसे खर्च झाले. इंदौरला जाऊन आले. मोठा गाजावाजा झाला. त्याप्रमाणे आपण इंदौर सारखे हे शहर सुरु करणार. तो गोषवारा किंवा जो अहवाल दिला गेला आहे किंवा इंदौर शहरामध्ये जी साफसफाईची व्यवस्था झाली आहे त्याच्यातली एकतरी कंडीशन ह्या प्रस्तावामध्ये आहे की त्याप्रमाणे आम्ही करणार आहोत. नाही आहे मग त्यावेळी दिशाभूल केली गेली की आता आपण मागे जसे चालले तसेच आता चालणार आहे. याचा फक्त खुलासा करावा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, सन्मा. सदस्यांनी सावंत साहेबांनी जो प्रश्न विचारलेला आहे. साहेब आपल्या ज्या बजेटच्या तरतुदीनुसार आपण जे इंदौरच्या प्रमाणे लायसन्स करणार आहोत. त्या इंदौर मध्ये जे प्रोसेसिंग जे चालणार होते सेग्रिगेशन चांगल्या प्रमाणात चालू होते आणि त्यापध्दतीने आपणही सॅग्रिगेशनला सुरुवात केलेली आहे आम्ही प्रोसेसिंग सुरु केलेली आहे.

**अनिल सावंत :-**

इंदौर महापालिकेचा मेन मुद्दा आहे कलेक्शन. मी गेलो नव्हतो पण थोडासा अभ्यास केला. इंदौरची कलेक्शनची पध्दत ती इम्पलीमेंट होणार का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मॅक्झीमम त्या पध्दतीने आपण करणार.

**अनिल सावंत :-**

कशी होणार एक ठेकेदार नेमलेला आहे त्याला दिलेला आहे कॉन्ट्रॅक्ट.

**मा. आयुक्त :-**

व्हेईकल वेगवेगळे निश्चित केलेले आहेत. ड्राय वेस्ट आणि इतर वेस्ट आपण वेगळे कलेक्ट करणार आहोत. जुबेर इनामदार साहेब म्हणाल्याप्रमाणे लवकरात लवकर दिली जाईल.

**अनिल सावंत :-**

आपण ६ महिन्यानंतर परत आढावा घेऊ. इंदौरप्रमाणे याची किती................

**मा. आयुक्त :-**

मी म्हणतो दर ३ महिन्याला घेऊ.

**जुबेर इनामदार :-**

ठेकेदाराला कार्यादेश का दिला नाही. म्हणजे आमच्याकडे ठराव आला नव्हता साहेब. तुम्ही अनुभवी आहेत. तुम्हाला सांगायची गरज नाही. ठराव सही केलेले ठरावाची गरज नसते. मिनिट्समध्ये वाचन झाल्यानंतर त्याचे मिनिट्स महत्वाचे आहेत सभेचे. आपल्याला कधीही महापौरांनी सही केलेल्या ठरावाची गरज नाही.

**मा. आयुक्त :-**

लवकरात लवकर अंमलबजावणी केली जाईल.

**जुबेर इनामदार :-**

साहेब केली पाहिजे.

**प्रभात पाटील :-**

स्थायी समितीने जी मंजुरी दिली आहे आरोग्याच्या टेंडरला त्यातले सगळे मुद्दे आलेले आहेत. याच्यात मला १५ नंबरचा मुद्दा तर अतिशय महत्वाचा आहे आणि तो वगळता कामा नये साहेब होते काय की, गल्लीतला जेव्हा कचरा येतो ते झाडूवाले काय करतात ते डब्बे खेचत खेचत घेऊन येतात. उचलता तर येत नाही. तो डब्बा जड असतो. तर तो डब्याखालून फुटतो. डब्बा फुटला की कचरा खाली. हा एक मुद्दा आणि तुम्ही त्या सोसायटीकडे गाड्या न लावता की आम्हाला ते कचऱ्याचे डब्बे नविन द्या. सोसायटीला नेहमी भुर्दंड होतो आणि शिवाय तो पडलेला कचरा आहे तो कुत्रे आणि जनावरे इकडे तिकडे करतात आणि झाडलेली गल्ली पुन्हा खराब होऊन जाते. तो एक मुद्दा तर ह्याच्यामध्ये जे म्हटलेले आहे कचऱ्याचे डब्बे वाहतुक करण्यासाठी मुख्य रस्त्यावरती चार गाडी हा मुद्दा अजिबात वगळता कामा नये. हा मुद्दा तुम्ही तुमच्या टेंडरमध्ये घ्यायचाच घ्यायचा.

**मा. आयुक्त :-**

ज्या गोष्टी स्थायी समितीने लादलेले आहेत किंवा त्याच्यात सुधारणा केलेल्या आहेत ते वगळण्याचा प्रश्नच येत नाही.

**प्रभात पाटील :-**

ह्या मुद्दयांसाठी मी आग्रह करते. दुसरा महत्वाचा मुद्दा त्याच्यात एक आला नाही कदाचित तो तुमच्या याच्यात इन्क्लुड असेल. साहेब मला असे वाटते काकांचा अर्धा वॉर्ड आणि माझा वॉर्ड पूर्ण ४ नंबर आपला जुना वॉर्ड हा संपूर्ण मोठा इंडस्ट्रीज एरिया आहे. मिरा भाईंदरमध्ये जय अंबे मोठी इंडस्ट्री आहे. त्या इंडस्ट्रीमध्ये खरच एकदा फेरफटका मारावा. सगळ्यात महत्वाची समस्या बफींगचा कचरा आणि त्या लोकांचे आरोग्य तिथे गटारे नाही, रस्ते नाही, कचरा न्यायला मार्ग नाही. त्यांचे बफींगचे कचरे, टोपल्या, गोणी सगळे काही अस्थाव्यस्थ पडलेले असते. ह्या सगळ्या गोष्टींचा परिणाम त्यांच्या आरोग्यावर होत असतो आणि म्हणून इंडस्ट्रीच्या कचऱ्याचे नियोजन हा भाग जरी टेंडरमध्ये इन्क्लूड नसला तरी तुम्ही तुमच्या पध्दतीने त्याचे नियोजन करणे आवश्यक आहे.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्यांनी चांगली सुचना मांडली. आपल्याकडे २ प्रकारचा कचरा वेगळ्या पध्दतीने गोळा केला जातो. एक हाऊस होल्ड आणि एक कमर्शिअल व्यावसायिक आणि हाऊस होल्ड अशा पध्दतीने आपण करत आहोत. आणि तिसरी कॅटेगरी आहे आपल्याकडे मेडीकल वेस्ट तर ही चांगली सुचना आहे की फोर्थ कॅटेगरी व्हाईल क्लिन इंडस्ट्रीयल वेस्ट. शहरातील जिकडे इंडस्ट्रीज आहेत त्याची सुची तयार केली जाईल. राख वगैरे असेल ते आपल्या कचऱ्यात घेऊ शकतो. पण त्याच्यात हेवी मेटल्स असतील जे आरोग्याला घातक असतील. काही केमिकल्स असतील तर त्याची कलेक्शनची सिस्टीम आहे वेगळ्या पध्दतीने करण्याचा प्रयत्न करु आणि तसा प्रस्ताव देऊ आणि तो हजार टन ट्रीटमेंट साईट्स जे तडोद्याला आहे तिथे डम्पींग करण्याचे आम्ही नियोजन करु. आणि त्याची सर चार्ज मात्र त्या इंडस्ट्रीजला लावले जाईल. जसे मेडीकल वाल्यांना लावले.

**अनित सावंत :-**

महापौर मॅडम, आपण सोसायटींना कचऱ्याचे डब्बे देणार होते. तुम्ही ते ओपनींग पण केले होते. मला वाटते प्रायोगिक तत्वावर त्याचे पुढे काय झाले.

**मा. महापौर :-**

आता लवकरात लवकर देणार आहोत.

**प्रकरण क्र. ९८ :-**

**दैनंदिन साफसफाई व घनकचरा व्यवस्थापना सुसुत्रता येण्याबाबत . (मा. आरोग्य परिरक्षण, वैद्यकिय सहाय्य, उद्यान व शहर सुशोभिकरण समिती सभा दि. ०६/१०/२०१८ रोजीचे शिफारस केलले प्रकरण क्र. ०७, ठराव क्र. ०२)**

**ठराव क्र. ९७ :-**

1) कंत्राटी कामगारांचे दररोज मुकादमांनी सकाळी 7.00 वाजता व दुपारी 3.00 वाजता कामगारांच्या इष्टांकानुसार टप्याटप्याने जागा निश्चित करुन एकाच ठिकाणी उभे करुन क्रमवारी नुसार फोटो घेण्यात यावे. सदरचे फोटो GPS व्हॉट्सअप वर संबंधित स्वच्छता निरिक्षक व मा. स्थानिक नगरसेवक प्रभाग नुसार Whats app Group तयार करुन त्यावर पाठविण्यात यावे.
2) मुकादमांनी कंत्राटी कामगारांचे उपस्थितीचे पाठवलेले फोटो मा. सभापती यांना नियमित स्वच्छता निरिक्षकांनी पाठविण्यात यावेत.
3) मुकादमांनी दररोज उपस्थित असलेल्या कंत्राटी कामगारांची हजेरी नोंदवही मध्ये घेण्यात यावी. व त्याचा दैनंदिन अहवाल नियमित स्वच्छता निरिक्षकांना पाठविण्यात यावा.
4) प्रत्येक मुकादमांच्या वॉर्डात अतिरिक्त जे .सी.बी.,वाहने, साफसफाई कामास मागविल्यास त्याची नोंदवहीत नोंद घेउन त्यांचा दैनंदिन अहवाल स्वच्छता निरिक्षकांना पाठविण्यात यावा.
5) मुकादमांनी वॉर्डामध्ये साफसफाईची कामे समाधानकारक न झाल्यास करारनाम्याच्या अती शर्ती नुसार दंड आकारुन त्याचा अहवाल स्वच्छता निरिक्षकांना पाठविण्यात यावा . सदर ची एक प्रत दररोज संबधित प्रभाग कार्यालय देण्यात येवुन त्याची पोच घेण्यात यावी.
6) मुकादमांनी वॉर्डामध्ये दररोज कंत्राटी कामगारांनी गणवेश परिधान न केल्यास दंड आकारुन अहवाल स्वच्छता निरिक्षकांना पाठविण्यात यावा.
7) मुकादमासाठी दैनंदिन अहवालाचा नविन फॉर्मेट तयार करुन देण्यात यावा.
8) सर्व स्वच्छता निरिक्षक त्यांच्या अधिनस्त असलेले वॉर्ड नुसा र मुकादमाचे नाव, परिसराचे नाव, मोबाईल क्रमांक याची यादी सर्व स्थानिक सदस्यांना देण्यात यावी
9) प्रत्येक प्रभागातील कंत्राटी कामगारांना युनिर्फामवर मागच्या व पुढच्या बाजुला अनुक्रमांक (ABC) देण्यात यावा.
10) नवीन निविदेमध्ये प्रत्येक कंत्राटी कामगारांना ID क्रमांक देण्यात यावा व सदरचा ID क्रमांक गणवेशावर असणे करारनाम्यामध्ये नमुद करावा.
11) स्वच्छता निरीक्षक व मनपा मुकादम दर वर्षी उत्कृष्ट काम केल्याबद्रदल सन्मानित करुन त्यांचा प्रस्ताव मा. स्थायी समिती पुढे ठेवण्यात यावा.
12) सद्या सुरू असलेले निविदा व नविन निविदेत कंत्राटी कामगारांना कामाचे वाटप करुन त्याची प्रत मा. स्थानिक नगरसेवक यांना देण्यात याव्यात.
13) दररोज कचरा उचलणाऱ्या वांहनाचा रूट मॅप मा. स्थानिक नगरसेवकांना देण्यात याव्यात.
14) कंत्राटदाराचे कचरा वाहतुक करणाऱ्या वाहने अस्वच्छ आढळल्यास मा . नगरसेवकांनी GPS फोटो काढुन स्वच्छता निरीक्षक यांच्याकडे पाठवावे तसेच स्वच्छता निरीक्षकांनी सदर वाहंनावरती करारनाम्याच्या अटी शर्ती नुसार दंडात्मक कारवाई करुन संबधितांना कळविण्यात यावे
15) नविन निविदेतील करारनाम्यामध्ये इमारतीचे कचऱ्याचे डब्बे वाहतुक करण्यासाठी मुख्य रस्त्यापर्यंत चार चाकी हातगाडी पुरवठा करणेबाबत अटशर्ती मध्ये नमुद कराव्यात.
16) नवीन निविदा मध्ये कंत्राटी कामगार प्रभारी मुकादम म्हणुन घेण्यात येवु नये.

**सध्या कार्यरत पध्दती सुरू ठेवण्यात यावी व येणाऱ्या नविन निविदांमध्ये वरील सुचनेचे अंमलबजावणी करण्यात यावी.**

**सदरचा विषय मा. महासभेपुढे शिफारस करण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.**

**ठराव क्र. :-**

**उपरोक्त गोषवाऱ्यामध्ये समितीने शिफारस केल्याप्रमाणे अवलोकन झाले आहे . प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी असा मी ठराव मांडत आहे.**

**सुचक :- श्री. हसुमुख गेहलोत अनुमोदक :- श्री. राकेश शाह**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९९, **मिरा भाईंदर महानगरपालिका शहर हागणदारी मुक्त (ODF+) करणेबाबत. (मा. आरोग्य परिरक्षण , वैद्यकिय सहाय्य , उद्यान व शहर सुशोभिकरण समिती सभा दि. ०६/१०/२०१८ रोजीचे शिफारस केलले प्रकरण क्र. १२, ठराव क्र. ०७)** प्रकरण क्र. १००, **मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत कचरामुक्त मिरा भाईंदर शहराच्या तारांकित मानांकनाबाबत. (मा. आरोग्य परिरक्षण, वैद्यकिय सहाय्य, उद्यान व शह र सुशोभिकरण समिती सभा दि. ०६/१०/२०१८ रोजीचे शिफारस केलले प्रकरण क्र. १३, ठराव क्र. ०८)** दोन्ही विषयांबद्दल एकत्रित माहिती देत आहोत.

**मा. महापौर :-**

पानपट्टे साहेब याची माहिती द्यावी.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो, स्वच्छ सर्वेक्षण जानेवारी २०१९ मध्ये पहिल्या आठवड्यात होणार आहे. गेल्या स्वच्छ सर्वेक्षणामध्ये आपला देशामध्ये सत्तेचाळीवा क्रमांक व महाराष्ट्रामध्ये सातवा क्रमांक होता. त्याच्यामध्ये आपले सर्वांचे मोठे सहकार्य होते म्हणून आपण चांगल्याप्रकारे त्याठिकाणी काम करु शकतो. ह्या वर्षी पेक्षा वस्तुस्थिती वेगळी आहे. गेल्यावर्षी फक्त जवळपास ४ हजार मार्कांची परिक्षा होती. तर ह्या वर्षी जवळपास ५ हजार मार्कांची परिक्षा आहे. त्याच्यामध्ये कलेक्शन ऑफ डाटा फ्रॅम यांच्यामधून २०० मार्क मधून कमी मिळाले. दुसरे कलेक्शन ऑफ डेटा फ्रॅम डायरेक्ट टिम २०० मार्कमधून कमी मिळाले. दुसरे कलेक्शन ऑफ डेट फ्रॅम डायरेक्ट ऑब्जरवेशन स्वतः ८ दिवस टीम घेणार आहे. कलेक्शन ऑफ डेटा फ्रॅम सी.डी.एम. फिड बँक सिटीझनला काही प्रश्न विचारणार. १० प्रश्न विचारणार आहेत. ते प्रश्न विचारुन ते मार्क देणार आहेत आणि तसे सर्टीफिकेट्स ऑफ गार्बेज फ्रॅम फ्री सिटीज ओ.डी.एफ. प्लस ह्या संदर्भात आपल्याला एक ठराव करुन द्यायचा आहे. याच्यामध्ये जवळपास ५ हजार मार्कांची परिक्षा असेल. त्यामध्ये सर्विस लेव्हल लॉस म्हणजे कलेक्शन ऑफ १०० टक्के सॅग्रीगेशन आपल्याकडे होत आहे का? ते बघणार आहे. आपले शहर डस्टबीन फ्री आहे का ते बघणार आहे. तसेच आपल्याला जो कचरा नेला जातो. त्या कचऱ्यावर साईंटीफिकली प्रोसेस होते का. ड्रायचे प्रोसेस होते का, वेस्टचे प्रोसेस हाते का. एक्झॉस्टींग जो कचरा आहे त्या कचऱ्याचे १० लाख मेट्रीक टन कचरा आहे. त्याचे प्रोसेसिंग झाले का? ह्या संदर्भात ते मार्क आहेत. तसेच आपल्याकडे सिव्हरेज होता. ॲमिनिटी सिव्हरेज जनरेट होते त्याच्यावर साईंटीफिकली प्रोसेस होते का आणि त्याची नेटवर्किंग आहे का. नेटवर्क झाल्यानंतर जे काही स्लज निघते त्याला साईंटीफिकली डिस्पोज करता येते का याला ही मार्क आहेत. तसेच टॉयलेट आपल्याकडे जे ३५० टॉयलेट आहेत. त्या टॉयलेटची व्यवस्था व्यवस्थित आहे का? त्याला रंगरंगोटी केलेली आहे का? त्याला पाण्याची व्यवस्था आहे का, बिन्स ठेवलेली आहे का, पाण्याची व्यवस्था आहे का? कडी कोयंडा आहे का? कचराकुंडी व्यवस्थित आहे का ते डायरेक्ट येऊन बघणार आहेत आणि याच्यामध्ये ओ.डी.एफ द्वारा आपल्याकडे आपले शहर हे हगणदारीमुक्त झालेले आहे. हगणदारीमुक्त स्टेट्स आपण मेन्टेन केलेले आहे. याच्यापुढे आपले ओ.डी.एफ प्लस जर मेन्टेन ठेवायचे असेल तर त्याठिकाणी बारकाईने प्रत्येक गोष्ट तिथे बघणार आहेत. याच्यात जे बघणार आहेत ती पाण्याची व्यवस्था,

हाऊस टू हाऊस जे काही आपल्याला पब्लिक टॉयलेट आहेत. त्याठिकाणी पाण्याची व्यवस्था केलेली आहे का? तिथे बिन्स ठेवले आहेत का? असे प्रत्येक वर्षाला ते बघणार आहेत आणि आपण जे ९९८ जे टॉयलेट बांधले आहेत. ते आपण केंद्र शासनाच्या निधीने बांधले होते. त्या निधीला त्या टॉयलेटला पाण्याची व्यवस्था आहे का ते सुध्दा ते बघणार आहेत. याच्यामध्ये दुसरा महत्वाचा भाग आहे युजर चार्जेस. ह्या ठिकाणी आपण मागे पडत होतो. युजर चार्जेस महापालिकेने लावलेले आहेत. त्याच्यामध्ये फक्त १५ टक्के आपले वसुल होतात. त्याचे म्हणणे आहे की १०० टक्के युजर चार्जेस तुम्ही वसुल केले पाहिजे. घनकचऱ्यावर जेव्हा खर्च होतो तो खर्च बघुन नागरिकांकडून वसुल केला पाहिजे असे त्यांचे म्हणणे आहे. ते जर असेल तर बऱ्याचप्रकारे चांगले मार्क मिळतात. तसेच आपण युजर चार्जेस सुध्दा पब्लिक टॉयलेट, कम्युनिटी टॉयलेट जे असतात त्याठिकाणी तुम्ही जर युजर चार्जेस लावले असतील तर त्याठिकाणी आपल्याला चांगले मार्क्स मिळतात. ह्या २-३ गोष्टी आपल्याला फार महत्वाच्या आहेत आणि दुसरं डायरेक्ट ऑब्जरवेशनला ते स्वतः येणार आहेत. जेव्हा ते येतील त्यावेळेस ते काही प्रश्न विचारतील. आपला डाटा ते कलेक्ट करणार. आपले शहर ते ४ झोनमधून ४० सॅम्पल घेणार. म्हणजे ४० ठिकाणी कमर्शियल प्लेसेस. हाऊसिंग, कॉम्पलेक्स, मोठ्या कॉलनीज त्याठिकाणी खरोखर कचरा साफसफाई होते का? त्याचे फोटो घेतात. त्याच्यामध्ये ओला कचरा, सुका कचरा व्यवस्थित सॅग्रिगेशन दिले जाते का? आय.आय.टी. बेस मॉनिटरींग केले जाते का, अटेंडींग सिस्टम व्हेईकलची केली जाते का आणि कमर्शियल प्लेसेस दोन ठिकाणी वेगवेगळे साफ होते का? ह्या गोष्टी ते डायरेक्ट ऑब्जरवेशनने बघणार आहेत. तसेच डायरेक्ट ऑब्जरवेशन त्यावेळेस ते टॉयलेट सुध्दा बघणार आहेत. जेवढे आपले टॉयलेट्स आहेत पब्लीक, कम्युनिटी टॉयलेटवर जास्त भर आहे. ते आपले गुगल मॅपवर आपल्याला मार्ग दिसतो का? कोणाला एक्झीबली आक्षेप आहे का आणि ती खरी स्वच्छता मेन्टेन केलेली आहे का असे ते बघणार आहेत. आता जे आपले ३५० टॉयलेट आहेत ते गुगल मॅपवर आहेत. आपले कुठले पब्लीक टॉयलेट, कम्युनिटी टॉयलेट कुठे आहेत ते लगेच आपल्याला ते युज करता येते की नाही ते थ्री डी युज आहे का, ते बघतात. दुसरं महत्वाचा विशेष याच्यामध्ये कर्मशियल एरिया याच्यामध्ये आहेत. संध्याकाळी नाईट शुटिंग आपल्याकडे आठवड्यात प्रत्येक ठिकाणी आपण कर्मशियल एरिया आयडेन्टीफाय केले. त्याठिकाणी धुळ, साफसफाई करणे अभिप्रेत आहे. त्यासाठी आपण काही स्थान डिसाईड केलेले आहेत. त्याठिकाणी बिन्स ठेवणार आहोत. बिन्स ठेऊन सकाळ संध्याकाळ आम्ही त्याठिकाणी साफसफाई करणार आहोत आणि ते आल्यानंतर हे कर्मशियल १०० टक्के क्लिन आहे का ते बघणार. तसेच पब्लिक प्लेसेस ज्या आपल्याकडे आहेत. रेल्वे स्टेशन, बस स्टेशन, ऑटो, रिक्षा स्टॅन्ड, मोठे मॉल्स ह्या ठिकाणी कशाप्रकारची तुमची साफसफाई आहे का ते बघणार आहोत. त्या ठिकाणी पब्लीक टॉयलेट पुरेसे आहेत का ते बघणार आहेत आणि ते पब्लीक टॉयलेट चांगल्या पध्दतीने आहेत का ते मेन्टेन केलेले आहेत का ते बघणार आहेत. आणि त्याठिकाणी डायरेक्ट ते ऑब्जरवेशन करणार. आल्यानंतर ते फोटो काढणारच आहेत आणि ते नागरिकांशी संवाद साधणार आहेत. ह्या ठिकाणी महत्वाचा रोल आहे. जेव्हा ती कमिटी टीम आपल्याकडे येणार. त्यावेळेस ते ७-८ प्रश्न विचारणार आहेत. तुमचे शहर गेल्यावर्षी शहरपेक्षा स्वच्छ आहे का? त्यानंतर आपणाला नक्की सांगता आले पाहिजे की हे शहर गेल्यावर्षीपेक्षा चांगले स्वच्छ आहे असे सांगता आले पाहिजे. आपल्या माध्यमात आपल्या पदाधिकाऱ्यांच्या माध्यमात आपल्या जनतेच्या माध्यमातून लोकांना मोठ्या प्रमाणात अव्हेरनेस केले पाहिजे. इंदौरमध्ये साहेब त्या रिक्षावाल्याला सांगितले तर तो सांगतो इथे कचरा टाकू नका. इकडे आपण ते केलेच पाहिजे. आपण आपल्या माध्यमातून आपल्या पदाधिकाऱ्यांच्या माध्यमातून लोकांना अपिल करुन स्वच्छतेबद्दल जनजागृती मोठ्या प्रमाणात केले पाहिजे. मी म्हणतो कचरा झाडायची वेळ सुध्दा आली नाही पाहिजे दुसऱ्या माणसाने उचलणे हे कुठेतरी थांबले पाहिजे. त्या माध्यमातून ह्या गोष्टी आपण ह्या प्रमाणात जनजागृती करायची आहे. तसेच ते आल्यानंतर सिटीझनला प्रश्न विचारणार आहेत. आपल्याकडे कचरा वेगवेगळा केला जातो का आपल्या घरामध्ये तर आपल्याला सांगता आले पाहिजे. ओला कचरा, सुका कचरा आपला वेगवेगळा केला जातो. आपण ३० ते ४० टक्के ओला कचरा, सुका कचरा हे करतो. आता नव्या टेंडरमध्ये एक गाडी वाढवून येणार आहे. त्यामध्ये १०० टक्के मार्क आपल्याला ते ओला कचरा, सुका कचरा करायचा आहे. त्यासाठी आपल्याला सर्व सदस्यांची मला फार मदत लागणार आहे. आपण आपल्या स्तरावर सुध्दा आपले कॅम्पींग टॉप आपल्याला करुन १०० टक्के ओला कचरा, सुका कचरा सॅग्रीगेशन प्रमाण कसे वाढविता येईल ह्यासाठी आपल्या सर्व सदस्यांची फार मोलाची मला मदत लागणार आहे. त्यामुळे मी सर्व सदस्यांना पुन्हा खास करुन विनंती करतो की ओला कचरा, सुका कचरा प्रमाण जर वाढविले तर आम्हाला साईंटिफिक प्रोसेस करता येते. ओला कचरा जो आपण कम्पोस्ट करणार आहोत आणि सुक्या कचऱ्यातील आर.डी.एफ आम्ही त्याचे रिसायकल होऊन मटेरीयल ते आपण करणार आहोत. जर आपण साईंटीफिकली प्रोसेस केले तर

आपल्याला उत्तनची डम्पींगची जी समस्या आहे ती आपल्याला कमी होणार आहे. दररोज आपले ५५० मेट्रीक टन कचरा होतो. रोज डोंगर तयार होतो. ते जर सॅग्रीगेशन चांगल्याप्रकारे झाले तिथे जर रिसायकल कचरा जर असेल ते रिसायल होऊन रिसायल करता येते. जो काही रिसायकल होऊन जो काही उरलेला कचरा असेल त्याला रेफ्युरज करुन म्हणजे एक प्रकारचे विट असते. ती कम्युनिटी व्हॅल्यु असो ती आपल्याला फॉर्निसमध्ये टाकुन जाळण्यासाठी उपयोग होतो आणि जी काही शिल्लक त्याला आपण कम्पोस्टींग करुन ती आपल्याला एस.एल. करत होते. म्हणजे १०० टक्के जवळपास ७० ते ८० टक्के आपला कचरा प्रोसेस झाल्यामुळे आपल्याला उत्तनच्या येथे जेवढा प्रॉब्लेम होत होता. तो भविष्यामध्ये प्रॉब्लेम होणार नाही. मोठ्या शहरामध्ये हाच मोठा प्रॉब्लेम आहे. तिसरे महत्वाचे म्हणजे ज्यावेळी ते सर्वेक्षणला येणार आहेत त्यावेळेस आपल्याला प्रश्न विचारतील. आपले कम्युनिटी टॉयलेट, पब्लिक टॉयलेट चांगले युजर फिल युजर आहेत का. त्या ठिकाणी रॅम्प आहेत का? लहान मुलांसाठी वेगळी टॉयलेटची व्यवस्था केली आहे का? रॅम्प आहे का, लाईटची व्यवस्था आहे का, व्हेन्टीलेशन प्रॉपर आहे का? ह्या गोष्टी ते विचारतील आणि ते काही प्रश्न विचारतील त्यावेळेस आपण पॉझिटिव्हली उत्तर त्या दिवशी देता आले पाहिजे आणि आपले शहर ओ.डी.एफ आहे का हे आपले असेल तर आपले यस. आपल्या शहरामध्ये कोणी जात नाही १०० टक्के ओ.डी.एफ फ्री आहे. असे आपल्याला जर विचारले तर आपल्याला ते उत्तर देता आले पाहिजे. ह्या गोष्टी साधारण याच्यामध्ये अभिप्रेत आहेत. याच्यासाठी दोन ठराव आपल्याला लागणार आहेत. केंद्रशासनाने जर आपल्याला रँकींग जर चांगले करायचे असेल तर आपल्याला दोन ठराव मागितले आहेत. ओ.डी.एफ म्हणजे ओपन डेफिगेशन फ्री शहर आहे. त्याचे स्टेटस मेंटेन केलेले आहे. त्यासाठी एक ठराव लागणार आहे आणि दुसरे स्टार रेटींगमध्ये प्रत्येक शहराला ते स्टार देणार. १ ते ७ स्टार पासून आपले शहर आपण क्लीन करणार आहोत. थ्री स्टार म्हणून त्याला ५०० मार्क आहेत. थ्री स्टार मध्ये काय गोष्टी येतात. १०० टक्के कलेक्शन, १०० टक्के सॅग्रिगेशन, डस्टबीन फ्री शहर आहे. प्रोसेसिंग ७५ टक्के आणि प्रोसेसिंगची ट्रीटमेंट होते आणि आपल्याकडे कोणीही गटारामध्ये कचरा टाकत नाही. आणि प्लास्टीक फ्री शहर आणि युजर चार्जेस कलेक्शन ह्या गोष्टी थ्री स्टारमध्ये आपण मोजतो. आमचे महापालिका आम्ही जे काही ॲक्सेस केले त्याच्यामध्ये आपले शहर तीन नामांकनामध्ये आपल्याला युजर होतो. तसा ठराव आपल्याला तिघांचा एक प्रोटोकॉल आहे आधी महासभेने ठराव करायला पाहिजे. आम्ही प्रत्येक प्रभाग समितीकडून ठराव करुन घेतला. सदस्यांचे पत्र घेतली. आता महासभेत अंतिम ठराव होणार आहे. तो ठराव होऊन पब्लीककडून काही सजेशन ऑब्जेक्शन मागविणार आहोत. ते मागविल्यानंतर एक अंतिम ठराव अंतिम अहवाल आम्हाला राज्यशासनास पाठविणार आहोत. राज्यशासन त्यांच्या प्रोटोकॉलनुसार केंद्र शासनाला हा ठराव पाठविणार आहे. मग केंद्रशासन आपल्याला ओ.डी.एफ मग आपले शहर थ्री स्टार नामांकनाचे सर्टिफिकेट मिळतील. मग त्या सर्टिफिकेशन मुळे ते आपल्याला ५०० मार्क मिळणार आहेत. तसेच एक ओ.डी.एफ प्लस सुध्दा ज्याचे जे नॉर्म्स आहेत त्या नॉम्स नुसार आपण आपले जे सर्व कम्युनिटी टॉयलेट, पब्लीक टॉयलेट ते साफ करुन ठेवलेले आहेत. आता रंगरंगोटी करायची आहे. त्याला मॉडीफिकेशन करायचे आहे. ते केल्यानंतर जानेवारीमध्ये स्वच्छ सर्वेक्षण होणार आहे. त्याठिकाणी आपण ओ.डी.एफ प्लस आपले जे शौचालय आपण दाखवू शकतो असे साधारणप्रकारे स्वच्छ सर्वेक्षणमध्ये येणार. यासाठी आपल्याला आपली सर्वांची मदत लागणार आहे. तिसरा महत्वाचा मुद्दा म्हणजे स्वच्छता ॲप जवळपास आपल्याला फक्त २८ हजार ॲप आपण डाऊनलोड केलेले आहेत. शासनाने टार्गेट कमी केले पहिला मोठे टार्गेट होते. आता १०० टक्के आपले टार्गेट कम्पलीट झालेले आहे. स्वच्छता ॲपच्याद्वारे आपण आपल्या तक्रारी करु शकतो. स्वच्छता ॲपच्या माध्यमातून कुठे कचरा असेल त्याचा फोटो काढून आम्हाला कळविले तर आम्ही लगेच जे टाईम लिमीट आहे. त्या टाईम लिमीटमध्ये ती तक्रार सॉल्व्ह केली तर त्याचे सुध्दा मार्क मिळणार आहेत. सगळा डाटा ऑनलाईन असतो. सर्व मॉनेटरींग केंद्र शासन राज्यशासन करतील त्याचे डे टू डे मॉनेटरींग शासन करत असते. ह्या सर्व प्रोसेमध्ये स्वच्छ सर्वेक्षणमध्ये आपल्या सर्वांना मी विनंती करतो. आपण याच्यात मोठ्या प्रमाणात हिरहिरीने भाग घेऊन होण्याऱ्या स्वच्छ सर्वेक्षणमध्ये चांगल्याप्रकारे शहराचे क्रमांक वर येईल अशी आशा करतो आणि माझे दोन शब्द संपवतो. धन्यवाद.

**धृवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम बाहेर गोंधळ चालू आहे. माझी तुम्हाला अशी विनंती आहे आयुक्त साहेब तो गोंधळ थांबवा. जे गोंधळ घालत आहेत त्यांच्यावरती योग्य ती कारवाई करा. याच्यात आम्हाला साहेब चांगला गोषवारा देता येतात. ह्या सभागृहाची काही परंपरा आहे. महापालिकेची काही रितीरिवाज आहेत. माझी विनंती आहे मॅडम आपण ५ मिनिटे सभा तहकुब करावी आणि आयुक्तांनी तिकडे जावे. त्यांच्या

काही मागण्या असतील त्यांचे काही म्हणणे असेल ते ऐकून घ्यावे नसेल तर त्यांच्यावरती योग्य ती कारवाई करण्यात यावी.

**मा. महापौर :-**

आयुक्त साहेब वह अशब्द का प्रयोग कर रहे है। ऐसा नही चलेगा। उन सबपे कारवाई की जाए और १० मिनिट के लिए मैं सभा को तहकुब करती हूँ। १० मिनिट के बाद हम फिरसे मिलेंगे।

**मा. आयुक्त :-**

केंद्र शासनाच्या निर्देशाप्रमाणे जानेवारीच्या हफ्त्यामध्ये २०१९ च्या स्वच्छतेसाठी दुबार सर्वेक्षण होणार आहे. उपआयुक्तांनी सविस्तर माहिती सभागृहाला दिलेली आहे. गेल्या वर्षीच्या सर्वेक्षणामध्ये आपले शहर राज्यामध्ये सातवे आणि देशामध्ये सत्तेचाळीस नंबरचा आहे. निश्चित आपले स्टेटस राज्यामध्ये रेकग्नाईज आहे आणि त्याबद्दल आपल्या सगळ्यांचे मी ह्या ठिकाणी अभिनंदन करतो आणि अपेक्षा व्यक्त करतो की, येणाऱ्या कालावधीमध्ये सुध्दा आपण याला प्रगतीवरच नेले पाहिजे. साधारण ती ३-४ विषय आहेत आपण तिथे काम करु शकतो. पूर्वीच्या सर्वेक्षणामध्ये आताच्या सर्वेक्षणामध्ये थोडा बदल आहे. पूर्वी ४ हजारचे मार्क होते आता ५ हजारचे मार्क झालेले आहेत. पूर्वी डॉक्युमेन्टेशन आणि व्हिजीट ह्या दोनच गोष्टी होत्या. आता मंथली एम.आय.एस ही एक पध्दत आहे. म्हणजे जे शासनाने ठरवून दिलेले निकष आहेत आणि त्यात होत असलेली प्रगती आणि त्या माध्यमातून मंथली इन्फॉर्मेशन सिस्टम असते. तक्ते असतात ते बनवून आम्ही ऑनलाईन पाठवतो आणि त्याच्यावर मिळणारे मार्क लोकांची प्रतिक्रीया म्हणजे शासनाने, केंद्र शासनाने एक तक्रारीसाठी ॲप केलेले आहे. तर साधारण २८ हजार लोकांपर्यंत हा आपला ॲप गेलेला आहे. तर मी म्हणतो हा अजून मॅक्झीमम लोकांपर्यंत गेला पाहिजे. माझी सर्व नगरसेवक नगरसेविकांना विनंती असेल त्यांच्या त्यांच्या एरियामध्ये त्या-त्या एस.आय ला घेऊन आपण कॅम्प केला पाहिजे. म्हणजे राज्य पातळीवर, देश पातळीवर आणि महापालिका स्तरावर काय चालले आहे हे लोकांना समजले पाहिजे. तर तो ॲप लोडींगचा विषय प्रत्येक नगरसेवकांनी एक मुव्हमेंट एक काम म्हणून मोदी साहेब काय म्हणतात हे जनआंदोलन झाले पाहिजे. मा. आदरणीय पंतप्रधान महोदय काय म्हणतात हे जन आंदोलन झाले पाहिजे हे केव्हा होते फक्त ऐकणे, बघणे एवढ्यावर जन आंदोलन होत नाही त्याच्यात भाग घेणे फार आवश्यक आहे. स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये जो जन आंदोलनाचा इतिहास आपण पाहतो. प्रत्येकाने हातात झेंडा घेऊन आपआपल्या कुवतीप्रमाणे भाग घेतलेला. आपण अभ्यासलेला आहे. तसेच ह्या मुव्हमेंटमध्ये माझी आपल्याला विनंती आहे आपण वॉर्डचे प्रमुख आहात. तर आपल्या ४-४ सदस्यांनी एकत्र येऊन सर्व पार्टी विरहित त्यांनी हा कॅम्प केला पाहिजे. त्यामध्ये ३-४ प्रकारचे काम केले पाहिजे. इंदौर आपण म्हणतो माझी विनंती अशी राहिल की लोकांनी याच्यामध्ये मिरा भाईंदर बोलले पाहिजे. लोक इथे बघायला आले पाहिजे. हे केव्हा शक्य होते. एका प्रभागाचे ४ सदस्य एकत्र येऊन त्यांनी हा ॲप घरोघरीपर्यंत प्रत्येकाच्या मोबाईलवर पोहोचवले पाहिजे. हा पहिला कार्यक्रम. दुसरा कार्यक्रम आतापर्यंत आपण कचरा वर्गीकरणाचा प्रयत्न केला. लोकांना विश्वासात घेण्याचा प्रयत्न केला. लोकांनी अनुकरण पण केले पण आपल्याकडे यंत्रणा वेगळ्या नसल्यामुळे परत आपण ते एकत्र करायचो म्हणून त्याची एंड टू एंड प्रक्रिया होती ती आपल्याकडे व्हायला थोड्या अडचणी होत्या. आता आपण त्या पूर्ण करण्याचा प्रयत्न करत आहोत. आपण ड्राय वेस्टचा १०० टक्के प्रक्रिया करण्याची आपली कॅपेसिटी झालेली आहे. तर आपण कचरा वर्गिकरणाचा येणाऱ्या कालावधीमध्ये १०० टक्के प्रयोग केला पाहिजे तरच याला सोल्युशन आहे. आपल्या मान्यतेने तुम्ही १० प्लान्टला मान्यता दिलेली आहे. आणि ८ चे टेंडर प्रोसेसला मान्यता दिलेली आहे. २ च्या साईट ते सुद्धा आम्ही अंतीम करणार आहेत. अजुन जास्तीचे साईट येणाऱ्या सभागृहामध्ये मी देणार आहे. म्हणजे द्या शहरामध्ये एकाच ठिकाणी कचऱ्यावर प्रक्रिया न करता विविध ठिकाणी कचऱ्यावर प्रक्रिया करून हा प्रश्न आपणाला निकाली काढायचा आहे. आणि त्यामध्ये मी सर्व पक्षीय सदस्यांना, पदाधिकाऱ्यांना धन्यवाद देतो. त्यांनी सुरतचे काम बघितले माझ्या सोबत. माझ्या सोबत पुण्याचे काम बघितले. हा वर्गिकरणाचा दुसरा मुद्दा झाल्यानंतर तिसरा महत्त्वाचा मुद्दा आपल्याकडे हाऊस सोलमध्ये मोठ्या प्रमाणात कचऱ्याचे संकलन होते. ॲमेनी स्तरावर काही-काही ठिकाणी झोपडपट्टीच्या भागात अडचणी आहेत. परंतु व्यवसायिक कचरा अजुनही १०-११ च्या नंतर ९ च्या नंतर दुकाने उघडल्यानंतर रस्त्यावर टाकण्याचे प्रमाण आहे. थोड्याफार प्रमाणात संध्याकाळच्या प्रमाणात जास्तीचे प्रमाण आहे. तर माझी विनंती राहील हे ४ प्रभागाचे आपले एका प्रभागातले ४ सदस्यांनी याची खरीच जनआंदोलन केले पाहिजे. आपल्या प्रोग्राम प्रमाणे कॅम्पेन केला पाहिजे. विकली एक स्ट्रीट घेतला पाहिजे. चार सदस्य एकत्र येऊन जर लॉग मार्ज केले त्याच्या सोबत मी आहे, मा. उपायुक्त आहेत, आपले अधिकारी कर्मचारी आहेत. आपण जसे मार्ज करत जर रस्त्याने सांगत गेलो तर लोकांमध्ये फार मोठा त्याच्यामध्ये बदल होऊ शकतो. आणि १०० टक्के लोक आपल्याला सहकार्य करू शकतात की,

व्यवसायाच्या ठिकाणी सुद्धा कचरा रस्त्यावर न टाकता मी तर म्हणतो व्यवसायाचा कचरा आपण १०-१० दिवस एकत्र ठेवले तर काही होत नाही. लगेच त्याला रॅप काढला, त्याला बाहेर टाकल, अमुक वाढले, लगेच बाहेर टाकले, काही गरज नाही. ही मास मुव्हमेंट करण्यामध्ये आपले योगदान आवश्यक आहे. त्याला म्हणतात प्रोव्हिगेशन ऑफ लिटरींग. काही कचरा सुद्धा रस्त्यावर आला नाही पाहिजे. आणि तेव्हा शहर स्वच्छ दिसते. तुमच्या लक्षात येतो का हा मुद्दा, तर माझी आपल्याला हात जोडून नम्र विनंती आहे. हे काम प्रशासनाचेच आहे. प्रशासन तर इतके वर्ष करतच आलेले आहे. पण त्याच्यात जो गुणवत्तेचा बदल होत नाही त्याच्यामध्ये लोकांचा सहभाग मोठा पाहिजे. आणि मला खात्री आहे. इथे एक-एक बसलेला सदस्य हा खुप मोठ्या लोकांचा प्रतिनिधी आहे. आणि त्यांच्या शब्दाला जी इमेज आहे ती इनकेस गेले तर आपण एक महिन्यात हा बदल होऊ शकतो. तर माझी विनंती राहील. आपण हा वैयक्तीक मोटो त्याच्यात काही खर्च नाही. आता आपण याच्यामध्ये अजुन डब्बे देण्याचा निर्णय घेतलेला आहे. मी नगरसेवक निधी आणि प्रभागसमिती निधी सुद्धा तुमच्या वॉर्डात तुम्ही संकलनासाठी डबे देण्याचा निर्णय मी ह्या ठिकाणी जाहीर करतो आणि तसे आदेश निर्गमीत करतो. ही संकलनाची प्रक्रिया आणि रस्त्यावर कचरा न पडण्याची प्रक्रिया जर आपण १०० टक्के केले तर आपले शहर १०० टक्के क्लिन होईल. आणि मला विनंती आणि अपेक्षा राहील की, आपण हे दोन काम करू थोडे दिवस जातील. पण येणाऱ्या काळामध्ये याच्यावर आपल्याला काम करायचे आहे. याच्या सोबत आपल्या भागात असलेले शौचालयाचे कार्यक्षमतेने वापर होणे त्याचे बेस ऑर्गनाईजेशन करणे अपेक्षित आहे. कदाचित ते प्रशासनाकडून राहिलेले आहे. आम्ही तोही प्रयत्न करू. जे वापरकर्ते आहेत त्यांच्या मालकीचे स्वच्छतागृह झाले पाहिजे. त्यांनी कॉर्पस फंड केला पाहिजे. त्याचा समाजाला एक ग्रुपचा नियंत्रण केले पाहिजे. त्याचे रजिस्ट्रेशन सुद्धा करता येतो. लोक मा. आयुक्तांच्या माध्यमातून धर्मदायच्या माध्यमातून आणि त्याच्यात चेअरमन सदस्य कोषागार नीट करता येतो. त्याचे बँक अकाउंट करता येतो. आणि त्याच्यात चंदापेटींग करून फॅमिलीला मंथली पासेस देऊन तो जो सार्वजनिक शौचालय आहे. आपण सुलभचे किंवा वेगळे जसे असतात तसे कार्यक्षमतेने ते आणु शकतो. फक्त कोणी तरी त्याला तिथे लिडरशीप आपल्याला आवश्यक आहे. आणि एम.एम.आर.डी.ए. च्या माध्यमातून जे शौचालय बांधलेले आहेत त्याला हीच अपेक्षा होती. वन टाईम कॅपीटल इन्व्हेसमेंट झाल्यानंतर त्याचा जो वापर आहे ते लोक सहभागातून झाले पाहिजे. त्याच्यावर मेन्टेनन्सचा खर्च महानगरपालिकेने नाही केली पाहिजे. ते लोकांना वाटले पाहिजे. हे आपले आहे. जस घर आहे ना तसे. काही काही ठिकाणी ज्या लोकांनी याचे संघटन केलेले आहे. तिथे रांगोळ्या काढतात. काही काही ठिकाणी कदाचित आपल्या शहरात एखादे तसे राहु शकते. तेवढ्याच भागामध्ये फुलांचे गार्डन्स करतात. केअर टेक परसन असतो ना किंवा याचा कोषाध्यक्ष असतो. आणि आम्ही ठाण्यामध्ये काही ठिकाणी केलेले आहे. तर आपल्या शहरात सुद्धा तसे प्रायोगिक तत्त्वावर जर आपण पुढे आलात तर आम्ही आपल्यासोबत काम करायला निश्चितच तयार आहोत. आमच्या लेव्हलला १०० परसेंट करण्याचा आम्ही प्रयत्न करतो. पण शेवटचा माणुस तुम्हाला जितका रिस्पेक्ट करतो, प्रवाहात येतो तसा आमच्या माध्यमातून यायला फार वेळ लागतो. तर माझी विनंती राहील, टॉयलेट कार्यक्षमतेने वापर होण्यासाठी आपले योगदान अपेक्षित आहे. आणि महत्त्वाचा प्लॅस्टिक बॅन, थर्माकॉल बॅन यामध्ये सुद्धा आपण कॅम्पीयन त्याच्यामध्ये मॉस मुव्हमेंटचे कार्यक्रम आपण मोठ्या प्रमाणात शाळेच्या विद्यार्थ्यांना, ह्यांना व प्रेस माध्यमांना आपण घेतलेले आहे. सगळे ह्याला मदत करण्यासाठी तयार आहेत. पण मला अपेक्षा आहे की, आपल्या युनिटवर हे विषय घेऊन जाऊन त्या युनिटला महापालिका समजून आपले तिथले कार्यपालन होण्यासाठी आपण पुढे यावं. आम्ही निश्चित डे-नाईट आपल्यासोबत त्यामध्ये राहू. रात्रीच्या नऊला ही तुम्ही ऑर्गानायझेशन केलं तर आम्ही तिथे येऊन संबोधन करू. लोकांचा सहभाग होणयासाठी मोठ्या प्रमाणात काम करू. यामाध्यमातून ३-४ विषयावर जर आपण काम केले. आता पाण्याचे आपण चांगल्या पद्धतीने अचीव्ह केलेले आहे. सिवरेजचे आपण मोठ्या प्रमाणात एस.टी.पी. आता होत आलेले आहे. ह्या तांत्रिक बाबी आहेत. ह्या ट्रीटमेंट होणे, आता सिवरेजमधून जो वेस्ट जातो पाणी समुद्राला त्या पाण्याचा गार्डनसाठी उपयोग, बांधकामासाठी उपयोग आणि इंडस्ट्रीजसाठी उपयोग होण्यासाठी येणाऱ्या सभेमध्ये मी विषय देणार आहे. त्याची मोठी कार्यक्षम यंत्रणा सर्व पाणी एकत्र आणु शकत नाही. पण त्याला एखादा ठेकेदार निश्चित करू शकतो. सर्व पाणी टॅकरने तो ऑपरेट करू शकतो. टेरी टेरी मध्ये जे कंस्ट्रक्शन चालू आहे त्याला तो पाणी विकू शकतो. आपल्या गार्डनला तो पाणी माफक दरात देऊ शकतो. आपल्या सॉल्टी पाण्याने कंस्ट्रक्शन करण्यापेक्षा ह्या चांगल्या पाण्याने जर कंस्ट्रक्शन झाले त्यांची गुणवत्ता सुद्धा वाढू शकते. तर येणाऱ्या काळामध्ये आपल्या सेफ्टीक टॅंकमधून जो समूद्राला पाणी जातो त्याचा युज करण्याचा मी विषय देणार आहे. आणि त्याची एक मोठी अच्छीव्हमेंट आपल्या शहरात होईल. तर आपण तो सुद्धा विषय समजून घेतला पाहिजे. अशा तीन-चार माध्यमातून जर आपण काम केले तर मा. पंतप्रधान

महोदयांनी आपल्या वर जी जबाबदारी टाकलेली आहे. याच्यामध्ये प्रेस माध्यम इलेक्ट्रॉनिक मिडीया, व्हेरीप्रियाव्टीव्हेर ते खांद्याला खांदा द्यायला तयार आहेत. आपण त्याचा व्यवस्थित वापर आपण जनमाणसांपर्यंत पोहोचून आज जे राज्यशासनाने, केंद्रशासनाने दोन विषय ह्या ठिकाणी दिलेले आहेत त्याला मान्यता द्यावी ही माझी विनंती.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, मा. आयुक्त साहेब, आपले जे एम.एम.आर.डी.ए. ने शौचालय बनविलेले आहेत. तर पुर्वी आपण फॅमिलीचे एका घराचे आपण काही तरी ३०रू, ४०रू, ५०रू आपण घ्यायचो. आता मधल्या काळामध्ये काय झाले ते बंद केले आणि आपण त्याचा ठेका काढला आणि त्या ठेकेदेरांकडून आपण ती साफसफाई सर्व करून घेतो पण साहेब ते सर्व चुकीचे झाले आहे.

**मा. आयुक्त :-**

याच्यामध्ये काय झाले वास्तविक त्या लोकांतून चालविले पाहिजे. आपण ठेका काढुन त्याची साफसफाई किती वर्षे करणार. एक दिवस असा येईल, साफ करायला कोणी मनूष्य भेटणार नाही. आपण ते वापरलेच पाहिजे. कार्यक्षमतेमुळे तिथे घाण करण्याचा संबंध येत नाही. पाणी आहे, फ्लॅश आहे तर गैरसोईने आपण वापरतो आणि दुसऱ्याकडून साफ करून घेतो हे अमाननिय आहे. आणि आपण त्याच्यावर मोठ्या प्रमाणात खर्च करतो तो खर्च वाचेल. यामध्ये जर मोठ्या प्रमाणात हे लोकसहभागातून झाले तर हा निधी आपण दुसऱ्या कामाला वापरू शकतो.

**नयना म्हात्रे :-**

साहेब, ह्या सभागृहाला माझी अशी विनंती आहे. मा. महापौर मॅडम, मा. आयुक्त साहेब, तुम्हाला की जे पुर्वी चालत होते. आपण एका घराचे ५०रू घेतो, ३०रू घेत होतो. साहेब तीच पद्धत चालु करा. जेणेकरून लवकरात लवकर साफसफाई पण होईल. आणि लोकांना त्याची जाणीव होईल की, आम्ही याचे पैसे करतो.

मा. आयुक्त :-

तिथल्या लोकांना प्रवर्त करणे आपली जिम्मेदारी. मी याचे अप्रेशियेट करून निर्णय घेऊ.

**प्रशांत दळवी :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलतो. अतिशय सुदंर आणि चांगले असे निवेदन पानपट्टे साहेब आपण ही केले. मा. आयुक्त साहेबांनीही केले. एक लोक प्रतिनिधी म्हणुन त्या वॉर्डाचा सेवक म्हणुन आमचाही हातभार त्याला लागेल त्यात दुमत नाही. परंतु मा. आयुक्त महोदय, काही सुचना मला इथे सांगायच्या आहेत. आपण मिरारोड जर बघितला तर, आपण ११ ते सकाळी ७ पर्यंत ७ ते ८ टन कचरा आपण नाईटला उचलतो. आणि तो कचरा आपण काही सोसायटयांवर प्रतिबंध लावत असलात की, ओला कचरा वेगळा करावा आणि सुखा कचरा वेगळा करावा. तर हा जो काही ७ ते ८ टन कचरा निघतोय मा. आयुक्त साहेब हा फेरीवाल्यांचा कचरा आपण उचलत आहोत म्हणजे आपण आता प्लास्टीक बंदी पण केलेली आहे. परंतु तुम्ही जर बघाल हा जो ७ ते ८ टन कचरा निघतो. मा. महापौर मॅडम, त्यामध्ये भरपूर प्रमाणात प्लास्टीकच्या पिशव्यांचा समावेश असतो. आणि पुर्ण ती कुजलेली भाजी किंवा दुसरे पदार्थ हे सर्व रोड वरती चायनीजच्या गाडया वगैरे त्या काही लागलेल्या असतात. त्याच्यावरती जो पर्यंत आपण प्रतिबंध लावणार नाही. ७ ते ८ टन कचरा पानपट्टे साहेब तुम्ही सांगा की, मिरारोड विभागाला रात्री ११ वाजे पासून सकाळी ७ आणि त्याच्यात एक जो संप असेल किंवा तो कर्मचारी आला नाही तो पुर्ण रस्त्यावरती म्हणजे लोकांना तेथून ये-जा करताना त्यांना एवढया दुर्गंधीला सामोरे जावे लागते. तर माझी मा. महापौर मॅडम की ह्या विषयावरती थोडा गांर्भियाने लक्ष द्यावे.

**रोहिदास पाटील :-**

एक विषय पानपट्टे साहेबांनी सफाईबद्दल सांगितला त्यातली एक त्रुटी म्हणून सांगत आहे की, असे अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. आमचा प्रभाग जो आहे तो इंडस्ट्रीयल प्रभाग आहे. साहेब, मी पुन्हा पुन्हा विनंती करतो की त्या इंडस्ट्रीमध्ये अशा विहीरी आहेत त्याचे पाणी ते कामगार घेतात आणि रस्त्यावर तिथे अंघोळी करतात. पानपट्टे साहेबांना लेखी दिले, अनेक वेळा दाखविले, अनेक वेळा त्यांना विनंती करतो की, विहीरी ज्या आहेत त्या बंद झाल्या पाहिजेत. त्यांनी अंघोळी आतमध्ये केल्या पाहिजेत म्हणजे रस्ता जो ओला दिसतो, घाण दिसतो ते नाही दिसले पाहिजे. ज्याच्यामुळे इतका आटोकाट प्रयत्न करून सुध्दा आपण जर तिथे राऊंड मारला तर तुम्हाला घाणच दिसणार.

**मा. आयुक्त :-**

रस्त्यावर त्यांचे प्रतिबंध केले जाईल. आपण जॉईंटली त्याच्यात भाग घेऊ.

**रोहिदास पाटील :-**

त्यांनी आतमध्ये जाऊन अंघोळ करावी आणि त्याच बरोबर अनेक ठिकाणी अशी प्लास्टीक बांधलेली मिळतात ती इंडस्ट्रीज आहे. इंडस्ट्रीज आहेत म्हणुन ते बांधतात, ते बांधलेले काढणे गरजेचे आहे. त्या प्लास्टीकमुळे काय होते कि ती हवा बंद होते आणि साफ करायलाही मिळत नाही. जो कामगार काम करतो त्याला सफाईला हवा पण मिळत नाही. असलेले सर्व कारखाने जास्तीत जास्त बफींगचे आहेत. बफींगच्या कारखान्यामध्ये श्वास घेतेवेळी ते शरिरात जातात. जेवढे असे पडदे बांधलेले आहेत ते वॉर्ड ऑफिसला सांगून साहेब काढायला सांगा.

**मा. आयुक्त :-**

काढायला सांगतो.

**मदन उदित नारायण सिंह :-**

मा. महापौर मॅडम, मा. आयुक्त साहेब, हा जो स्वच्छतेचा विषय आहे हा खुपच गरजेचा आहे. मी चार मुद्दयांवर बोलणार आहे. पहिला हे जे कॉन्ट्रॅक्टर.

**मा. आयुक्त :-**

ती चर्चा झालेली आहे त्याच्यावर बोलू नये. कृपा करून काही वेगळे असेल तर आपण मार्गी लावू.

**मदन उदित नारायण सिंह :-**

हे जे शौचालय आपण केअरटेकरला कॉन्ट्रॅक्टवरती दिलेले आहेत. पुर्वी साहेब आपण विजेचे बिल भरत नव्हतो. तेच बिल भरत होते सर्व ते सांभाळत होते. आता आपण फक्त कॉन्ट्रॅक्टरला पोसायला घेतलेले आहे. तो कॉन्ट्रॅक्टर त्या केअरटेकरला पैसे पण देत नाही, पगार पण देत नाही. स्थिती पुर्वी पेक्षा पण खराब आहे. पुर्वी कुठेही काही त्रास नव्हता. नुसतं आपण कॉन्ट्रॅक्टरला पोसायला घेतलेले आहे. दुसरा मुद्दा आपण जे बोललो, दुकानदार कचरा बाहेर काढतात. मी सांगतो माझ्या वॉर्डातला एस.आय.ला मी दोन महिने मागे लागलो आहे. साहेब तुम्ही या आपल्या अधिकाऱ्याला बोलवा आम्ही दुकानदारांची मिटींग घेऊ. त्यांची काही तयारीच दिसत नाही साहेब.

**मा. आयुक्त :-**

मी स्वतः आपल्याकडे येईन.

**मदन उदित नारायण सिंह :-**

मी दोन महिन्यापासून मागे लागलो आहे. तिसरा प्लास्टीक बंदीचा प्लास्टीक बॅगच्या नावाखाली आपण काय करतो. एखाद्या दुकानदारावर पाच हजार ची फाईन मारतो. फेरीवाल्याला पाच हजार ची फाईन मारतो. पण प्लास्टीक बॅग साठी जे होलसेलर आहेत त्यांनाच आपण बंद केले. प्लास्टीक बाहेरच्या राज्यातून आपल्या इथे शहरात आलाच नाही मग दुकानदार घेणार कोठून? नुसते गरीब लोकांना त्रास न देता. होलसेलर आणि मॅन्युफॅक्चर किंवा डिलर असतील त्यांच्यावरतीच कारवाई करावी साहेब.

**मा. आयुक्त :-**

चांगली सुचना आहे आम्ही राज्यशासनालाही त्याची विनंती करू. बाहेरच्या राज्यातून आले नाही पाहिजे आणि जे होलसेलर आहेत त्याला टार्गेट केले जाईल.

**मदन उदित नारायण सिंह :-**

चौथा महत्वाचा मुद्दा, आपली जी युनियन आहे. युनियन लिडर आपली साफसफाई व्यवस्थित चालते. त्याच्या मनात आले की, आज काम नाही करायचे तर काम बंद तर बंद. अख्खा दिवस रस्त्यावर कचरा पडलेला असतो.

**मा. आयुक्त :-**

ह्या तीन-चार महिन्यामध्ये कचरा बंद झालेला नाही. भविष्यात सुध्दा बंद होणार नाही.

**मदन उदित नारायण सिंह :-**

आता चार दिवसांपुर्वी मा. आयुक्त साहेब युनियनचा काही तरी ठाण्यावरून मोर्चा होता. ते बोलले की, सर्व कर्मचारी काम करायचे नाही ठाण्याला जायचे.

**मा. आयुक्त :-**

दुपारच्या नंतर गेले होते.

**मदन सिंग :-**

गेले पण दोन तास कोणी काम केले नाही. दोन तासानंतर अर्धे कर्मचारी आले अर्धे आलेच नाही. युनियन म्हणजे त्यांनी आंतरिक बाजु बघावी आणि आपले जे मुकादम असतात त्यांच्या सोबत युनियन लिडर पण मुकादमगिरी करतो.

**मा. आयुक्त :-**

आम्ही मानतो.

**मदन सिंग :-**

हे चारही मुद्दे साहेब लक्षात घेतले पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

ठिक आहे.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर मॅडम, मा. आयुक्त साहेब तुम्ही छान बोलतात.

**मा. आयुक्त :-**

सावंत साहेब, नुसता बोललो नाही ह्या तीन-चार विषयावर सगळयांनी मिळून निश्चित काम केले.

**अनिल सावंत :-**

हे करायलाच पाहिजे, आणि करणार साहेब. २३५ सार्वजनिक शौचालय आहेत त्याचा उल्लेख या गोषवाऱ्यामध्ये आहे. मला विचारायचे आहे प्रशासनाला, आरोग्य विभागाला प्रॅक्टीकली व्हिझीट करून तिथली नेमकी काय परिस्थिती आहे. ती ह्या लोकांनी कधी बघितलेली आहे का? साहेब त्यातली १० टक्के शौचालय सुध्दा वापरण्याच्या लायकीचे आज नाहीत. त्यामध्ये पी.डब्ल्यू.डी. चा विषय असुद्या किंवा साफसफाईचा विषय असू द्या. आज ह्या गोषवाऱ्यामध्ये आपण लिहीले आहे. उघड्यावर शौचालय करण्याची संख्या सर्व नष्ट झालेली आहे. तिथेच खालच्या पॅरेग्राफमध्ये त्यांनी लिहिलेले आहे तसेच उघड्यावर शौच करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे. यांच्यातले नक्की खरं काय? पहिले वाक्य खरं आहे की दुसरे वाक्य खरं आहे.

**मा. आयुक्त :-**

ही प्रक्रिया आहे. शंभर टक्के सर्टिफिकेशन आणि एखाद्या ठिकाणी काही ॲक्सिडंट झाला तर त्याला ॲक्शन करावीच लागते.

**अनिल सावंत :-**

काही काही ठिकाणी मोठ्या प्रमाणावर आहे. चेक करा सुभाषचंद्र बोस मैदानाकडे आपण जातेवेळी मेन रोड आहे, ज्युडीशिअल ॲकॅडमी आहे. जज लोक तिकडून जातात. मध्यंतर मोठे जे येणार होते तिथे काही तरी परदा वगैरे बांधला होता. आज मेन रोडची ही परिस्थिती आहे साहेब. साहेब, दुसरा मोठा प्रश्न आहे. जो प्रत्येक प्रभागामध्ये तो असेल हे ओपन प्लॉट आहेत. विकासकाने फक्त तिथे बोर्ड लावलेले आहेत. त्याचा ठाव ठिकाणा मिळत नाही. आज जे ओपन प्लॉट डंम्पींग ग्राऊंड झालेले आहेत. संपूर्ण कुठेही इमारतीमध्ये काम चालू असेल तर तिथे आणून कचरा टाकतात. वेळोवेळी एस.आय. यांना आपल्या डि.एम.सी.ला मी कम्पलेंट केली की त्या विकासकाला बोलवून ॲट लिस्ट त्याने पत्रा तरी मारून देत म्हणजे तिथे कचरा टाकणार नाही ते पत्र आम्ही दिलेले आहे. साहेब याच्यात प्रशासनाची भूमिका मोठी आहे. आम्ही नगरसेवक आहोत. आम्ही त्या वॉर्डमध्ये सांगतो आम्हाला पण वाटते रस्त्यावर कचरा पडू नये. ही वेळच येऊ नये असे वाटते साहेब. हे...............

**मा. आयुक्त :-**

सावंत साहेब प्रशासन डे-नाईट काम करणार आहे. याच्याही पुढे करणार आहे. पण त्याला अजुन गुणवत्ता लेव्हलला जर यायचे असेल जिथे-जिथे हे प्रयोग झालेले आहेत. तिथे लोक प्रतिनिधी पुढे येऊन ज्यांनी खंबीरपणे उभा राहीला तिथे फार लवकर बदल झालेला आहे.

**अनिल सावंत :-**

साहेब हे होणार आता जे नेक्स्ट जनरेशन आहे, माझी मुलगी ऑफीसमधुन आल्यानंतर त्यांच्या पर्स मध्ये मला रॅपर्स भेटतात. चॉकलेट वगैरे त्यांचे ते बाहेर टाकत नाहीत हे अव्हेरनेस लोकांमध्ये आहे. पण गेल्या दोन दिवसांपुर्वी साहेब इथे तुमच्या केबिनच्या बाहेर कचऱ्याचा एवढा मोठा ढिग झाला. त्यांची प्रीकोशन किंवा त्याच्यासाठी तुम्ही काय करणार? सुरूवात इथून व्हायला पाहिजे ना. मेन कार्यालयामध्ये जर ह्या गोष्टी घडत असतील एवढा मोठा कचरा त्याठिकाणी होतो आणि आपण काही करत नाही. मग लोकांना आपण काय करणार आहोत. आजकाल सोशल मिडियामध्ये साहेब ऐवढे इझी झाले आहे. एका मिनिटाच्या आत ते पुर्ण सोशल मिडियावर वायरल झाले. आम्हाला लोक विचारत होते तुमच्या पालिकेत काय चालत आहे? इकडचा कचरा तुम्ही साफ करत आहेत. साहेब ह्या गोष्टी आहेत ह्या कुठेतरी अंगामध्ये जाणवावे लागेल तर ते होणार तर आपण लोकांना सांगणार आणि लवकरात लवकर साहेब त्या कचऱ्यांचा पेट्यांचा विषय घ्या. मागच्यावेळी ते नगरसेवक प्रभाग निधी डायव्हर्ट करून रिॲप्रोप्रियेशन झाले

होते. त्याचे पुढे काय झाले माहिती नाही. त्या फंडचे ह्या हाऊस मध्ये तो रिॲप्रोप्रियेशनचा विषय झाला. कचऱ्याच्या पेट्या अजून आल्या नाहीत सहा महीने झाले त्याच्यावर जातीने लक्ष द्या.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर मॅडम, विषय चांगला आहे साहेब ह्या शहराला तीन तारांगण काय साहेब मी बोलतो एक ताराच द्या. एवढा आपला प्रयत्न केला पाहिजे. सर्वांनीच एकत्र येऊन सर्व पक्षाच्या लोकांनी प्रत्येक लोक प्रतिनिधींनी, लोकांनी, त्याच्यासाठी लागणाऱ्या जितकी जनजागृती करायची ती केली. प्रशासनाच्या कुठे तरी त्रुटी अजुन राहिलेल्या आहेत. ज्याच्यासाठी बऱ्याच जागेंवरती कमी पडतो. शेवटच्या क्षणाला तो आपल्याला त्रासदायक त्याच्याआधी चार हजार पॉईट होते. तर आता पाच हजार अंकावर आपल्याला जायला लागणार आहे. साहेब स्वच्छ भारत अभियान हा २०१४ ला मा. पंतप्रधान नरेंद्र मोदीजींनी सुरूवात केली. चांगली सुरूवात केली. गरजेची वस्तु आहे. आरोग्याशी निगडीत वस्तु आहे. तर पुऱ्या देशामध्ये त्याची अंमलबजावणी सुरू झाली. त्या कार्यक्रमाची केंद्रशासनाकडून ह्या महानगरपालिकेला अजून पर्यंत त्या विषयासाठी किती निधी उपलब्ध झाले. आम्ही मागणी केली नाही की, त्यांनी दिले नाही हा एक विषय कारण साहेब काही करायचे असेल त्याला आर्थिक मदत हा एक मोठा विषय आहे. महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती तुमच्या आणि आमच्या सर्वांच्या डोळ्यांच्यासमोर आहेच. त्याच्यामध्ये आम्हाला हे सगळे करण्यासाठी त्या विल्हेवाट कचऱ्याचे कुठे करायचे आहे. असलेले टनो टन १० लाख टन मेट्रीक टन कचरा त्याची विल्हेवाट लावण्यासाठी आपला बायोमायनिंग करायचे आहे. तो बायोमागनिंगचा प्रस्ताव प्रशासनाने मला वाटते पाठवला सहा महिने झाली. ५०-५५ कोटी रूपये यांनी त्याची मागणी केली होती. आज पर्यंत मला तरी वाटत नाही आणि आले असते तर प्रशासनाने आम्हाला सांगावे. अध्याप एक रूपया सुध्दा त्याच्यातुन आलेला नाही. एवढा मोठा प्रकल्प आपण चालवायला घेतलेला आहे. आपल्या आरोग्याला मला वाटते आपला अर्थ संकल्पातला ४० टक्के जो आपली जी निधी आहे किंवा आपल्याकडे जो खर्च आहे. ४० टक्के खर्च आपल्याला आरोग्यावर करावा लागत आहे. त्यात एक सुका कचरा ओला कचरा हा नवीन आपल्याला काम त्याच्यावरती करायचे आहेत. त्याच्यावर प्रक्रिया करायची थ्री आर इंदौरला तुमच्या बरोबरच आम्ही पानपट्टे साहेबांच्या बरोबर गेलो होतो. रियुज रिसायकल आणि रिड्युस थ्री आरचा जो मुद्दा आहे. खरं तर ह्या कचऱ्यासाठी तो आपल्याला ह्या शहरामध्ये त्याला आपल्याला राबवायला लागेल. आणि ते सर्व काही करताना आपल्याला आर्थिक बाबी आहेत त्याची अडचण आहे. त्यासाठी केंद्रशासन शासनाकडून ते मागणी केली आहे का? नाही केली आहे तर सांगा केली आहे तर सांगा. दुसरं साहेब स्वच्छ भारत अभियानांतर्गत तुमची आता जानेवारी महिन्यामध्ये तुम्ही म्हणता लोक येणार आहेत. ऑफिस आम्ही यात ठराव तुम्हाला करून देऊ तुम्ही ते पाठवाल ते तुमच्याकडे येतील. आपल्याला आपली मेहनत करायचीच आहे. बाकी साहेब आता तांत्रिक अडचणी आहेत. भुयारी गटार २००७ ला मंजुर करून दिलेली आहे. २०१८ पर्यंत भुयारी गटार बऱ्याच झोनमध्ये कार्यरत नाहीत. अजुनही आमचे मलमुत्र त्या स्टॉवॉटर ड्रेनेजमध्येच जात आहे. त्याला कोण जबाबदार राहील? ते गृहीत धरले जाणार नाही का? ठेका अजून दिलेला नाही. नवीन ठेका जो आपल्याला द्यायचा आहे तो पण अजून दिलेला नाही. प्रक्रिया करण्याचा जो विषय आहे तो अजून प्रलंबित आहे. कारण उत्तन मध्ये जी परिस्थिती आहे तिथे करू देत नाहीत. आपल्याला ८-१० जागा दुसरे आपण निश्चित केलेल्या आहेत. पुण्याला आम्ही तुमच्याच बरोबर गेलो होतो. बायो फ्युल त्याच्यावरती प्रक्रिया करून बायो फ्युल निर्मित करून त्या ओल्या कचऱ्याचे कंम्पोस्ट तयार करायचा तो एक प्रकार आपल्याकडे प्रलंबित आहे. असे तर नाही घाईगर्दीने आपण करायला निघालो. उद्या हा सुध्दा विषय आम्ही पाठवला. पुर्वी सातव्या क्रमांकावर होतो असे मला माहित पडले. सातपेक्षा आपण खाली गळगळत खाली परत आलो असे व्हायला नको. आपलीच नामुश्की होईल म्हणून माझी अशी आपल्याला विनंती सर्व बाबी चाचपणी केल्यानंतरच अशा कामाला आपण सुरुवात करावी साहेब केंद्र शासनाचा विषय साहेब मी जो मुद्दा तुम्हाला मांडलेला आहे. त्याच्यावरती विशेष लक्ष द्या कारण बऱ्याच महापालिकेने आपला प्रस्ताव पाठविलेला आहे. साहेब आणि त्याचा निधी उपलब्ध झाला की नाही माहित नाही. प्रस्ताव पाठविलेले हे खरे आहे आणि आपण पाठविलेले आहेत की नाही त्याची तुम्ही आम्हाला माहिती द्यावी.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर महोदय, केंद्र शासन, राज्य शासन स्वच्छतेच्या अनुषंगाने जे-जे विषय आहेत त्यामध्ये भरीव असे आर्थिक अनुदान आणि मदत देत आहेत. ह्या महापालिकेलाही मिळाले आहेत. तर त्या वेगवेगळ्या योजना असतील. वेगवेगळ्या माध्यमातून असतील पाणी पुरवठ्यासाठी मोठ्या प्रमाणात निधी ह्या शहराला भेटलेला आहे. मलनिःसारणाला मोठ्या प्रमाणात ह्या शहराला निधी भेटलेला आहे. आपण म्हटल्याप्रमाणे बायोमायनिंगसाठी आपण डी.पी.आर दिलेला आहे आणि त्याची स्क्रुटीनी झालेली आहे.

अंतिम टप्प्याच्या सॅन्शनसाठी तो आहे. आता आपण इतरत्र १० ठिकाणी जो करतो त्याच्यासाठी आपल्याला फायनान्स कमिशनच्या रिकमेन्टेशनमध्ये ५० टक्के निधी त्याच्यावर खर्च करण्यासाठी अनुमती दिलेली आहे. आपल्याकडे परिवहनची अडचण होती. तर काही निधी आपण परिवहन सेवेला त्याच्यात बसेस, डेपो आणि वन बँकेचा प्रोजेक्ट ह्याला वर्ग करण्यासाठी दिलेला आहे. तर ह्यामध्ये निधीची कमतरता नाही. शासन पाठीशी आहे. आपण सगळ्या लोकांचा सहभाग घेऊन हे काम करणे अपेक्षित आहे. आणि हे अजुनही तुम्ही काही म्हणतात त्याप्रमाणे वेगवेगळे आपण प्रस्ताव डी.पी.आर. करुन यामध्ये निधी उपलब्ध केला जाईल.

**जुबेर इनामदार :-**

२०१४ ते २०१८ पर्यंत केंद्र किंवा राज्य शासनाच्या माध्यमातून महापालिकेला स्वच्छ भारत अभियानांतर्गत किती निधी उपलब्ध झाला.

**मा. आयुक्त :-**

वित्त आयोगाचे दरवर्षी ३६ कोटी रुपये भेटतात. त्यात ५० टक्के ह्या बाबींवर खर्च करण्यासाठी तरतुद आहे. तर ह्यावर्षी सुध्दा आपल्याला ३६ कोटी रुपये मंजूर झालेले आहेत.

**जुबेर इनामदार :-**

प्रचलित पध्दत आहे. वित्त आयोगाची की आपल्याला आरोग्यासाठी ५० टक्के खर्च करावेच लागतील. माझा प्रश्न स्पष्ट आहे २०१४ ते २०१८ स्वच्छ भारत अभियान अंतर्गत ह्या प्रकल्पाअंतर्गत.

**मा. आयुक्त :-**

हे कन्व्हर्झन स्कीम आहे. ह्यामध्ये राज्य शासनाच्या, केंद्र शासनाच्या स्थानिक ज्या-ज्या योजना आहेत त्या सगळ्या योजनांचे याच्यात कनर्व्हशन करणे अपेक्षित आहे. आणि जिथे जिथे त्याच्यात निधी भेटतील ते प्रस्ताव करुन हे काम करणे अपेक्षित आहे. असे स्पेसिफिक ह्या विषयासाठी निधी अशी ह्याच्यामध्ये बाब नाही.

**जुबेर इनामदार :-**

निवेदन तुम्ही चांगले करता सारासर करु नका.

**मा. आयुक्त :-**

हा बेसच आहे. ह्या योजनेचा संत गाडगेबाबा असो की आताचे स्वच्छता योजना असो हे सगळ्या योजनेचे एकत्रित करुन मॅक्झिमम निधी याच्यामध्ये उपलब्ध करुन काम करण्याचे निर्देश आहेत आणि त्या पध्दतीने आपण करतो.

**जुबेर इनामदार :-**

माझा तोच प्रश्न आहे. स्वच्छ भारत अभियान अंतर्गत ह्या महापालिकेला किती निधी उपलब्ध झालेला आहे. २०१४ ला सुरुवात करण्यात आली आणि आतापर्यंत आपल्याला किती निधी उपलब्ध झाला.

**मा. आयुक्त :-**

दरवर्षी वित्त आयोगाच्या रिकमेन्टेशनमध्ये ३६ कोटी रुपयेमध्ये ५० टक्के ह्याचा निधी आहे त्याचे स्टॅंडिंग ऑर्डर आहेत.

**जुबेर इनामदार :-**

ते धोरण आहे साहेब. हे आपले धोरण नाही.

**मा. आयुक्त :-**

त्याशिवाय आपल्याला विशेष नाले ट्रेनिंगसाठी पहिला निधी मिळालेला आहे. अजून १०० कोटी आपल्याला मिळालेले आहेत. त्याचे काम २२ नाल्यांचे चालू आहेत.

**जुबेर इनामदार :-**

भुयारी गटाराचे सांगा.

**मा. आयुक्त :-**

भुयारी गटारसाठी मेजर निधी मिळालेला आहे. पाणी पुरवठासाठी मेजर निधी मिळालेला आहे. आपण निधी मिळाला नाही असे म्हणू शकत नाही.

**जुबेर इनामदार :-**

स्वच्छ भारत अभियान आहे.

**मा. आयुक्त :-**

सॅलिटेशन हा स्वच्छ भारत अभियान आहे. मलनिःसारण हा स्वच्छ भारत अभियान आहे. शुध्द पाणी स्वच्छ भारत आहे ५-६ गटाची ही योजना आहे.

**जुबेर इनामदार :-**

केंद्र शासनाने गांधीजींचा चष्मा आपल्याला लावला मोठी चळवळ चालू करायला सांगितली. निधी किती दिला?

**मा. आयुक्त :-**

मग आता आपल्याला मी तेच सांगत आहे.

**जुबेर इनामदार :-**

सर पाणी पुरवठ्याचा विषय मी करत नाही. भुयारी गटाराचा.....

**मा. आयुक्त :-**

तुमचे गैरसमज तुम्ही बाजूला काढा. या नॅशनल प्रोग्रामच्या अंतर्गतच महापालिकेला आता डायर्व्हशन झालेले आहे आणि त्यासाठीच हा निधी आलेला आहे. सॉलिटेशन प्रोग्रामच्या अंतर्गत पाणी पुरवठा मलःनिसारण नाले ट्रेनिंग..........

**जुबेर इनामदार :-**

ह्या योजना २०१४ च्या आधीच्या आहेत.

**मा. आयुक्त :-**

आधीचे, बाहेरचे हा माझा शब्दप्रयोग नाही.

**जुबेर इनामदार :-**

ही योजना आहे २०१४ च्या नंतर. मा. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी साहेबांनी ही योजना राबवायला सांगितली आहे. त्या योजनेअंतर्गत आपल्याला किती पैसे प्राप्त झालेले आहेत.

**मा. आयुक्त :-**

ह्यावर्षी १९ कोटी रुपये याच्यासाठी आम्हाला मिळालेले आहेत.

**जुबेर इनामदार :-**

पालिकेकडे आले आहेत का?

**मा. आयुक्त :-**

हो आणि त्याच्यातुन आपल्याला हे जे प्रस्ताव करायचे आहेत १० ठिकाणी आपण ते प्रस्तावित केलेले आहेत आणि जो आता आपल्याकडे उत्तनला प्रोजेक्ट चालू आहे त्याच्यावर सुध्दा आपण कॉन्सनट्रेट करत आहोत.

**जुबेर इनामदार :-**

आरोग्य विभागाला माहिती नाही का १९ कोटी रुपये आले आहे?

**मा. आयुक्त :-**

आरोग्य विभागाला माहिती न होण्याचा विषयच नाही.

**जुबेर इनामदार :-**

त्याच्यामध्ये मी घेतलेली माहितीनुसार काही तरी दिड दोन कोटी रुपयेच आले आहेत. ते ही हगणदारी मुक्त गाव.

**मा. आयुक्त :-**

नुसते त्या एका हेडचे घेत आहेत त्याच्यात खुपे वेगळे आहेत. आता नाले सफाई याच्या कामासाठी नाले ट्रेनिंगसाठी १०० कोटीचा आपला प्रस्ताव आहे. आता तुम्ही तो स्वच्छतेचा भाग नाही म्हणणार तर वेगळी बाब आहे.

**जुबेर इनामदार :-**

स्ट्राँग वॉटर ड्रेनेजचा विषय नाही. नगरोत्थानाचा विषय नाही. मी म्हणत आहे साहेब.

**मा. आयुक्त :-**

तो शासनाचाच भाग आहे.

**जुबेर इनामदार :-**

बरोबर आहे पण तो उघडे नाले बंद करण्याचा म्हणजे नैसर्गिक नाल्यांना बंदीस्त करण्याचा नैसर्गिक नाल्यांना मजबुती करण्याचा विषय होता.

**मा. आयुक्त :-**

हा विषय पाण्याचे शुध्दीकरण. पाण्याची प्रक्रिया, कचऱ्याचे वर्गीकरण, कचऱ्याची प्रक्रिया शहरातील जे नाले आहेत........

**जुबेर इनामदार :-**

आताच साहेब पालिकेला १९ कोटी अमृत योजनेचे आलेले आहेत.

**मा. आयुक्त :-**

फायनान्स कमिशन मधले आहेत.

**जुबेर इनामदार :-**

तेच अमृत योजनेचे आलेले आहेत. म्हणजे आधी नगरोत्थान होते. फक्त नाव बदललेले आहे. २०१४ मध्ये बरेच काही नावे त्यांनी बदल केलेले आहेत. म्हणजे अर्थात साहेब पैसा आलेला नाही.

**मा. महापौर :-**

इस बारे में बहुत चर्चा हो गयी है। अभी ठराव पढेंगे।

**मर्लिन डिसा :-**

मॅडम मेरा कुछ डाऊट्स है तो मुझे क्लेरिफिकेशन चाहिए था। आयुक्त साहेब तुम्ही जे बोलले त्याबद्दल धन्यवाद. आमचे पूर्ण आम्हाला कोऑपरेशन मिळेल. पानपट्टे साहेबांनी जे मोठे लेक्चर दिले त्यांच्या विषयी मला थोडे काही डाऊट्स होते. हे ज्या टॉयलेटला पाणी कनेक्शन आपण देतो ते फ्लश करण्यासाठी देतो ना तर ते पिण्याचे पाणी कनेक्शन आहे की......

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

सध्या ते पिण्याचे पाणी आहे.

**मर्लिन डिसा :-**

लोकांना पिण्याचे पाणी कमी मिळत आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

रिसायकल वॉटर त्या पध्दतीने आपण करणार आहोत.

**मर्लिन डिसा :-**

रिसायकल केलेले पाणी चांगले आहे. मग हे जे स्वच्छता आपण जे बोलतो ते फक्त कचऱ्याविषयी आहे. क्लिनलेस विषयी आहे ना दुसरे पण काही आम्ही आजूबाजूला बघणार आहोत.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

त्याच्यात बऱ्याच बाबी आहेत.

**मर्लिन डिसा :-**

त्याच्यात मला काही सांगायचे आहे. आमच्या वॉर्डमध्ये मच्छी मार्केट कुठे पण लोक बसतात. भय्या लोक येऊन कुठे पण बसतात. पूर्ण वॉर्डमध्ये एस.के. स्टोनचा जो एन्ट्री रोड आहे ते शितल नगरमध्ये आहे. वह लोग जो मच्छी बेचते है फिर वह कचरा उधर फेकने जाते है, उधर काफी गंदगी हो रही है। उधर लोगो को सोसायटी के लोगो को रहने के लिए तकलीफ हो रही है। मी दरवेळी उभी राहून गेल्या ११ वर्षापासून मी हेच बोलत आहे की, मच्छी मार्केट तिकडे स्ट्रीक्ट ॲक्शन घ्या. रविवारच्या दिवशी तिथे एवढी मोठी गर्दी असते. रविवारी तिकडे कोणीही कारवाई करायला येत नाही. खुप गर्दी असते. खुप घाण करतात. मग त्या मोठ्या रोडवर एस.के.स्टोनचा रोड सांगते, प्रायव्हेट बसेस ते तिकडे पार्किंग करुन ते ड्रायव्हर, कंडक्टर तिथे झोपत असतात. सकाळी उठून तिकडे जे पण कार्य करतात तिथल्या सोसायटीवाले तिकडून तक्रार करतात. त्यांना वाईट वाटते त्यांना बघावेसे वाटत नाही. जे पण खुल्यावर अंघोळ करतात तिकडे ते पण तुम्ही जरा बघा. ते पण स्वच्छते अंतर्गत येत आहे. कचरा जो साठतो, सृष्टीमध्ये जेव्हा आपण पेणकरपाड्यावरुन येताना जे मॅंग्रोज आहेत तिथे किती तरी डम्प केलेले आहेत. तिथे रॅबीट आहे, कचरा आहे, तिथे सर्व घाण पसरलेली आहे आणि प्लस इकडे ह्या बाजूला उत्तनला वगैरे जाताना तिकडे मॅंग्रोजमध्ये खूप कचरा जमलेला आहे. कमर्शियल हॉल्स, मॉल्स हॉटेल्स हे सर्व आता परवा एक फक्शनला मी माझ्याच वॉर्डमध्ये गेली होती. तिकडे ते प्लास्टीक बॅगमध्ये घेऊन सहकारी भांडारच्या बाहेर रात्री १०.३० वाजता तिकडे एवढा कचरा होता. तर हे पण रात्रीच्या वेळी तिथे कुत्रे, मांजरी सर्व जमा होऊन तिकडे सर्व घाण करतात आणि मॉलमध्ये जे टॉयलेट क्लिन आहेत. पण तिकडे जे पाणी वेस्ट होते. मला खुप त्रास झाला तिकडे पाणी खुप वेस्ट होते. हे मॉलमध्ये स्पेशल कमर्शियल एरियामध्ये तर ठिक आहे. टॉयलेट पण आपल्या पालिकेच्या शाळेत टॉयलेटची क्लिनलेस किती मेन्टनन्स आहे. आपल्या वॉर्ड ऑफिसेसमध्ये आपल्या हेड ऑफिसमध्ये पण इथे कचरा साठलेला असतो. घाण असते आपण जे सोसायटीला डस्टबीन जे देणार आहोत. त्याच्यात स्ट्रीकली वेटवेस्ट घेणार का मिक्स गारबेज घेणार?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

त्या सॅग्रिगेशनसाठीच आपण डस्टबीन देणार आहोत.

**मर्लिन डिसा :-**

कम्पलसरी सोसायटींना सांगायचे जे डस्टबीन.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

त्यांना सवय लावण्यासाठी आपण एक वेळेस देणार. आपण त्या सोसायटीकडून लिहून घेणार की महापालिका एकाच वेळेस देणार याच्यापुढे आपण स्वतः ठेवावे लागणार.

**मर्लिन डिसा :-**

ओनली वेट वेस्ट.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

हो.

**मा. आयुक्त :-**

वेट वेस्ट वेगवेगळ्यांसाठी आपण २-२ देणार.

**मर्लिन डिसा :-**

सोसायटीला जर त्यांचे टॉयलेट्स काही सोसायटीवाले आले होते की, त्यांच्या सोसायटीमध्ये जे टॉयलेट आहेत. दुकानवाल्यांना ते एन्ट्री जवळच आहेत. तर आता त्यांना एक मोबाईल टॉयलेट जर प्रोव्हाईड करुन ते मागे शिफ्ट करु शकतात. त्यांच्याकडे जागा आहे. अशा प्रकरणात आपण देऊ शकतो का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मोबाईल टॉयलेट आपण देऊ शकणार नाही. त्याची साफसफाई मेन्टेन होत नाही.

**मर्लिन डिसा :-**

सोसायटीवाले मेन्टेन करणार. ते दुकानवाले जाऊन जरा घाण करतात.

**मा. आयुक्त :-**

तुमचा इन्टेन्शीयल प्रस्ताव असेल तर तो देऊन टाका.

**मर्लिन डिसा :-**

हे प्लास्टीक बॅक झालेले आहेत. पण अजून जे नारळ विकतात. नारळ पाणी वाले आहेत किंवा दुसरे दुकानवाले ते अजून प्लास्टिक विकत आहेत. मी स्वतः पाहिलेले आहे. तर रिक्वेस्ट होती की, ते स्ट्रिक्ट चेक करुन त्याच्यावर कारवाई करावी. आणि सर मी तुमची वाट पाहत आहे आमच्या वॉर्डमध्ये व्हिजीट करायला.

**अनिल सावंत :-**

सृष्टीमध्ये ड्रेनेज जाफरी खाडीच्या साईटला तिथे डम्पींग चाललेले आहे. मोठ्या प्रमाणावरती तिथे अतिक्रमण झालेले आहे आणि सध्या ते रॅबीट असेच ठेवलेले आहे. ज्यावेळी तुमचे दोन दिवस सुट्टीचे असतात त्यावेळी जे.सी.बी. आणून पूर्ण लेव्हल करुन टाकतात. आज तिथे नर्सरी सुरु आहे. सर्व्हिस स्टेशन सुरु आहे. गाड्या रोडवर आलेल्या आहेत ते जरा बघून घ्या.

**राजेंद्र जैन :-**

महापौर मॅडम ठराव पडता हूँ, उसके पहले मैं यह बोलना चाहूँगा, आयुक्त साहब पानपट्टे साहबने हमारी आरोग्य समिती की मिटींग लिया था। बहुत अच्छा मिटींग लिया। उसमें आपने जो विषय लिए बहुत अच्छे समझाए। सब नगरसेवकोंको बोलो सिर्फ बात ऐसी है की मॅडमने बोला जुबेरभाई बोले यह सब विषय है। स्वच्छता अभियान है उसमें ॲप्स अगर डाऊनलोड करते है जो फोटो भेजते है महासभा में पिछले आपको हो रहा था। रिक्वेस्ट किया है की अभ्यास करने के पहले आप डाऊनलोड करेंगे यह कम्पलेंट महासभा में पहले अधिकारीयोसे मिलके पहले हो सकती थी। में बुरा नही माना लेकिन आप टाईम बहुत वेस्ट करते है। आयुक्त महोदय, महापौर मॅडम इस संदर्भ में मिटींग हुयी थी। उसमें कमी निकली की पी.डब्ल्यू.डी एम.आय कमिटी में नही है। संस्था अभियान के अंदर होता क्या है। वॉटर का एक भी आदमी नही है। लिकेज होता है टॉयलेट से लिकेज होता है। जब हम भेजते है बांधकाम को उस लिकेज को लिकेज का जो पॉईंट है टॉयलेट का वह बांधकाम उस टॉयलेट का क्यों रिपेअर करे ऐसा पालिका के पास होना चाहिए।

**मा. आयुक्त :-**

अपना प्रस्ताव करो।

**राजेंद्र जैन :-**

**गोषवारा :-**

**स्वच्छ महाराष्ट्र अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करुन राज्यातील सर्वे शहरे व पर्यायाने राज्याच्या संपुर्ण नागरी भाग दिनांक 01 ऑक्टोबर 2017 रोजी होगणदारीमुक्त झाल्याचे मा . राष्ट्रपती महोदंयाचे उपस्थितीत जाहिर करण्यात आले आहे . मिरा भाईंदर हागणदारी मु क्त झाल्यांनमर शहरातील वैयक्तिक शौचालयांची संख्या वाढवुन शहर ODF + व ODF ++ करणे व शहरातील मैला व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. मिरा भाईदर शहराचा हागणदारीमुक्त शहर हा दर्जा शास्वतरीत्या टिकवणे अनिवार्य आहे. मिरा भाईंदर शहर ODF+ होण्यासाठी आवश्यक असलेल्या कें द्र शासनाच्या अटी व शर्ती केंद्र शासनाच्या ODF+ व ODF++ च्या टूलकिट प्रमाणे कार्यवाही करण्यात आली असुन प्रभागनिहाय सर्व प्रभाग सदस्य शैक्षणिक संस्था व त्यांचे विद्यार्थी , तसेच विविध स्तरातील नागरिक यांजकडुन स्वयंघोषणा पत्र घेण्यात आले आहे . शहरातील सामुदायिक सार्वजनिक शौचालयाची संख्या पुरेशा प्रमाणात आहेत. तसेच आतापर्यंत 235 सार्वजनिक शौचालय व वयैक्तिक शौचालय बांधण्यात आली असुन यामुळे उघडयावर शौच करणाऱ्यांची संख्या समुळ नष्ट झाली आहे. इतर सुविधांमध्ये शहरातील सर्व सामुदायिक / सार्वजनिक शौचालयांचे संरचनात्म क लेखापरिक्षण केल गेल आहे .या निष्कर्षाच्या आधारावर दुरूस्ती व पुननिर्मिती करण्यात आली आहे . शहरातील वैयक्तिक घरगुती शौचालया , सामुदायिक शौचालय व सार्वजनिक शौचालयांची सेप्टिक टँक व्हॅक्युम एम्टीअर यंत्राव्दारे ठराविक कालावधी नंतर स्वच्छ करण्यात येतात व त्याती ल साचलेला मैला काढुन त्या मैलावर शहराजवळ उपलब्ध असणाऱ्या STP (Sewage Tratment Plant) मध्ये शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करुन त्याची विल्हेवाट लावली जात आहे . तसेच उघडयावर शौच करणाऱ्या दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे.**

**तरी सद्यपरिस्थितीची स्वयंमुल्याकंन व स्व यंपडताळणी करुन मिरा भाईंदर शहर हे ODF+ घोषित करण्यासाठी पात्र आहे . मिरा भाईंदर शहरातील नागरिकांना जाहिर आवाहन करणेबाबत मा . समितीची मंजुरी मिळणेस शिफारस आहे.**

**ठराव क्र. :-**

**प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्याप्रमाणे सद्यपरिस्थितीची स्वयंमुल्याकंन व स्वयंपडताळणी करुन मिरा भाईंदर शहर हे ODF+ घोषित करण्यासाठी पात्र असून मिरा भाईंदर शहरातील नागरिकांना जाहिर आवाहन करणेस ही मा. महासभा मंजुरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.**

**नयना म्हात्रे :-**

माझे अनुमोदन आहे.

**गिता जैन :-**

साहेब आता तुम्ही सांगितले मोबाईल टॉयलेट. स्वच्छता आपण ठेऊ शकत नाही. मी ॲग्री करते पण जिथे जिथे ज्या एरियात तसे तुमचे नॉर्म्स आहे एक कि.मी. मध्ये तुम्हाला एक टॉयलेट पाहिजे. माझ्याकडे आला तो साईन घ्यायला तर आपण ६० फिट पूर्ण चालले तर आपल्याला कुठेही टॉयलेट दिसत नाही. आपले ते मार्केट लागते. तिथे खरच टॉयलेटची गरज आहे.

**मा. आयुक्त :-**

मी विभागाला सांगतो आपली सुचना आणि त्या मॅडमनी ही मांडल्या काही मोबाईल टॉयलेट आपल्याकडे राहिले पाहिजे. मोठ्या प्रमाणात काही ॲग्री पिपल असतील त्यावेळेस आपल्याकडे एक सुध्दा नाही आहे.

**गिता जैन :-**

तिथे ६० फिट रोडवर जे मार्केट लागते.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

तिथे जागा असेल तर मॅडम द्या.

**गिता जैन :-**

तिथे जागा आहे.

**मा. आयुक्त :-**

मोबाईल टॉयलेट हे हॉकेजन ओरेन्टेड असले पाहिजे. परमनन्ट जर आपण दिले तर तिथे लोकांना त्रास होतो. काही फंक्शन असेल काही विशेष गॅदरींग असेल त्याठिकाणी ते.......

**गिता जैन :-**

साहेब तो ६० फिट रोडवर ते सिंगल युनिट जसे न्यु बॉम्बेला लावले आहेत तसे लावा.

**मा. आयुक्त :-**

आपण प्रयत्न करु.

**गिता जैन :-**

मी गेल्यावेळी प्रस्ताव दिला. तुम्ही सांगितले महाग आहे. आपण लावू शकत नाही. पण १-२ तरी लावा.

**मा. महापौर :-**

पुढचा विषय घ्या.

**गिता जैन :-**

महापौर मॅडम अजून माझे बोलणे संपलेले नाही. सर कुछ मॉडर्न तरीके है जहाँ हम जो कचरा जहाँ हॉरिजनेट होता है। वही हम उसको खतम कर सकते है। एक आयडीया है इव्हन वेस्टन कंट्रीज में यह आयडीया है की ऑरिझनेशन में ही उसको खतम कर दिजीए। तो अभी जो नई बिल्डींग बन रही है उन बिल्डरो को आप प्रोत्साहित किजीए की वह जो क्रशल्स है वह उधर लाते है तो उधर के कचरे हमें उठाने की जरुरत नही पडेगी।

**रिटा शहा :-**

आमच्या प्रभाग क्र. १ मध्ये मॅडम १० झोपडपट्टी आहेत आणि गणेश देवल नगर झोपडपट्टी बद्दल आम्ही खूप वेळा कम्पलेंट पण केली. तिकडे इललिगल तबेला केलेला आहे. एक नाही, दोन नाही, ३-३ तबले आहेत. साहेब ते लोक गाय आणतात. इललिगल तबेल्यामध्ये मग त्या रस्त्यावरती, मंदिराच्या बाहेर बसतात. अशा बायकांना त्या गाय देतात. मग तिकडे पण त्यांनी कमाई, इकडे पण कमाई आणि ते इललिगल पूर्ण शहरामध्ये घाण निर्माण करतात. ६० फिटचे गणेश मंदिर समोर आता कैलास मानसरोवर जवळ बालाजीच्या कॉर्नरवर आणि आम्ही नगरसेवक कम्पलेंट करणार. तर काय करणार आपले प्रभाग अधिकारी जे काही एक्स.वाय.झेड आहेत. त्यांना असे सांगतात की, अमुक अमुक नगरसेवकांची कम्पलेंट आहे. म्हणजे कसे की परत आमच्याकडे फोन जे हे गायचे प्रकरण चाललेले आहे इललिगलचे प्रकरण चालले आहे त्याबद्दल आम्ही कम्पलेंट करणार तर कशी उत्तरे मिळतात की, गाय आहे. मग ते मेनका गांधीचे नाव घेतात की आपण ते गायीचा तबेला हटवलात तर आमच्यावर एफ.आय.आर होते. आमच्यावर असे होते तसे होते मग साहेब त्या गायी उचलायचा काही तरी प्रबंध करा. आमच्या प्रभागात कमीत कमी २ ते ३ हजार डुक्कर आहेत. त्यांनी एवढी घाण केलेली आहे. त्यांचा काही तरी प्रबंध करा. साहेब आपण भाईंदर स्टेशन त्याच्यावर निधी टाकणार आणि आपण एवढे सुंदर बनवायला चाललो आहोत. भाईंदर स्टेशन जवळ जनता नगर आपला मेन रस्ता आहे. तिथे आपण फक्त ३० ते ३५ आपण मच्छीवाले लोक आहेत. त्यांना आपण शेड बांधून दिले होते. ते ही लोक रस्त्यावर आले आहेत. पूर्ण दोन्ही साईटला रस्ता जाम केला आहे. तिथे नालासोपारा, नायगाव आणि वसईवरुन मच्छीमार लोकं येतात त्यांचा फक्त टाईम होता. सकाळी ७ ते ९ आता ते सकाळी ७ ते संध्याकाळी ५.३० पर्यंत मच्छीमार बसतात आणि पूर्ण रस्त्याची घाण करुन ठेवलेली आहे. त्याच्यावर त्वरीत कारवाई व्हायला पाहिजे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो, आमचे गोवर आणि लसीकरण मोहिम २७ नोव्हेंबरपासून पूर्ण राज्यामध्ये राबवली जाणार आहे. त्यासाठी वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशनचे डॉ. विनायक जळगावकर साहेब आले आहेत. त्यांना मी विनंती करतो की त्यांचे प्रेझेन्टेशन देऊन आणि गोवर रुबेला लसीकरणची मोहिम कशाप्रकारे आपल्या शहरांमध्ये राबवली जाणार आणि त्याच्यामध्ये कशाप्रकारे आपले सहकार्य लाभणार आहे. त्याबद्दल त्यांना माहिती देण्यासाठी मी विनंती करतो.

**डॉ. विनायक जळगावकर :-**

व्यासपिठावर उपस्थित सन्मा. महोदया महापौर मॅडम यांच्या मान्यतेने तसेच आपले उपमहापौर साहेब, आयुक्त सर आणि आज उपस्थित असलेले सर्व मान्यवर नगरसेवक आणि नगरसेविका. मी डॉ. विनायक जळगावकर, वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन प्रतिनिधी, ठाणे जिल्हा, पालघर आणि रायगड यांचे

आम्ही काम बघतो जसे आता सरांनी सांगितले. गोवर आणि रुबेलाचा कार्यक्रम महाराष्ट्रामध्ये २७ नोव्हेंबरपासून आपण राबविणार आहोत. आता ऑलरेडी २१ राज्यांमध्ये हा कार्यक्रम राबविला गेलेला आहे. गर्व्हमेंट ऑफ इंडिया यांनी एक साईन केलेली आहे. सही केलेली आहे. अशा करारावर की आपण २०२० पर्यंत ह्या दोन रोगांचे गोवर आणि रुबेला ह्या दोन रोगांचे निर्मुलन करणार आहोत. जसे आतापर्यंत आपण स्मॉल पॉक्स किंवा देवीचा आजार आणि दुसरा आजार आपण जवळ जवळ निर्मुलनाच्या आपण जवळ पोहोचलो आहोत. तो आजार आहे पोलिओ आपण सगळ्यांनी त्याच्यामध्ये मोठा सहभाग घेतलेला आहे. आणि खूप चांगले काम केलेले आहे आणि त्यामुळे आपण भारतामध्ये जवळ जवळ ७ वर्षापासून एकही पोलिओची केस नाही. जगामध्ये फक्त २ देशांमध्येच पोलिओच्या केसेस आहेत. पाकिस्तान, अफगाणिस्तान आणि त्या पण फक्त २२ केसेस आहेत. पाकिस्तानमध्ये ४ केसेस आहेत आणि अफगाणिस्तानमध्ये १८ केसेस आहेत. म्हणजे जगामधून हा व्हायरस जाण्याच्या मार्गावर आहे. पुढचे २ व्हायरस आपल्याला घालवायचे आहेत. ते आहेत गोवर आणि रुबेला. ह्या अनुषंगाने २०१७ पासून भारतामध्ये कॅम्पेन सुरु केली गेली. पहिल्यांदा ५ राज्यांमध्ये ही कॅम्पेन सुरु केली गेली. साऊथ किंवा दक्षिण भारतातल्या ह्या ५ राज्यांमध्ये हा कार्यक्रम राबवला गेला. आणि त्याच्यात कर्नाटक, गोवा, पाँडेचेरी, लक्षद्वीप, तमिळनाडू अशा ह्या ५ राज्यांमध्ये हे कार्यक्रम राबविल्यानंतर तो जो अनुभव आला म्हणजे जगामध्ये एवढ्या प्रमाणामध्ये पहिल्यांदाच इंजेक्शनद्वारे लसीकरण केले गेले होते. म्हणून जगातील लोकही बघायला आली होती. इनफॅक्ट मी पण तिथे कर्नाटकमध्ये होतो. त्यावेळेला तर हे अनुभवताना जे काही एक्सपीरीयन्स आले ते घेऊन पुढच्या सगळ्या राज्यांमध्ये हा कार्यक्रम राबवून आतापर्यंत आपण २१ राज्यांमध्ये ही लसीकरण मुलांचे पूर्ण केले आहे आणि ह्या मुलांचा जो वयोगट आहे तो ९ महिने ते १५ वर्ष वयोगटातल्या सर्व मुलांना आपण हे लसीकरण करणार आहोत. म्हणजे पोलिओमध्ये आपण जेवढ्या मुलांचे लसीकरण करत होतो त्याच्यात जवळ जवळ तिप्पट मुलांना आपण हे लसीकरण करणार आहोत. आतापर्यंत आपण २१ राज्यांमध्ये १२ करोड मुलांचे यशस्वी लसीकरण केलेले आहे. यामध्ये काही मेजर साईड इफेक्ट कुठेही झालेले नाहीत आणि त्याअनुषंगाने जो वयोगट घेतलेला आहे. या वयोगटामध्ये मॅक्झीमम मुले बऱ्याच वयोगातली असतात. गोवर आणि रुबेला आजाराने ते ग्रस्त होतात. आता गोवरचा आजार असलेली मुले तुम्ही सर्वांनीच बधितले असतील यामध्ये एक पुरळ येते त्यानंतर ताप येतो, सर्दी, खोकला असतो आणि त्याच अनुषंगाने रुबेलाचा पण आजार तसाच दिसतो. पण काही मुलांमध्ये हा आजार बरा होतो आणि त्यानंतर मुलांचा मृत्यू होतो. जगामध्ये जवळ जवळ १ लाख ३५ हजार मुले दरवर्षी मिझलच्या कॉम्पलीकेशनमुळे दगावतात. आणि त्यातली जवळ जवळ ४९ हजार २०० मुले हे भारतातली असतात. जर आपण रुबेलाचा आजार बधितला तर रुबेलामध्ये पण कॉम्पलीकेशन झाल्याने मुले दगावतात. त्याचबरोबर हा आजार जर आपल्या गरोदर मातेला झाला तर त्यानंतर जे जन्मलेले बाळ असते. त्या बाळामध्ये कुठल्याही अवयवामध्ये डिफेक्ट असू शकतो म्हणजे तुम्ही ऐकले असेल. एखादे बाळ जन्मले आणि त्याच्या हृदयामध्ये होल आहे. मग अशा मुलांच्या आईला ज्यावेळेला गरोदर असते त्यावेळेला तिला कदाचित रुबेला झाल्याची शक्यता असू शकतो आणि त्यानंतर हे बाळ जन्मलेला असु शकतो. त्यानंतर आपण हा जो कार्यक्रम करणार आहोत ते दोन फेजमध्ये होणार आहे. एक ते शाळेमध्ये होणार आहे आणि त्यानंतर आपण आपल्या एरियातले जेवढ्याही एरियाज आहेत त्या सगळ्या ठिकाणी म्हणजे अंगणवाडी असतील, प्रायव्हेट डॉक्टरांचे क्लिनिक असतील अशा ठिकाणी हे सेशन करुन शाळा आणि शाळाबाह्य मुले ही कव्हर करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. त्याअनुषंगाने शाळेमध्ये सेशन्स लागतील. त्याचबरोबर आपले हॉस्पीटल्स आहेत, गव्हर्नमेंट हॉस्पीटल आहेत, डिस्पेन्सरीज आहेत. तिथे सेशन्स लागतील त्याचबरोबर आताही मोबाईल पॉप्युलेशन असेल. त्याठिकाणीही सेशन्स होतील आणि त्याचबरोबर आपल्या एरियातले जेवढे ही कम्युनिटी एरियाज आहेत. तिथेही सेशन्स केले जाणार आहेत. हा खूप मोठा कार्यक्रम आहे. स्पेशिअली यासाठी खूप मोठ्या प्रमाणावर आय.सी. केली जाईल किंवा कॅम्पेनचे प्रसिध्दी केली जाणार आहे. यामध्ये बरेचसे सेलिब्रेटीही इन्व्हॉल झालेले आहेत. त्यामध्ये सर्वात महत्वाचे म्हणजे आपले अमिताभ बच्चन ह्या कॅम्पेनमध्ये आपल्या बरोबर आहेत. त्याचबरोबर आय.सी.यू. मध्ये लोकल लेव्हल आपण आपल्याला चांगल्याप्रकारे आय.सी. करावी लागेल. जेणेकरुन सगळ्याच कम्युनिटीचा सहभाग असेल. सगळ्या लोकांचा सहभाग असेल. कार्यक्रमांमध्ये आणि आपण सर्व लोकप्रतिनिधी आहात तर ह्यामध्ये सर्वात महत्वाचा सहभाग आपलाच सगळ्यांचा असेल. यामध्ये आपल्याला इनॉग्रेशन करताना ज्यावेळेला कार्यक्रम २७ नोव्हेंबरला होईल तर आपआपल्या विभागामध्ये तुमच्या हस्ते जर इनॉग्रेशन झाले तर सर्वात चांगली गोष्ट राहील. जेणेकरुन सगळ्या लोकांचा सहभाग यामध्ये होऊ शकेल.

**मा. आयुक्त :-**

महापौरांच्या परवानगीने थोडेस ॲड करतो आतापर्यंत आम्ही टास्क फोर्सच्या ३ बैठका घेतलेल्या आहेत. गेले दोन महिन्यापासून याचे आम्ही नियोजन करत आहोत. मोठ्या प्रमाणात यामध्ये महापालिकेचे आणि राज्यशासनाचे आणि युनिसेसचे यांचा आम्ही याच्यात वापर करत आहोत. स्थानिक डॉक्टर मंडळींचे सुध्दा याला मोठा सहयोग आहे. हाऊसमध्ये काही डॉक्टर मंडळी आहेत. त्यांच्या याच्यामध्ये खुप मोठ्या प्रमाणात सहभाग आहे. सगळ्यां समितीचे सभापती आहेत. एका ठिकाणी आपल्या अध्यक्षतेखाली आम्ही नियोजन करु पण सकाळी तिथे आले पाहिजे. आणि ते या ठिकाणी तुम्ही स्थळ निश्चित करतात. तिथले शिक्षक, तिथले डॉक्टर, त्याची एक कॉर्डनेशन टाईप एक आमचे अधिकारी आपल्याला येतील. आपण एक ॲक्टीव्ह ह्याच्यात भाग घेतला तर ह्याला अजुन चांगली गती येईल. प्रशासकीय लेव्हलवर तर हा कार्यक्रम होतोय. आमच्या स्टॉफ स्पोर्सच्या मिटींगांच मोठ्या प्रमाणात प्रेसने चांगली प्रसिद्धी दिलेली आहे. ह्यामध्ये गोवर रुबेला हे दोन्ही साम्य आजार आहेत. आपण फिव्हर येतो म्हणतो ना बाळाला तर साधारणतः नऊ महिने ते साधारण १५ वर्षापर्यंतला हे होतोय. रुबेला हे थोडे निद्रेबल असतं. म्हणजे ठळक नसत. गोवर एकदम दिसण्यासारखं असतं. म्हणजे त्याच्यामध्ये खुप मोठे अपाय होऊ शकतात. म्हणजे बाळ दगाऊ शकतो. इतपर्यंत त्याच्यामध्ये आहे. तो बहिरा होतो. त्याचे लक्षण त्यांनी सांगितलेले त्याच्या डोळ्यावर परिणाम होतो. हृदयावर परिणाम होतो. मतीमंद होऊ शकतो बाळ किंवा त्याची वाढ खुंटू शकते. यकृत आणि पिडांचा जो आजार आहे तो अवयव निकामी होऊ शकतात. आणि साधारणतः हा वायरल आहे विषाणु जन्य हा आजार आहे. आणि एकाला झाला तर हजारोला होऊ शकतो. आणि साधारणतः खोकला, श्वसनाच्या माध्यमातून ह्याचा प्रसार होतो. तर आपण एकट्याने सुधरून राहुन नाही अपेक्षित आहे. पुर्ण मासली जसं पोलिओचा जसा आपण निराकण केलेले आहे तसं हे जर घालवायचा असेल तर एकाच टाईमला त्याची ट्रिटमेंट झाली पाहीजे. प्रतिकारबंधाची आणि याची मिडलची लस कम्बाईन एकच लस आहे. तर हे इंजेक्शनच्या माध्यमातुन द्यायचे आहे. तर त्यामध्ये आपला प्रतिनिधी आपण जर राहिलात तर आम्हाला अजुन शक्ती येईल आणि निश्चितच आम्हाला भुषण राहिल. माझी प्रशासनाच्या माध्यमातुन आपल्याला विनंती राहील आपण त्या दिवशी आपल्या सहकार्याच्या माध्यमातुन आपले जे काही कार्यकर्ते असणार त्यांना सगळ्यांना द्याच्यात इनव्हॉल करुन याला एक चांगल्या पद्धतीने सहयोग द्यावा ही विनंती आहे. २०८३ स्टेशन आम्ही करतोय.

**अंजली पाटील :-**

मा. महापौर महोदया, ह्यांच्या मान्यतेने मी बोलते. ह्यासाठी आपल्याला साधारणतः ४८० स्कुल आणि नर्सरी आहेत. मिरा भाईंदरमध्ये त्याचे सगळ्याचं प्रशिक्षण घेतलेले आहे. जे खाजगी प्रायव्हेट डॉक्टर आहेत. होमियोपेथी, ॲलिपेथी, आयुर्वेदीक, सगळ्या पेथींच्या डॉक्टरच आपण ऑलमोस्ट प्रशिक्षण पुर्ण केलेले आहे ५५० आणि पॅरेनच्या मिटींग आहेत. त्यांचा ही आपण सहभाग घेतोय. फर्स्ट टाईम ही इंजटेबल ऑक्सीजन कॅम्पेन आपण शाळांमध्ये राबवतोय त्यामुळे तुमचाही सहभाग मिळेल ही अपेक्षा आहे. आणि ज्यावेळेला मी शाळांचं प्रशिक्षण घेतले त्याच्यामध्ये एक साधारणतः दोन शाळा अशा आहेत की तिथे आम्हाला पी.टी.एम. किंवा कार्यक्रम घेण्यासाठी अडचणी येतात.

**मा. आयुक्त :-**

अग्रवालजीने मान्य केले ना त्या शाळेची उल्लेख करायची गरज नाही. सर्व आपल्याला सहकार्य देतील.

**अंजली पाटील :-**

पण स्थानिक नगरसेवकांचा तिथे सहभाग मिळाला तर पुढे आपल्याला कॅम्पेनला मदत होईल.

**मा. आयुक्त :-**

तुम्ही पर्सनली त्यांना कोऑर्डीनेट करा.

**अंजली पाटील :-**

के.एस.मेहता स्कूल आणि शांती पार्क आणि सिंगापूर इंटरनॅशनल स्कूल.

**मा. आयुक्त :-**

याच्यामध्ये जे एक्सपार्डनरी इनव्हार्नमेंटचे स्कूल असतात ना तिथे पालक फार सेन्सीटीव्ह असतात. ह्यांना भिती असे असते की, ह्या कॅम्पेन प्रोग्राममध्ये जर लस घेतली तर काही साईड इफेक्ट होतील. काही काही ठिकाणी तो वातावरण असतो. पण आम्ही एवढी कॉलेटी लस आहे आणि प्रत्येक ठिकाणी त्याचे स्टील बॉक्स आहेत. फक्त ह्याच्यात एकच आहे. कोणाची प्रतिकार शक्ती जास्त असते, कोणाची कमी असते. कमी प्रतिकार शक्ती असणाऱ्याला त्याला सुज येते आणि त्याला थोडा ह्युमर ताप

असतो. एक दिवस तर त्याला पॅनीक होण्याची गरज नाही. काय होतं इंजेक्शन दिलं थोडस सुज आल त्याला असा रफ केला, मग त्याची अजुन साईड इफेक्ट वाढतात. डॉक्टर मंडळी आहे.

**नयना म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेब, माझ्या वॉर्डमध्ये एक छोटीसी मुलगी आहे. अंजली मॅडमलाही माहिती आहे. तिच्या ह्दयाला छोटासा होल आहे. तर ह्या लोकांनी पण खूप प्रयत्न केला, मी पण प्रयत्न केला की, तिच्या ऑपरेशनसाठी पण तिचे पालक ऐकतच नाही. आम्ही ऑपरेशन करू देणार नाही. मी पण त्याला भेटली पण तो माणूस ऐकायला तयार नाही. तो कुठे घेवून जातो हल्ले काय बोलतात तिथे घेवून जातो. तो देव माझ्या पोरीला बरं करेल, तर साहेब ते सगळं चूकीचं होत आहे. तर माझी एकच तुम्हाला विनंती आहे की, ह्या डॉक्टरांना तुम्ही परमिशन द्या. पोलिस बंदोबस्त घेवून तरी त्या पोरीच ऑपरेशन झाले पाहिजे. नाहीतर त्या पोरीचं बरे नाही होणार.

**सुशिल अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलतो. जो केद्रशासन आणि महाराष्ट्र शासन तर्फे हा जो कार्यक्रम आलेला आहे. मिझर्स आणि रुबेला २०२० पर्यंत मिझर्सच इरेडीकेशन आणि रुबेलावर नियंत्रण हे जे उद्दीष्ट गाठून मिरा भाईंदर महानगरपालिकामध्ये जी तयारी चालू आहे, ते थोडंस जवळपासून बघण्याचा मला संधी मिळाली. एकदम चांगल्या प्रकारे खरोखरच आपले आरोग्य विभागाचे ह्या कार्यक्रमासंबंधी जे प्रयत्न आहे, त्यांचे अभिनंदन करायला पाहिजे. एवढे चांगले पध्दतीने त्यांनी हे काम केलेले आहे. शाळेमध्ये पॅरेन्ट टिचर्स मिटींग आणि आपल्या महानगरपालिका तर्फे डॉक्टर्स, तिथले टिचर्स जाऊन त्यांच्याशी संवाद घालतात. त्यांना ह्या आजाराबद्दल माहिती देतात पण त्यांचे प्रश्न खूप जास्त असतात. मुख्य प्रश्न असतात की, त्यांचा विश्वास यावर बसत नाही. त्यांना हे माहितच नसतं की, ही लस आधीपण आपल्या मुलाला लागली आहे. आणि नॉर्मल, सामान्य जे इनुनॉयजेशन शेड्युल आहे. त्यामध्ये या लसीचा समाविष्ट आहे आणि तेव्हा काही रिॲक्शन आली असेल थोडी फार ताप वगैरे तरच ती आता येणार आणि बाकीचे प्रश्न असतात. सरकारी काम है। उसमे बराबर होएगा क्या? तर अशा प्रकारच्या कमीत कमी दहा-बारा मिटींग मला अटेंड करायची संधी मिळाली तर माझे असे मत आहे की, ह्या ठिकाणी जे जनप्रतिनिधी आहेत. ह्या डॉक्टर पेक्षा जनप्रतिनीधीवर त्याठिकाणच्या रहिवाश्यांचा जास्त विश्वास असतो. बाहेरून स्पोर्ट मिळणार हे आपल्या आरोग्य डिपार्टमेंटच्या टीमवर ज्या ज्या ठिकाणी पॅरेन्ट टिचर्स मिटींग असतात किंवा ज्या डिफीकल्ट स्कूल्स आहेत त्यांच्या लिस्टींगप्रमाणे त्याठिकाणी जर जनप्रतिनिधीने स्वतःहून जावून किंवा आरोग्य विभागास संपर्क करून तिथे जाऊन त्यांची समजून घातली तर ही जे २ लाख ८१ हजार जे मिरा भाईंदरमध्ये टार्गेट आहे जे वयोगट आहे. ९ महिन्यापासुन १५ वर्षापर्यंत ते सर्व आपल्याला संपुर्ण करता येईल. आणि ज्यादिवशी इनुबायझेशन होणार त्यादिवशी इथल्या सभागृहाच्या सर्व नगरसेवकांना माझी विनंती आहे की, त्यांना स्वतःला प्रत्यक्ष तिथे हजर राहून ह्या कार्यक्रमामध्ये लोकांचा विश्वास कसा येईल. आणि तिथे उपस्थित राहणे म्हणजे आपल्या मिरा भाईंदरचा हा नॅशनल प्रोग्राम आहे. त्यामध्ये आपल्या परीने जे सहभाग आणि सहकार्य करता येईल. असा प्रयत्न केला पाहिजे तर मी तर म्हणतो कोण कोणत्या दिवशी, कोण कोणत्या प्रभागामध्ये हा शेड्यूल आहे. प्रत्येक नगरसेवकाला त्या एरियाची माहिती आरोग्य विभागाने आगाऊ दिली पाहिजे. वेळेवर आणि ॲग्रीम जर त्यांना सुचना असली तर ते त्यावेळेला नक्की येतील. मला खात्री आहे. आणि हा प्रोग्राम १०० टक्के यशस्वी झला पाहिजे आणि करण्यामध्ये ह्या सभागृहातील सर्व नगरसेवक ह्यामध्ये आरोग्य विभागाला संपुर्ण मदत करतील असा मला विश्वास आहे. धन्यवाद.

**प्रकरण क्र. ९९ :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिका शहर हागणदारी मुक्त (ODF+) करणेबाबत. (मा. आरोग्य परिरक्षण, वैद्यकिय सहाय्य, उद्यान व शहर सुशोभिकरण समिती सभा दि . ०६/१०/२०१८ रोजीचे शिफारस केलले प्रकरण क्र. १२, ठराव क्र. ०७)**

**ठराव क्र. ९८ :-**

**गोषवारा :-**

**स्वच्छ महाराष्ट्र अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करुन राज्यातील सर्वे शहरे व पर्यायाने राज्याच्या संपुर्ण नागरी भाग दिनांक 01 ऑक्टोबर 2017 रोजी होगणदारीमुक्त झाल्याचे मा . राष्ट्रपती महोदंयाचे उपस्थितीत जा हिर करण्यात आले आहे . मिरा भाईंदर हागणदारी मुक्त झाल्यांनमर शहरातील वैयक्तिक शौचालयांची संख्या वाढवुन शहर ODF + व ODF ++ करणे व शहरातील मैला व्यवस्थापन**

करणे आवश्यक आहे. मिरा भाईदर शहराचा हागणदारीमुक्त शहर हा दर्जा शास्वतरीत्या टिकवणे अनिवार्य आहे. मिरा भाईंदर शहर ODF+ होण्यासाठी आवश्यक असलेल्या केंद्र शासनाच्या अटी व शर्ती केंद्र शासनाच्या ODF+ व ODF++ च्या टूलकिट प्रमाणे कार्यवाही करण्यात आली असुन प्रभागनिहाय सर्व प्रभाग सदस्य शैक्षणिक संस्था व त्यांचे विद्यार्थी , तसेच विविध स्तरातील नागरिक यांजकडुन स्वयंघोषणा पत्र घेण्यात आले आहे. शहरातील सामुदायिक सार्वजनिक शौचालयाची संख्या पुरेशा प्रमाणात आहेत. तसेच आतापर्यंत 235 सार्वजनिक शौचालय व वयैक्तिक शौचालय बांधण्यात आली असुन यामुळे उघडयावर शौच करणाऱ्यांची संख्या समुळ नष्ट झाली आहे. इतर सुविधांमध्ये शहरातील सर्व सामुदायिक / सार्वजनिक शौचालयांचे संरचनात्मक लेखापरिक्षण केल गेल आहे .या निष्कर्षाच्या आधारावर दुरूस्ती व पुननिर्मिती करण्यात आली आहे . शहरातील वैयक्तिक घरगुती शौचालय , सामुदायिक शौचालय व सार्वजनिक शौचालयांची सेप्टिक टँक व्हॅक्युम एम्टीअर यंत्राव्दारे ठराविक कालावधी नंतर स्वच्छ करण्यात येतात व त्यातील साचलेला मैला काढुन त्या मैलावर शहराजवळ उपलब्ध असणाऱ्या STP (Sewage Tratment Plant) मध्ये शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करुन त्याची विल्हेवाट लावली जात आहे . तसेच उघडयावर शौच करणाऱ्या दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे.

तरी सद्यपरिस्थितीची स्वयंमुल्याकंन व स्वयंपडताळणी करुन मिरा भाईंदर शहर हे ODF+ घोषित करण्यासाठी पात्र आहे . मिरा भाईंदर शहरातील नागरिकांना जाहिर आवाहन करणेबाबत मा . समितीची मंजुरी मिळणेस शिफारस आहे.

ठराव क्र. :-

प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्याप्रमाणे सद्य परिस्थितीची स्वयंमुल्याकंन व स्वयंपडताळणी करुन मिरा भाईंदर शहर हे ODF+ घोषित करण्यासाठी पात्र असून मिरा भाईंदर शहरातील नागरिकांना जाहिर आवाहन करणेस ही मा. महासभा मंजुरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- डॉ. राजेंद्र जैन अनुमोदक :- सौ. नयना म्हात्रे

ठराव सर्वानुमते मंजूर

ठराव वाचून कायम करण्यात आला

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रकरण क्र. १०० :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंर्तगत कचरामुक्त मिरा भाईंदर शहराच्या तारांकित मानांकनाबाबत . ( मा. आरोग्य परिरक्षण , वैद्यकिय सहाय्य , उद्यान व शहर सुशोभिकरण समिती सभा दि. ०६/१०/२०१८ रोजीचे शिफारस केलले प्रकरण क्र. १३, ठराव क्र. ०८)

ठराव क्र. ९९ :-

स्वच्छ भारत अभियांनार्गत घनकचरा व्यवस्थापनांतर्गत शहरे स्वच्छ करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. मिरा भाईंदर शहराला कचरामुक्त हो ण्याकरीता एकुणच स्वच्छतेमध्ये क्रमाकमाने सुधारणा होण्यास्तव तारांकित मानाकंन (स्टार रेटिंग) देण्याबाबतची नियमावली (A Protocol for making cities garbage Free ) केंद्र शासन मार्फत तयार करण्यात आलेली आहे . कचरामुक्त शहराचे तारांकित मानांकन ठरविताना विचारात घेतली जाणारी 12 उपांगे / बाबी पुढील प्रमाणे आहेत.

1. घरोघरी जाऊन कचरा गोळा करणे.
2. निर्मितीच्या जागीच कचऱ्याचे विलगीकरण करणे.
3. सार्वजनिक, वाणिज्यक व रहिवासी भागातील साफसफाई करणे तसेच मलनिस्सारण व नदी नाल्यांचे पृष्ठभाग स्वच्छ करणे.
4. शहरातील कचरापेटया पदार्थ पुर्नप्राप्ती सुविधा.
5. मोठया प्रमाणात कचरा निर्माण करणारे व रहिवासी कल्याण संघ यांचेकडुन नियमांचे पालन.

6. **कचऱ्यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करणे , शास्त्रोक्त पध्दतीने क्षेपणभुमी तयार करणे आणि बांधकामाचा राडा रोडा.**
7. **अस्वच्छतेबाबत शिक्षा , दंड व वापरकर्ता शुल्क आकाराणी तसेच प्लास्टिक बंदीची अंमलबजावणी.**
8. **नागरिकांच्या समस्यांचे निराकरण व अभिप्राय प्रणाली.**
9. **कचऱ्याचे ढिगांचे निर्मुलन करणे.**
10. **शहरातील गटारांची व नैसर्गिक जलसाठयांची स्वच्छता.**
11. **कालानुरूप कचरा निर्मिती प्रमाण घटविणे.**
12. **शहर सौदंर्यीकरण.**

**ठराव क्र. :-**

**गोषवाऱ्यात नमुद केलेल्या कार्यपध्दतीनुसार मिरा भाईंदर शहरातील सर्व प्रभाग सदस्यांकडून संबधित प्रभागाचे कचरामुक्त तारांकित मानांकनाबाबत स्वयंघोषणा पत्र घेण्यात आले असुन स्वयंमुल्याकन व स्वयंपडताळणी करुन कचरामुक्त शहरामुक्त शहराच्या 1 ते 7 तारांकित मानांकनापैकी मिरा भाईंदर शहर 3 (***) तारा मानाकंनासाठी (स्टार रेटींग) घोषित करणेस ही सभा मंजुरी देत आहे. तसेच बांधकामे आणि पाडकाम कचरा व्यवस्थापन नियम 2016 नुसार ठाणे मनपाने नियुक्त केलेल्या एजन्सीकडे मनपा क्षेत्रातील C & D Waste देणेसाठी कार्यवाही करणेस व C & D Rules-2016 बाबत करणेस नागरिकांसाठी जाहीर सुचना प्रसिध्द करणेस ही मा. महासभा मंजुरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.**

**सुचक :- डॉ. राजेंद्र जैन अनुमोदक :- सौ. नयना म्हात्रे**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव :-

प्रकरण क्र. १०१, **मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध मालमत्तेच्या संरक्षणार्थ कार्यरत एजन्सीस मुदतवाढ देणेबाबत.**

**राकेश शाह :-**

मा. महापौर मॅडम, पानपट्टे साहेब आहेत. आपले २०१८ मध्ये प्रभाग जॉईंड सर्वेक्षण झाला होता. त्याचा काय रिझल्ट आला आम्हाला माहिती नाही.

**संभाजी पानपट्टे :-**

त्याचा रिझल्ट तयार आहे. फक्त शासनाकडुन ते पैसे आले नाहीत. २५ लाख, २० लाख आणि १५ हजार ते आले की छोटासा कार्यक्रम घ्यायचं आणि चर्चा करायची. त्या प्रभागासाठी वापरण्यासाठी देणार आहोत आपण.

**राकेश शाह :-**

आता, फक्त पहिला क्रमांक, दुसरा क्रमांक ते तर जाहीर करा.

**संभाजी पानपट्टे :-**

पुढच्या वेळी जाहीर करू.

**श्रीप्रकाश जिलेदार सिंह :-**

पहले ही कमिशनर साहबने यह बोला था की अगले महासभा में करेंगे।

**मा. आयुक्त :-**

आजच्या सर्वांचे आश्वासन पुढच्या सभेत जाहिर करायला लावेल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालय, प्रभाग कार्यालये, विभागीय कार्यालये, उद्याने, पाण्याची टाकी तसेच महानगरपालिकेच्या विविध मालमत्तेच्या संरक्षणार्थ सुरक्षा रक्षक **पुरवठा** करणेचे कंत्राट मे. सैनिक इंटेलिजन्स ॲ**न्ड** सिक्युरिटी प्रा.लि. यांना देण्यात आलेले आहे.

तथापी मे. सैनिक इंटेलिजन्स ॲ**न्ड** सिक्युरिटी प्रा.लि. यांची मुदत दि.**31/07/2018** रोजी संपूष्टात **आलेली आहे.**

**जा.क्र.मनपा/आस्था/932/2018, दि.01/09/2018 रोजीच्या पत्रान्वये सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्ह्याकरीता , सानपाडा यांचेकडुन मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध मालमत्तेच्या संरक्षणार्थ बाऊंसर/पहारेकरी पुरवठा करणे शक्य आहे किंवा कसे ? याबाबत माहिती मागविली आहे. परंतु अद्यापपर्यंत माहिती अप्राप्त आहे.**

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. एसजीए-**1506**/प्र.क्र.**92**/काम-**5**, मंत्रालय, मुंबई-**400 032**, दि.**08** नोव्हेंबर, **2006** नुसार, महापालिकेस सुरक्षा रक्षकांची आवश्यकता असल्यास सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा यांचेकडूनच सुरक्षा रक्षकांची मागणी करणे आवश्यक असल्याबाबत शासन निर्णयामध्ये नमुद केल्याचे दिसून येते.

मे. सैनिक इंटेलिजन्स ॲ**न्ड** सिक्युरिटी प्रा.लि. यांची मुदत दि.**31/07/2018** रोजी संपूष्टात **आलेली आहे. पुढील कार्यवाही करणेसाठी दि .01/09/2018 रोजीच्या पत्रान्वये सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्ह्याकरीता, सानपाडा यांचेकडुन मागितलेली माहिती अद्यापपर्यंत अप्राप्त आहे**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध मालमत्तेच्या संरक्षणार्थ **सुरक्षा रक्षक कार्यरत असणे आवश्यक असल्याने दि .01/08/2018 रोजी पासून ते सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्ह्याकरीता, सानपाडा यांचेकडुन माहिती येवुन पुढील प्रक्रीया पुर्ण करेपर्यंतच्या कालावधीसाठी** मे. सैनिक इंटेलिजन्स ॲ**न्ड** सिक्युरिटी प्रा.लि. **यांना मुदतवाढ मिळणेस मा. महासभेच्या मंजुरीसाठी सादर.**

**ठराव क्र. :-**

**प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्याप्रमाणे मे . सैनिक इंटेलिजन्स ॲन्ड सिक्युरीटी प्रा .लि. यांना दि.01/08/2018 पासुन ते सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्ह्याकरीता सानपाडा यांचेकडुन माहिती येवुन पुढील प्रक्रीया पुर्ण करेपर्यंतच्या कालावधीसाठी** मे. सैनिक इंटेलिजन्स ॲ**न्ड** सिक्युरिटी प्रा.लि. **यांना मुदतवाढ देण्यात येत आहे व त्यांची वेळोवेळी देयके अदा करणेस हि मा महासभा मंजुरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.**

**प्रशांत दळवी :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजुर. पुढचा विषय घ्या.

**वर्षा भानुशाली :-**

ह्याच्यामध्ये माझी एक सुचना आहे. जे सैनिक सिक्युरीटीचे आता सध्या जे चालू आहेत. त्याच्यामध्ये काही जागांचे उल्लेख आहे. जिथे सिक्युरीटी नाही त्याची पुर्णपणे चौकशी करून त्याला द्यावं.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, एक ह्या विषयालाच मी ठरावाच्या विरोधात बोलत नाही. सुचना अशी आहे माहिती देऊ इच्छितो. साहेब आपण वॉर्डन दिलेत. सैनिकचेच त्या ठेकेदारांनी वॉर्डन आपल्याला दिलेले ट्राफिक वॉर्डन आणि त्या पोलिसांना पण मदतीसाठी दिलेले म्हणजे ट्राफीक मॅनेजमेंट हे वॉर्डन आजची तारखेला ट्राफीक मॅनेजमेंट करत नाही. बोलले नाही पाहिजे पण खरीच परिस्थिती आहे. डोक्याच्यासमोर असं आहे की ते वसुलीचे काम करतात ट्राफीक स्टेशनवर उभे राहून याला कुठेतरी थांबवायला लागेल.

**मा. आयुक्त :-**

याच कॉ-ऑडीनेशन मिटींग घेतो मी संबंधीत पी.ए.आय आणि डि.वाय.एम.सी.

**जुबेर इनामदार :-**

ते येत नाही साहेब. त्या वॉर्डनला बोलवून सांगा. तुमचं काम ट्राफीक मॅनेजमेंटच आहे तुमच काम हवालदारांच्या सोबत उभे राहायचं नाही. तुम्हाला गरज नसली तर परत घ्या. आपला आर्थिक फायदा होईल.

**मा. आयुक्त :-**

कार्यक्षमतेने त्याचा वापर होण्यासाठी आपण नियोजन करु.

**राजेंद्र जैन :-**

ट्राफीक हवालदार के बारे में मेरा खांबित साहब को लेटर था की जहाँ जहाँ आपने ट्राफीक पूलीस दिए है उनको सुचना दी जाए। उनका जवाब था की यह ट्राफीक हवालदार हमने पूलीस को दिए है। मेरा इसमें सुचना है की हर वॉर्ड के अंदर जहाँ जहाँ आपने ट्राफीक हवालदार निश्चित किए है। उनकी सुचना नगरसेवक की दी जाए ताकि हम भी देखे की वो वहाँ पे ड्युटी पे आते है की नही। हमें अभी तक मालूम नही वह हमारे वॉर्ड में हाजेरी पे है या नही। मेंने सूचना किया है की हर कॉन्ट्रॅक्ट लेबर का बायोमॅट्रीक होना चाहिए लेकिन अभी तक उसकी अंमलबजावणी हुई नही। और लास्ट मिटींग में आपसे रिक्वेस्ट किया था आपने बोला था की यस यहाँ पर माली नही या सिक्युरिटी नही था। पूरे नगरसेवक हर महासभा में चिल्लाते है की यहाँ पर नही था ॲब्सेन्ट था। उनका पर्चेस होकर बिलींग हो जाता है। लास्ट टाईम आपने बोला था की बिलींग सिस्टम जो है वह कॉन्ट्रॅक्टर डिपार्टमेंट को हॅन्डल नही कर पाएगा। तो बिना बायोमॅट्रीक वह फर्जी बिलींग होती रहेगी। अगर हम बोलते है की यहाँ पे वह नही था। उसका बिलींग करे यह पॉईंट आपको निकालना पडेगा।

**मर्लिन डिसा :-**

मा. महापौर मॅडम ट्रॅफीक वॉर्डन जे आहेत ते शाळा जेव्हा सूटतात तेव्हा त्याची मदत पाहिजे. कारण तिकडे खूप गोंधळ होतो. मूलांना घ्यायला जे पालक किंवा सिनिअर सिटीझन येतात त्यांना खूप त्रास होतो. आणि मेन जंक्शन जिथे आहेत मेन रोडवर शितल नगरमध्ये जे सिनिअर सिटीझन प्रार्थना करायला निघतात. त्यांना खूप त्रास होतो. रसाज चौक आणि शितल नगरला परमनन्टली.....

**मा. महापौर :-**

मा. आयुक्त साहेब आप सबकी एक साथ मिटींग लेके जो भी नगरसेवकने जो प्रश्न किए वो सभी के उत्तर हमको दिजीए।

**प्रकरण क्र. १०१ :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध मालमत्तेच्या संरक्षणार्थ कार्यरत एजन्सीस मुदतवाढ देणेबाबत.**

**ठराव क्र. १०० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालय, प्रभाग कार्यालये, विभागीय कार्यालये, उद्याने, पाण्याची टाकी तसेच महानगरपालिकेच्या विविध मालमत्तेच्या संरक्षणार्थ सुरक्षा रक्षक **पुरवठा** करणेचे कंत्राट मे. सैनिक इंटेलिजन्स ॲ**न्ड** सिक्युरिटी प्रा.लि. यांना देण्यात आलेले आहे.

तथापी मे. सैनिक इंटेलिजन्स ॲ**न्ड** सिक्युरिटी प्रा.लि. यांची मुदत दि.**31/07/2018** रोजी संपूष्टात **आलेली आहे.**

**जा.क्र.मनपा/आस्था/932/2018, दि.01/09/2018 रोजीच्या पत्रान्वये सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हयाकरीता , सानपाडा यांचेकडुन मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध मालमत्तेच्या संरक्षणार्थ बाऊंसर/पहारेकरी पुरवठा करणे शक्य आहे किंवा कसे ? याबाबत माहिती मागविली आहे. परंतु अद्यापपर्यंत माहिती अप्राप्त आहे.**

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. एसजीए-**1506**/प्र.क्र.**92**/काम-**5**, मंत्रालय, मुंबई-**400 032**, दि.**08** नोव्हेंबर, **2006** नुसार, महापालिकेस सुरक्षा रक्षकांची आवश्यकता असल्यास सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा यांचेकडूनच सुरक्षा रक्षकांची मागणी करणे आवश्यक असल्याबाबत शासन निर्णयामध्ये नमुद केल्याचे दिसून येते.

मे. सैनिक इंटेलिजन्स ॲ**न्ड** सिक्युरिटी प्रा.लि. यांची मुदत दि.**31/07/2018** रोजी संपूष्टात **आलेली आहे. पुढील कार्यवाही करणेसाठी दि .01/09/2018 रोजीच्या पत्रान्वये सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हयाकरीता, सानपाडा यांचेकडुन मागितलेली माहिती अद्यापपर्यंत अप्राप्त आहे**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध मालमत्तेच्या संरक्षणार्थ **सुरक्षा रक्षक कार्यरत असणे आवश्यक असल्याने दि .01/08/2018 रोजी पासून ते सुरक्षा रक्षक मं डळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्ह्याकरीता, सानपाडा यांचेकडुन माहिति येवुन पुढील प्रक्रीया पुर्ण करेपर्यंतच्या कालावधीसाठी** मे. सैनिक इंटेलिजन्स ॲन्ड सिक्युरिटी प्रा.लि. **यांना मुदतवाढ मिळणेस मा. महासभेच्या मंजुरीसाठी सादर.**

**ठराव क्र. :-**

**प्रशासनाने दिलेल्या गोषवा ऱ्याप्रमाणे मे . सैनिक इंटेलिजन्स ॲन्ड सिक्युरीटी प्रा .लि. यांना दि.01/08/2018 पासुन ते सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्ह्याकरीता सानपाडा यांचेकडुन माहिति येवुन पुढील प्रक्रीया पुर्ण करेपर्यंतच्या कालावधीसाठी** मे. सैनिक इंटेलिजन्स ॲन्ड सिक्युरिटी प्रा.लि. **यांना मुदतवाढ देण्यात येत आहे व त्यांची वेळोवेळी देयके अदा करणेस हि मा महासभा मंजुरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.**

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्री. प्रशांत दळवी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १०२, **भाईंदर पुर्व मौजे नवघर आरक्षण क्र.२१९,२२०,२२९, हे मंजुर विकास योजनेत शाळेचे आरक्षण म्हणून दर्शविलेले आहे . त्यापैकी आरक्षण क्र २२० प्राथमिक शाळा व मैदान वगळून मार्केट करणेस महाराष्ट्र प्रादेशिक व नग ररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदल करणेस मंजुरी मिळणेबाबत.**

**मा. आयुक्त :-**

सन्मा. विरोधी पक्षनेते, गटनेते आणि संबंधित सदस्यांना विनंती केली की तिथे शाळा आवश्यक आहे तर हा प्रस्ताव घेऊ नये. असे लेखी पत्र दिले आहे.

**जुबेर इनामदार :-**

साहेब हा विषय प्रशासनाचा नाही. हे स्पष्ट होते कारण गोषवारा नाही. देर इज नो से ऑफ ॲडमिनिस्ट्रेशन. तुमचा से नाही तुम्हाला त्याच्यामध्ये भाग घेतला पाहिजे की नाही तेच खर होत नाही. कशाला उगाच त्या नगररचना विभागाच्या लोकांना त्रास द्यायचा. सर शाळांची आरक्षणे आहेत ती आरक्षण कमी करायची आणि त्याच्यावर बाजार करायचा. शाळा महत्वाची की बाजार महत्वाचा. शाळा महत्वाची नाही बाजार महत्वाचा असे कदाचित विषय आणणाऱ्यांना वाटत असेल. हा विषय मा. महापौरांचा आहे म्हणून मी तुम्हाला विचारतो या शहरामध्ये शाळांची गरज असणार आहे. कारण लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. त्या आरक्षणाचा फायदा शाळा बांधण्यासाठी झाला पाहिजे. शाळा तयार झाली पाहिजे. लोकांना सोयी सुविधा झाली पाहिजे. ह्या शहरामध्ये हाय सेकंडरी कॉलेज ही शाळा युनिव्हरसिटीची गरज आहे. बाजार हा शहराचा पार्ट आहे. शहराचा बाजार हा शहराचा पार्ट आहे. शहराचा बाजार करु नये. मार्केट बांधायचे असेल तर आपल्याकडे दुसरे आरक्षण असतील शिल्लक जागा प्लानिंगची जागा रस्त्यावरचे कोपरे आपण सगळे काही वापरतो. किती बाजार आपल्याला लागणार आहे. मोठमोठे मॉल आहेत. त्याच्यामध्ये बाजार आहेत. म्हणजे लोकांनी शाळा शिकायची नाही. बाजार मांडायचा आणि पकोडे करायचे का? ही योजना पंतप्रधान नरेंद्र मोदीची आहे. त्याच्यासाठी अशाप्रकारचे विषय आणता का? मा. आयुक्त महोदय शहराची जी गरज आहे. आराखडा तयार करताना ह्या विषयाला बारकाईने लक्ष दिले ह्या सर्वांचा अभ्यास करुनच आराखडा तयार करण्यात आला होता. त्याच्यामध्ये आरक्षण घालण्यात आली होती. तशी आरक्षण ठेवावी. आणि पूढचा जो नविन आराखडा त्यार होतो तो परत करणार की तो बंद लखोट्यात आहे त्याचा अजून निर्णय झालेला नाही. आपल्याला ह्या शहरामध्ये शाळा पाहिजे. कॉलेजेस पाहिजे. युनिव्हरसिटी पाहिजे वेगवेगळे टेक्नीकल शाळा लागतात. आय.टी. सेक्टरच्या कॉलेज पाहिजे त्याच्या दिशेने आपल्याला विचार करायला पाहिजे. फेरिवाले कधीच कमी होणार नाही. ते रोजच वाढतील त्यांना शिक्षण मिळावे. पूढच्या पिढीला चांगले दर्जेदार तर ते अशा रस्त्यांवर खेळी घालत फिरणार नाहीत. ते कुठे चांगले व्यवसायीक तयार होतील. धंदा करतील त्यांच्या

स्वतःचा त्याच्याकडे ४ माणसे ५-५० माणसे कामावर उभे राहतील. म्हणून अशा प्रकारचे विषय आल्यानंतर स्वतः एवढा त्रास घेऊच नका. साहेब हा विषय मला तरी वाटत नाही हा प्रशासनाचा गोषवारा नाही. म्हणजे प्रशासनाच्या याच्यामध्ये कुठलाही रस नाही. ठराव होणार असेल तर आम्ही त्याचा विरोध करु. होत नसेल तर आणलेला विषय परत घेत असाल तर अतिउत्तम.

**धृवकिशोर पाटील :-**

महापौर मॅडम, ह्या शहराला शाळेची पण गरज आहे. युनिव्हरसिटीची पण गरज आहे, कॉलेजची पण गरज आहे. त्याचप्रमाणे मार्केटची पण गरज आहे. मार्केट, फेरिवाले, शाळा, विद्यार्थी हे एकमेकाला पुरक असणारे घटक आहेत. आणि ह्या मिरा भाईंदर शहरामध्ये असे अनेक डेव्हलपमेंटची कामे आपल्याला करायची आहेत. सन्मा. सदस्यांनी जो आरोप केला सांगितले की आपण शाळेचे आरक्षण कमी करतो. हा डी.पी. आपल्या मिरा भाईंदर महापालिकेचा आहे. ह्या डी.पी. प्लानमध्ये आपण जर बघितले तर ते जे पींक पींक दर्शविलेले आहेत त्याच्यामुळे हायस्कूल प्रायमरी हायस्कूल, कॉलेज सगळे दर्शविलेले आहे. म्हणजे ह्या आरक्षणाच्या सभोवताली जवळ जवळ ५ ते ७ आरक्षणे शाळेसाठी रिझर्व्ह आहेत. आरक्षण क्र. २००,१९,२० आरक्षण क्र. २३४,२२९,२२८,२२३ आरक्षण क्र. ११५,११६,२१५ म्हणजे असे अनेक आरक्षण ह्या सभोवताली दर्शविलेले आहेत आणि मार्केट सुध्दा ह्या शहराची गरज आहे. त्या परिसरामध्ये एकही मार्केट आरक्षण नाही. आणि रस्ते पण मोठे आहेत. ही समस्या आहे असे आमचे मित्र बोलले की आपण कितीतरी मार्केट उभारले आहेत. तरी ते फेरिवाले त्या रस्त्यावर बसणार म्हणजे बसणार पण याला कुठे साहेब कंट्रोल पाहिजे आणि हे कंट्रोल करण्याचे काम प्रशासनाचे आहे. साहेब आपण मोठमोठे रोड वाईडींग केले ह्या रोड वाईडींगमध्ये सुध्दा लोकांचे घरे गेली काही लोकांचे दुकाने गेली पण तिथे त्याचा उपयोग फेरिवाले पार्किंग अनधिकृतपणे ते करतात. साहेब याच्यावरती प्रशासनाची पकड पाहिजे. आज मार्केट साहेब १-७-२००९ ला अशीच एक मिटींग झाली. त्या मिटींगमध्ये सुध्दा प्रकरण क्र. १५ मिरा भाईंदर शहराचा मंजुर विकास योजनेतील मंडई करिता महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार गौण फेरफार करणे व मंडई करिता नविन आरक्षण प्रस्तावित करणेबाबत विचार विनिमय करणेबाबत निर्णय घेणे. साहेब असा एक विषय होता गोषवारा नाही. पण तरी सुध्दा त्या मिटींगमध्ये आम्ही तसाच प्रस्ताव पास केला. मिरा भाईंदर महापालिकेच्या मंजूर विकास आराखड्यात भाजी, फळ व फुल मार्केट करिता आरक्षणानुसार आरक्षण प्रस्तावित करणे आरक्षण ह्या क्षेत्रात वापरात बदल करणे आणि त्यासाठी मंजूरी देण्यात येत आहे. सदर समितीमध्ये फेरफारचे प्रस्ताव शासनाकडून मंजूर करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना देण्यात येत आहेत. मंजूर करुन प्रस्तावित केलेल्या मार्केटच्या आरक्षणामध्ये जागेवर मार्केटकरिता खुल्या शेड बांधण्यात यावे. व त्यामध्ये भाजी, फळ, फले, मांसाहारी मार्केट सुरु करणे असा एक प्रस्ताव झाला. १/७/२००९ ला त्याचप्रमाणे महासभा दि. २०/६/२०११ साहेब त्याच्यामध्ये सुध्दा बस थांबा आरक्षण क्र. १८५ प्रस्तावित फेरबदल काय मंडई. शाकाहारी, मांसाहारी मार्केट तसेच बगिचा, तलाव, पाण्याची टाकी दुसरे आरक्षण फेरबदल काय शाळेचे मैदान खुली भाजी मंडई आरक्षण १११,११२, १११ ब बगिचा व तलाव अशाप्रमाणे म्हणजे साहेब अशाप्रमाणे अनेक फेरबदलचा प्रस्ताव याच महासभेमध्ये आपण पास केलेले आहेत आणि आता पण आपण जर हा विषय आणलेला आहे त्याला विरोध का? पायंडा कोणी पाडला आपणच पायंडा पाडला. आपणच सुरुवात केली. मग आम्ही याच्यात काय चुक करतो की, तिथे मार्केट आरक्षण एकही नाही आणि आपण कुठे सगळे आरक्षण बदलतो. फक्त एक छोटेसे त्याच्यामध्ये सुध्दा हे आहे आणि साहेब त्याच आरक्षणाच्या बाजूला एक दुसरे आरक्षण आहे. आरक्षण क्र. २२१ बाळासाहेब ठाकरे उद्यान, गार्डन आहे साहेब आरक्षणामध्ये काय गार्डन आहे. पण तिथे आपण काय केले आहे. पूर्ण मैदान केले आहे. मग आपण ते का डेव्हलपमेंट करत नाही. बादशहा मैदान तिथे आरक्षण आहे गार्डनचे. तर आपण तिथे काय केले मैदान केले. म्हणजे ऑलरेडी एक्झीस्टींग सुरु आहे. ह्या शहराची गरज पण आहे. गार्डन पण पाहिजे. मैदान पण पाहिजे त्याचप्रमाणे असा आम्ही एक चांगला प्रस्ताव आणलेला आहे. तिथे थोडेफार ओपन मार्केट पण आपण बांधायचे आहे. आणि त्या सभोवतालच्या परिसरामध्ये कुठेही मार्केटचे रिझर्व्हेशन नाही. म्हणून आपण हे फेरबदल करत आहोत. आणि हा फेरबदल केल्यानंतर आपण त्याची कारवाई करणार. तुम्ही सुनावणी घेणार. लोकांचे सजेशन ऑब्जेक्शन मागविणार आणि शासनाला जर वाटले की हे बरोबर आहे तरच शासन मंजूर करणार. अदरवाईज शासन मंजूर करणार नाही. ही काळ्या दगडावरची रेष आहे. म्हणजे आम्ही एक आमचा चांगला प्रस्ताव ठेवलेला आहे. त्याच्यामध्ये आमचा कोणताही दुसरा इन्टेन्शन नाही. एक चांगला शहरामध्ये आपण चांगले मार्केट द्यावे हा एकमेव आमचा इन्टेशन आहे आणि एकमेव त्याच्या आरोपाला आमचे खंडन आहे तर त्याच्यामध्ये आणि आम्ही जो प्रस्ताव केला तुम्हाला जर योग्य वाटले तरच तुम्ही ते करणार आहात. नाहीतर नाही करणार आहात. आणि तुम्ही ते शासनाला रेकमेन्डेड करणार आहात शासनसुध्दा सुनावणी, फेरसुनावणी घेऊन

त्याच्यामध्ये जर योग्य असेल तरच हे हा जो ठराव आहे हा पास होईल आणि आरक्षणात फेरबदल होईल. अदरवाईज होणार नाही. म्हणून माझी आपणांस विनंती आहे मी ठराव वाचतो. मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून ) शासन अधिसूचना क्र . टीपीएस-**1296/847/**सीआर-**162/96/**युडी-**12,** दि.**14/05/97** अन्वये मंजूर करण्यात आलेली असून दि **.15/07/97** पासून अंमलात आलेली आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना क्र . टीपीएस-**1298/941/**सीआर-**89/98/**युडी-**12,** दि.**25/08/2000** अन्वये मंजूर झालेली असून दि **.15/10/2000** पासून अंमलात आलेली आहे . मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र . टिपीएस-**1208/1346/**प्र.क्र.**267/08/**नवि-**12,** दि.**29/08/2009** अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत.

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रासाठी मंजूर विकास योजनेत आ .क्र. 220 (प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान) मौजे नवघर / गोडदेव परिसरात दर्शविलेले आहे. मंजूर विकास योजनेनुसार आ.क्र. 220 (प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान ) चे एकूण क्षेत्र 5800 चौ.मी. असून मिरा भाईंदर महानगरपालिकेने विकास हक्क प्रमाणपत्राच्या मोबदल्यात विकासकाने 5723.85 चौ.मी. महानगरपालिकेकडे हस्तांतरीत केलेले आहे.**

**सदर आ.क्र. 220 (प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान) या आरक्षणाच्या सभोवताली आ.क्र. 219 (माध्यमिक शाळा व खेळाचे मैदान ), आ.क्र. 223 (प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान ), आ.क्र. 228 (माध्यमिक शाळा व खेळाचे मैदान ), आ.क्र. 229 (प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान ), आ.क्र. 234 (प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान) ही आरक्षणे शाळेसाठी आरक्षित आहेत.**

**सदर आरक्षणाच्या 1 कि.मी. परिसरामध्ये अनेक प्रसिध्द शाळा असून लोकसंख्येच्या मानाने त्या शाळा पुरेशा आहेत तसेच रस्त्यावर फेरीवाले बसल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे . याबाबत अनेक नगरसेवकांच्या तक्रारी येत आहेत व सभागृहामध्ये याबाबत वारंवार चर्चा होत आहे . सध्या त्याठिकाणी आरक्षण क्र.219, 227, 229 अशी तीन शैक्षणिक आरक्षणे असून त्यापैकी 219 व 229 ही आरक्षणे तशीच ठेवण्यात यावीत.**

**सदरच्या परिसरातील जनतेची आवश्यकता लक्षात घेता जनतेच्या सोईसाठी आ .क्र. 220 (प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान ) या आरक्षणाचे नाव बदलून मार्केट म्हणून नामाभिदान करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 नुसार फेरबदल करणेस तसेच त्याअनुषंगीक सर्व वैधानिक कार्यवाही पुर्ण करुन अंतिम मंजूरीसाठी प्रस्ताव शासनास सादर करणेसाठी मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना अधिकार देण्यास हि सभा मंजूरी देत आहे.**

**मनोज दुबे :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

प्रथमतः प्रशासनाचा गोषवारा नाही. प्रशासन पाठवेल की नाही हे निश्चित होत नाही. साहेब नविन बॉडी आहे. सार्वत्रिक निवडणूक संपल्यानंतर २०१७ ला नविन बॉडी स्थापित झाली आणि आज दिनांकापर्यंत ८ असे ३७ खाली विषय आले आहेत. म्हणजे प्रत्येक महिन्याला महासभेमध्ये एक विषय ३७ चा आहे. काय बदलायचे आहे हे समजत नाही. पूर्ण शहर बदलायचे आहे का? कसे आहे आपल्या मर्जीप्रमाणे जे आपल्याला सोयीस्कर वाटेल कारण बहुमत आहे. म्हणून आपल्याला काही करायचे ८ प्रकरणामधून ४ प्रकारणे असे आहेत त्याला प्रशासनाचा गोषवारा नव्हता. स्वतःहूनच फक्त विषय घेतला आणि अशाप्रकारे ३७ खाली ठराव केले. खरतर हे करायची त्याच्यावरचा उद्देश काय आहे? साहेब बऱ्याच लोकांनी अजून जागा महापालिकेने ताब्यात घेतलेल्या नाहीत. भुसंपादन झालेले नाही. आरक्षण पडलेले आहेत ते भुसंपादन झाले नाही. म्हणून जे काही ओनर असतील विकासक असतील ज्यांची जागा जर जमीन मालक असतील त्यांना कुठे प्रेशर तंत्र दबाव तंत्र असा तर विषय नाही ना. त्याच्यामुळे तुमचे आरक्षण बदलते असेही असु शकते. म्हणून आयुक्त महोदय सर्व विषयांवर बारकाईने चाचपणी केली पाहिजे की याच्या मागचा उद्देश तरी काय. खरोखर तिथे त्या जागेवर बाजार पाहिजे का की शाळा किंवा कॉलेज किंवा पुढचे मैदान पाहिजे. कारण लोकसंख्या जितकी वाढलेली आहे त्या मुलांना शाळाही पाहिजे. मैदाने ही पाहिजे, खेळाचे मैदान ही पाहिजे, गार्डन पाहिजे, उद्याने पाहिजे तो ही एक महत्वाचा विषय

आहे. सगळ्या काही बाबींना तुम्हाला साहेब कारण तुम्ही ह्या शहराचे मालक आहात, तुम्हाला अधिकार आहेत. विषय घ्यायचा किंवा फेटाळायचा. आम्ही काहीही तुमच्याकडे करुन पाठवू तुमच्याकडे काहीही विषय देऊ. आम्हाला वाटेल आमची जेवढी बुध्दी चालेल तेवढे आम्ही काम करु पुढचे काय? प्रशासकीय बाबी आहेत. त्या प्रशासकीय बाबींना प्रशासकीय पध्दतीने जाता आले पाहिजे. माझी आपल्याला अशी विनंती आहे. आमचा ठराव मांडतो.

**धृवकिशोर पाटील :-**

महापौर मॅडम हमारे सन्मा. जुबेरजीने सही कहा ३७ के इतने विषय आए। सही बात है विश्वास का दौर और विकास की और।

**जुबेर इनामदार :-**

खुद का विकास और गाव का सर्वनाश तो नही है।

**दिनेश जैन :-**

मैं पहले तो आपका धन्यवाद करना चाहता हूँ की, आप लिगल विषय लाते हो। ३७ करके और वह लिगल होता है। तब जाके हम आगे का काम करते है। लेकिन हमारे मिरारोड परिसर में बस डेपो का आरक्षण है स्टेशन के वहाँ पे वहाँ पे कोई भी ३७ किए बिगर ही पहले सत्ताधारीने वहाँ पे दो मार्केट खडे किए हुए है। जब की वहाँ पे कोई भी ३७ का प्रस्ताव किया हुआ मान्य नही है। वह बस डेपो का आरक्षण है। फिर भी वहाँ पे दो मार्केट खडे किए हुए है क्योंकी वहाँ पे लगता है इनको मार्केट की जरुरत है। तो यहाँ क्यों नही है? और रही बात दुसरी महापौर मॅडम यह बोलते है भुसंपादन नही हुआ है उस जगह का टोटल आरक्षण का एरिया है २२० का ५८०० चौ.मी. है। उसके अंदर ९७ टक्का कमिशनर साहब भुसंपादन हो चुका है। ५६९० चौ.मी. मतलब सिर्फ एक या २ टक्का ही उस २२० के अंदर जो आरक्षण हम चेंज करने जा रहे है उसके अंदर ९७ टक्का आरक्षण भुसंपादन नगरपालिकाने कर लिया है। मतलब आपको गलत गोलगोल माहिती देके सभागृह को गुमराह करना अगर नही मालुम होगा तो नए सदस्य पत्रकार क्या सोचेंगे। महापौर आप जो काम कर रहे हो विकास की और जो हमारे आमदार का लक्ष है। मिरा भाईंदर को बहुत तरक्की के लिए लेके जाने का और कमिशनर साहब आपका जो काम करने का दिन रात का जो आपका जुनून है हम सब आपके साथ में अच्छे काम के लिए मेरे साथ में पुरा करता हूँ।

**अनिल सावंत :-**

मा. महापौर मॅडम हा जो विषय आलेला आहे. कमिशनर साहब बहुत अच्छा करे दिनेशजी हम भी मानते है इसलिए गोषवारा नही दिया। क्योंकी यह विषय ही गलत है। जुलै २००९ का जो अधिकार मा. सभापतीने किया जरा उनको देखना चाहिए। वही जुलै २००९ में महापौर कौन थे। और ३७ का प्रस्ताव किसने लाया। तभी हम लोग अपोझिशन में थे।

**धृवकिशोर पाटील :-**

तुळशीदास म्हात्रे साहेबने किया आप लोग सभी साथ में थे।

**अनिल सावंत :-**

२००९ की बात कर रहा हूँ। २००९ में किया। माझे म्हणणे एवढेच आहे प्रस्ताव आले त्यातील किती मंजुर झाले, किती नाही झाले ही गोष्ट वेगळी आहे. २०१७ मध्ये ह्या सभागृहामध्ये एक पक्षाला बहुमत मिळाल्यानंतर जे जे प्रस्ताव आले ते त्याच भागातले का आले. रामनगर भागातलेच आले. येथे पूर्ण मिरा भाईंदर शहर नाही. आज एवढी आरक्षणे आहेत ३१८ जवळ जवळ आरक्षण आहेत. किती आरक्षण आपण ताब्यात घेतली. महापालिका त्यामध्ये कमी पडते. आरक्षण आपण ताब्यात घेऊ शकत नाही. आज हे आरक्षण जवळ जवळ ५८०० पैकी ५७०० चौ.मी. आरक्षण ताब्यात आलेली आहेत. त्याचा आपण टी.डी.आर दिलेला आहे. पालिकेने त्याठिकाणी कुंपण भिंत घातलेली आहे, माती भराव केलेला आहे. त्यासाठी खर्च केलेला आहे आणि ते आरक्षण ताब्यात आलेले आरक्षणाचं शाळा सोडून मार्केट दिनेशजीने जीकर किया स्टेशन का, स्टेशन के आरक्षण का उपमहापौर साहेब आहेत इथे त्यांना माहिती आहे. पूर्ण त्या मार्केटची हिस्ट्री, जॉग्रफी पूर्ण माहिती आहे. आज त्या टोटल आरक्षणांपैकी एस.टी.डेपो का जो आरक्षण पूर्ण त्यातल्या फक्त १५ टक्के जागेवर मार्केट आहे. आणि ते ग्रामपंचायतीच्या काळापासूनचे आहे आणि बाकी ज्या बिल्डींग झालेल्या आहेत. रेसिडेन्शीअल कॉम्पलेक्स झालेले आहेत त्यांना ओ.सी आणि सी.सी. कोणी दिल्या. आज ही परिस्थिती शहरामध्ये साहेब शाळांची गरज आहे. आज तुम्ही मंगलनगरमध्ये मार्केट बांधले. त्या परिसरामध्ये आणखी एक मार्केट बनल काय परिस्थिती आहे. मार्केटमध्ये फेरिवाले बसतात. रस्त्यावरही तेवढेच आहेत आणि बाजारातही तेवढेच आहेत आणि शाळेचे

आरक्षणात बोलतात. इतर ठिकाणी बांधा ना आणि आज पालिकेच्या ताब्यात असलेले आरक्षण बदलण्याचे प्रस्ताव पालिका देऊच कशी शकते. २०१२ ला तुम्ही टी.डी.आर दिलेला आहे. त्यातल्या कंपन्या आहेत. बऱ्याच काही आणि ताब्यात आलेली आरक्षणटी.डी.आर दिलेली आरक्षण प्रशासन कसे काय देऊ शकते. त्या ठिकाणी चेंज करु शकते. मार्केटच २४६ आरक्षणाचे ठराव झालेला आहे. त्यादिवशी महासभेमध्ये खोटी माहिती दिली गेली की ८५ टक्के ताब्यात आलेले आहे. १०० टक्के आरक्षण महापालिकेच्या ताब्यात आलेले आहेत आणि आज त्यातल्या १०० टक्के आरक्षणाच्या ५० टक्के जागेवर ऑलरेडी पत्रे मारलेले आहेत. कोण आहे विकासक तो महानगरपालिकेची प्रॉपर्टी आहे. मग त्या ठिकाणी लोक त्याचा उपयोग घेऊ शकत नाहीत. पत्रे मारलेली आहेत. ती आपण कारवाई करीत नाहीत. आणि अशा प्रकारचे प्रस्ताव जे जनविरोधी आहेत. एवढा मोठा विरोधी पक्षाने बाहेर एवढे मोठे निवेदन दिले, मोर्चे काढले. एक्झीटेशन दिले आणि तरी सुध्दा अशाप्रकारचे आणि त्याच्यासाठी विशेष महासभा, ३७ चे मायनर मॉडीफिकेशनसाठी विशेष महासभा म्हणजे आपण ह्या शहराला कुठे घेऊन चाललोत, विकास कोणाचा करत आहेत आणि कोणाच्या बोदरेशन खाली हे करायला लावत आहेत. विकास शहराचा होत नाही. पर्टीक्युलर त्याच एरियामधली आरक्षणे भडकावयाची, त्यामध्ये काहीतरी थातूरमातूर मॉडीफिकेशन करायचे ऑलरेडी आता आज जो २२० आरक्षणाची काय परिस्थिती आहे. सांगु शकाल का? पी.डब्ल्यू.डी. टाऊन प्लानिंग आज तिथे काय चालू आहे. सांगू शकला का? आपल्या ताब्यात पूर्ण आरक्षण आहे. तिथे कसले कंन्स्ट्रक्शन चालू आहे. म्हणजे सभागृहामध्ये ठराव पास होण्यापूर्वी तिथे सुरु पंच तारांकित हॉटेलचा प्रस्ताव ह्या ठिकाणी पास झाला. साहेब कालच्या टाईम्स ऑफ इंडियाला सिडकोला उचलून बाजूला फेकलेले आहे सुप्रिम कोर्टाने की त्याठिकाणी पाणथळच्या जागेवर कुठलेही रिझर्व्हेशन तुम्ही टाकू शकत नाही. आज दोन दिवस झाले नाही नोटिफिकेशन आले नाही आणि सजेशन ऑब्जेक्शनसाठी प्रशासनाने लोकांना तो प्रस्ताव दिला. शासनाची नोटिफिकेशन यायची तर वाट बघायची होती. एन.डी. झोन सारखे एन.डी. झोनच्या ठिकाणी आपण फाईव्ह स्टार हॉटेल बांधायला निघालो आहोत. म्हणजे हा पर्टिक्युलर एका संस्थेच्या बाबतीत किंवा एका संस्थेची जी काही आज प्रॉपर्टी आहे. प्रॉपर्टी कोणी कितीही कमवावी पण पूर्ण शहराला वेठीस धरु नये. आज जे विकास विकास म्हणत आहेत. आज पालिकेची शाळा मागच्या मिटींगमध्ये उपमहापौर बोलले होते, सभापती बोलले होते की, आम्ही कम्प्युटराईज करत आहोत. पूर्ण शाळांचे आणि ह्या शाळांचे आपण शाळांचे असलेले आरक्षण मार्केटमध्ये कन्व्हर्ट करत आहोत.

**दिनेश जैन :-**

महापौर मॅडम, मिरारोड के अंदर अनिल सावंतजी जो बोल रहे है। अभी खाली पत्रे की बात कर रहे है। लेकिन मैं आपको बताना चाहता हूँ की, हमारे मिरारोड के अंदर टी.डी.आर. ले चुके है। वापर चुके है और उस जगह पे आज भी पार्टी हॉल के लिए वह पर्सनल वापरा जा रहा है और वह भाडे पे दिया जाता है।

**अनिल सावंत :-**

आप किसकी बात कर रहे है?

**दिनेश जैन :-**

मैं मिरारोड की बात कर रहा हूँ।

**अनिल सावंत :-**

भाडे पर टी.डी.आर किधर है?

**दिनेश जैन :-**

टी.डी.आर दिया हुआ है।

**मा. महापौर :-**

पर्सनल विषय पे चर्चा ना हो अभी और भी विषय है।

**प्रशांत दळवी :-**

महापौर मॅडम, आयुक्त महोदय आम्हाला कोणाचा भुखंड गिळंकृत करायचा नाही. सरळ सरळ त्या ठरावामध्ये धृवकिशोर पाटीलने एक्सप्लेन केलेले आहे की, तो ठराव राज्य शासनाकडे पाठवणार आहोत आणि तिकडून तो मंजूर झाल्यानंतर आम्ही करणार आहोत. शाळेच्या बाजूला एक एक किलोमीटर वरती आहेत. तुम्ही म्हणतात फेरिवाले रस्त्यावरती बसतात मग याच्यावरती उपाययोजना करायच्या नाहीत. एका बाजूला म्हणतात फेरिवाले वाढत आहेत तर त्यांच्यावरती उपाययोजना करायच्या नाहीत का? आज साहेब वस्ती लोकसंख्या वाढत असेल जर पोलिस कर्मचारी कमी पडत असतील ठाणे ग्रामीण तर आम्ही स्थानिक पोलिस आयुक्तालय पण इकडे करत आहोत ना. जर शहराचा विकास होत असेल तर त्याला कुठेतरी खोळा घालायचा. आयुक्त महोदय महापौर मॅडम यांनी शहराचा बट्ट्याबोळ करुन

टाकला होता. गेले दोन वर्ष आम्ही सुधारतोय आणि त्यानंतर त्यांचे ठराव यांना वाचवून दाखवण्यात आले की यांनी किती आरक्षणे बदली केली. मुळात एखादे आरक्षण असेल जसे दिनेश जैन यांनी सांगितले की त्या मिरारोड स्टेशनला जो आहे हे म्हणतात की ग्रामपंचायकच्या काळातले आहे. सावंत साहेब ही नगरपालिका असताना महापौर मॅडम आणि त्याठिकाणी सुध्दा गाळे विकले गेले आहेत. त्या गाळ्यामध्ये एकही फेरिवाला बसत नाही. ती जात नाही तिथे आतमध्ये आहे म्हणून म्हणजे कुठल्या आरक्षणावर तुम्ही स्वतः गिळंकृत करायचे. स्वतःचे संस्थेचे बोर्ड लावायचे हे धंदे तर आम्ही करत नाही आहोत ना. आम्ही फक्त आत आणि ही पालिकेची मालमत्ता आहे.

**अनिल सावंत :-**

तुम्ही काय धंदे करता हो आम्हाला बोलायला लावू नका.........

(सभागृहात गोंधळ)

**प्रशांत दळवी :-**

यांना यांच्या वरिष्ठांची शपथ आहे. यांनी माझ्यामध्ये बोलू नये. मी बोलत असताना प्लीज.

**मा. आयुक्त :-**

माझी विनंती राहील. वैयक्तिक पेक्षा आपण त्या प्रोजेक्ट आरेंटेडवर चर्चा करावी. वैयक्तिक चर्चा करु नये.

**प्रशांत दळवी :-**

महापौर मॅडम विषय चांगला आहे आणि फेरिवाल्यांची पण लोकसंख्या कमी झाली पाहिजे. रस्त्यावरती जे बसतात ते.....

**मा. महापौर :-**

हमे आरक्षण की भी जरुरत है, हमैं फेरिवालो की भी जरुरत है। यह विषय आयुक्त साहब का आया है। अपने अधिकारो में आयुक्त साहबने यह विषय लाया है। आगे प्रस्ताव देना है और वहाँ से हमे मंजुरी आनी है। आपका ठराव होगा तो आप पढीए।

**मर्लिन डिसा :-**

महापौर मॅडम खाली सजेशन था स्कुल रेग्युलेशन हमारे पास प्रायमरी स्कुल तो है। ३५, ३६ कुछ सेकंडरी सेव्हन तक है। लेकिन एक के भी खाली दो स्कुल लास्ट टाईम किए थे। मैं तो रिक्वेस्ट करुंगी की टेन तक करो। कुछ आय.टी.आय कोशीश की थी रेग्युलेशन करो कुछ व्होकेशनल करो और जो स्कुल रिझर्व्हेशन है ऐसे बच्चो के एज्युकेशन के लिए ज्यादा युज करो।

**मा. महापौर :-**

बिलकुल.

**मर्लिन डिसा :-**

थँक्यु.

**गिता जैन :-**

आयुक्त साहेब हे सगळ जे भांडण चालले आहे. मला फक्त एक सांगा आपल्याकडे मार्केटचे आरक्षण तर असणार. आहे का? त्याची काय स्थिती आहे. तो आपण अभ्यास केला का?

**मा. आयुक्त :-**

मा. महापौराच्या परवानगीने मी बोलतो, हा विषय विशेष सभेत मा. महापौरांनी घेतलेला आहे आणि फार कमी कालावधी होता त्यामुळे प्रशासनाकडून त्याचा अभ्यास करुन गोषवारा द्यायला पाहिजे होता. तो शक्य झाला नाही. त्याठिकाणी किती मार्केट आहेत, किती शाळा आहेत. हा जो आज प्रस्ताव होत आहे त्याच्यावर प्रशासनाचे काय मत राहिल. मोठ्या प्रमाणात ह्याला विरोध आहे. तर लास्ट स्कील शहराला ह्या शहराला जे अपेक्षित आहे आणि नियमात जे आहे. राज्यशासन हे सुप्रिम आहे. सगळ्या बाबी तपासून राज्यशासन अंतिम निर्णय करते. आमच्या स्तरावर सुध्दा नियमबाह्य काही केले जाणार नाही. आपण म्हणता तसे तिथे किती मार्केट आहेत, किती शाळा आहेत. त्या सेक्टर झोनमध्ये खरच बदल करता येतो का आणि त्या बदलाचा निकषामध्ये जर बसत असेल तरच पुढे त्याच्या प्रशासन विचार केला जाईल नाही तर तो ठराव विखंडनासाठी पाठवला जाईल.

**गिता जैन :-**

मी मान्य करते. साहेब मी फक्त हे विचारते की आपण सर्व इथे भांडतो. मार्केट बनणार पण जे मार्केट आपल्याला अव्हेलेबल आहे त्याच्यासाठी कोणी काहीच बोलायला तयार नाही. ते काहीही सांगत नाही. मार्केट रिझर्व्हेशन ते काहीही सांगितले नाही. मार्केट रिझर्व्हेशन जे आहे. त्याला तुम्ही का डेव्हलप करत नाही. दुसरे साहेब जेव्हा हा डी.पी. बनवला असेल त्यावेळी ज्यांनी ही बनवला असेल त्यांनी तिथली

लोकसंख्या वगैरे लक्षात घेऊनच ते शाळेचे रिझर्व्हेशन टाकले असेल असे मला वाटते. कारण ज्याने बनवले असेल तो तज्ञ व्यक्तीच असणार. तर शाळेचे रिझर्व्हेशन तिथे लोकसंख्येप्रमाणेच टाकले असेल असे माझे मत आहे. तिसरे साहेब मला असे खरच वाटते शाळा जास्त जरुरीची आहे. कारण आपली लोकसंख्या एवढी झपाट्याने वाढत चालली आहे तर शाळा जरुरी आहे. तुम्ही कुठले दुसरे ही आरक्षण मार्केटसाठी करा पण शाळेचे करु नका ही माझी विनंती असणार. कारण शाळा हा गरजेचा विषय आहे. साहेब आणि जर एकदमच बदलायचे झाले तुम्हाला खुप सारी इच्छा असेल तर बदला तर आपल्याकडे एकही युनिर्व्हसिटी नाही. आपल्याकडे एकही कॉलेज नाही आणि आपली मुले इथुन चर्चगेटपर्यंत रोज ज्या गर्दीत जातात तशी एखादी वास्तु उभारण्याची का जरुरत वाटली नाही आणि मी महापौरांना खरच विचारणार की मॅडम आपण शहराच्या मुलांचा विचार करुन अॅटलीस शाळेचे आरक्षण बदलू नये. तुम्ही दुसरी काहीही आरक्षणे कुठेही लावा काही हरकत नाही. पण शाळेची आरक्षणे बदलू नयें. आपण ह्या शाळेसाठी प्रस्ताव पारित केला आहे. तर तिथे आपण शाळा बनवू आपण २५ टक्के त्यांना देऊ वगैरे जे काही नॉर्म्स आहेत आपण ते पास केले आहेत. आणि आता अचानकच आपण सर्वांनी ते सर्वानमुमते पास करुन आता अशी काय गरज वाटली. दुसरे साहेब एक आपल्याकडे १०० टक्के आलेले आहे आणि अजून बाकीचे २२० वगैरे काय स्थिती आहे कदाचित तुम्हाला माहित नसेल कारण तुमचा जवाब मला माहित आहे. तुम्हाला वेळ मिळाला नाही म्हणून त्याचा तुम्ही अभ्यास केला नाही. मग आता तिथे जी वस्ती वाढत चाललेली आहे आणि तिथे जे स्टूडन्ट येत चालले आहेत त्यांना हे आरक्षण गरजेचे आहे. कारण ते दुसरे आरक्षण ह्या केव्हा आपल्या ताब्यात येणार ते आपल्याला माहिती नाही. मग आता तुम्ही तिथे मार्केट करणार आणि मग ते दोन आरक्षणे १० वर्षांनी मागणार. तोवर मुले कुठे जाणार? ह्या सर्व बाबतींचा विचार करायला पाहिजे असे मला वाटते.

**मा. आयुक्त :-**

आपल्याकडून व इतरांनी मांडलेले सगळे मुद्दे हे प्रशासन नोंद घेईल.

**गिता जैन :-**

धन्यवाद साहेब.

**निला सोंस :-**

मेरी प्रशासन से एक सुचना है की जो मार्केट लाने का मुख्य उद्देश था उसका मेन उद्देश है की, एक तो रोड खाली हो यातायात की समस्याये दुर हा फेरिवालों को भी न्याय मिले। स्थायी जगह मिले और नागरीको भी लाभ मिले। लेकिन जो दो मार्केट बनाए गए है उस पर प्रशासन कही ना कही बहुत ही लापरवाही से कार्य करे क्योंकी मैं भी उस प्रभाग से हूँ। मतलब मार्केट तो बन गया लेकिन उसके बाहर और जादा फेरिवाले बढ रहे है। तो अगर मार्केट बनाने के बाद भी रोड पे से नही हटेंगे तो मुझे लगता है यह प्रशासन पे प्रश्न चिन्ह है। उन्हें गंभीरता से लेना चाहिए। क्योंकी विषय बहुत अच्छा है। मार्केट भी बनने चाहिए लेकिन वह वाकई में कायदे में रहने चाहिए। रोड खाली हो और मार्केट बने तो हमारा जो उद्देश है वह सफल होगा तो प्रशासन इसपर कडी कारवाई करे और सभी प्रभाग अधिकारीयो को बोले की उसपर गंभीरता से विचार करे।

**मा. आयुक्त :-**

एक मुद्दा त्या मॅडमने जो मांडला की ज्या ठिकाणी मार्केट झाले आणि रस्त्यावर व्यवसाय करतात आपण दोन मार्केट फक्त बनविलेले आहेत आणि ते ही आपल्या मान्यतेने बनविलेले आहेत. हा पहिला प्रयोग आहे. आता असे आपण ७ मार्केटचे टेंडर काढलेले आहे आपल्या मान्यतेने आतापर्यंत हा सेक्टर थोडा निग्लेक्टेड राहिलेला आहे आणि मोठ्या प्रमाणात हे मुंबई उपनगर असल्यामुळे व्यवसायाची संख्या इथे मोठी आहे. इतर शहरामध्ये आपल्याला ती परिस्थिती दिसत नाही. फक्त मिरा भाईंदरमध्ये नाही फेरी फेरी सगळ्या शहरामध्ये देशामध्ये जर हॉकिंगच्या सगळ्यात जास्त विषय असेल तर मुंबई आणि मुंबई परिसर आहे. कमी जागेमध्ये मोठ्या लाखोच्या संख्येने लोक राहतात. लोकांच्या कामाच्या पध्दती फार वेस्ट आहेत. लोकांना मार्केटला जाऊन काही खरेदी करणेपर्यंत सुध्दा वेळ नाही आठवड्याच्या शिवाय पण लोक हॅबीटेड आहेत. काम संपवून घरी येता येताच जे दिसते ते खरेदी करतात. म्हणजे आपल्या ज्या इश्यूज आहेत आपण ज्या क्रायसेसमध्ये सापडलेलो आहोत तर त्याला आपल्याला १०० टक्के ओव्हर कम करायचे असेल तर त्याची मास्टर प्लान केली पाहिजे. मोठ्या प्रमाणात अशा अॅक्टीव्हिटी आपल्याकडे व्हिजीटेबल मार्केट, फिश मार्केट, हॉकिंग मार्केट किती आहेत? आपण त्याला कमी पडलो जोपर्यंत आपण हा मास्टर प्लान करुन सगळ नियोजन करणार नाही मग १०० टक्के अॅक्शन प्लान होणार नाही. आज आपण सुप्रीम कोर्टाचा निर्देश आहे जे गरजू पोटभरु लोक आहेत त्यांचे व्यवसाय आहेत ते सुध्दा आम्हाला

प्रोटेक्ट करणे आहे असे नाही की त्याच्यावर कुऱ्हाड चालवून सगळ्यांनाच साफ केले जाईल. त्यांना पहिला अल्टीमेट देणे आपल्याला देणे अपेक्षित आहे.

**निला सोंस :-**

कमिशनर सर उन्ही का ध्यान रखते हुए मार्केट का प्रोव्हिजन किया जा रहा है।

**मा. आयुक्त :-**

अपनी सुचना का दखल लेता हूँ और दो ही रस्ते हम हॉकर्स फ्री करेंगे। जहाँ पे भी हुआ वह तो हम कारवाई करेंगे।

**निला सोंस :-**

जहाँ मार्केट बने हुए है वहाँ की मैं स्थिती आपको बता रही हूँ।

**गिता जैन :-**

साहेब आता मार्केटची गरज दिवसेंदिवस यंगस्टर मला वाटत नाही कोणी मार्केटमध्ये जाऊन खरेदी करतात. ते ऑनलाईन खरेदी करतात. मग ते ऑनलाईन खरेदी करायला त्यांना शाळा पाहिजे मार्केट नको.

**मा. आयुक्त :-**

हा तर मुद्दा तुम्ही मांडलेला मी नोंद केला असे मी म्हटले ना.

**दौलत गजरे :-**

महापौर मॅडम सध्या प्रभाग क्र. १८ मध्ये जे मार्केट बनवले गेले आहेत त्या मार्केटची स्थिती अशी आहे की मी सांगितले होते की १० ते १५ वर्ष जे स्थानिक आहेत. जे धंदे करत आहेत त्यांनाच ते मार्केट दिले जाईल. पण आता त्या मार्केटमध्ये अशी लोक आहेत की ते १०,१५ काय १० दिवस ही कधी धंदा केला नव्हता आणि ते तिथे घुसलेले आहेत. त्यांना अद्यापही काढलेले नाही. मग प्रशासन करते काय? दुसरी गोष्ट जी आता खाऊ गल्ली बनविलेली आहे. त्याच्यामध्ये धंदा चाललेला आहे. तिथे प्रशासन आपले ८० रुपये घेतात आणि दुसरे तिकडून ८-८ हजार रुपये घेतात. लोकांकडून फक्त धंदयावर बसवायचे आणि त्यांना धंदा ही करायचा नाही. फक्त त्यांचे तिथे स्थान बसवायचे आहे की, तुम्ही तिथे कमवा आणि नंतर आम्ही दुसरा तिथे टाकू अशी परिस्थिती आहे. आम्ही १८ नंतरचे नगरसेवक आहोत तर आमचे १८ नंबरचे नगरसेवकांना न विचारता तिथे जर झाले तर कमीत कमी प्रशासनाने आम्हाला विचारात तर घ्या नेमके काय करता येईल काय करता नाही येणार. फक्त आम्ही तिथे नगरसेवक म्हणूनच काम करायचे का? प्रशासन आमचा विचार ही घेत नाही काही कळत नाही. तिसरी गोष्ट आता गेल्या आपल्या महासभेमध्ये असा विषय पास झाला होता की जे शालेयसाठी जे भुखंड आहेत ते कुठल्यातरी ट्रस्टला देऊ शकतो. तसा माझ्याकडे एक प्रस्ताव आलेला आहे आणि मी तो आता प्रस्ताव दिलेला आहे. आजच दिलेला आहे. भक्ती वेदांत इंटरनॅशनल हायस्कूल आहे. त्यांनी तो भुखंड मागितलेला आहे ते ऑलरेडी तिथे चालत आहे. त्यामध्ये कॉमर्स आणि सायन्स अशी संस्था आहे. ती चालत आहे आणि तिला भुखंड म्हणजे बाजूला खेळण्यासाठी काही जागा नाही. तर त्यांनी मागणी केलेली आहे तर तो प्रस्ताव आपण लक्षात घ्यावा त्यांना मिळावे अशी आपणांस विनंती आहे.

**मा. महापौर :-**

ठिक आहे.

**गणेश भोईर :-**

महापौर मॅडम, साहेब मी एक वर्ष, २ वर्ष झाले. मी पत्रव्यवहार करतो मार्केट बद्दल तुम्हाला किती लेटर दिले तुम्हाला मी लास्ट टाईम १९ तारखेला लेटर दिले तुम्हाला आजपर्यंत माझ्याकडे जेवढी पत्रव्यवहार केलेला आहे. त्याचा तुम्हाला सर्व ढिगारा आणून देतो. तुमचा प्रभाग अधिकारी माणूस आहे की जनावर आहे. १० वेळा सांगून समजत नाही. त्यांना मी १० वेळा सांगतो.

**मा. आयुक्त :-**

तिथे चालू केली ना.

**गणेश भोईर :-**

बोलवा प्रभाग अधिकारीला त्यांनी काय केले त्यांना बोलवा. संजय दोंदे.

**मा. आयुक्त :-**

कदाचित ते आज सगळे जण ॲन्टी करप्शनचा जो सप्ता आहे त्याला गेलेले आहेत.

**गणेश भोईर :-**

साहेब त्यांचे रोज काही ना काही चालू असते यांना घरी बसवा.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य ऐकून घ्या. तुमची दखल घेऊन त्याठिकाणी कारवाई सुरु केलेली आहे. अजून त्याला परिणामकारक करण्यासाठी निश्चित त्याठिकाणी कारवाई करु.

**रिटा शहा :-**

मॅडम विषय हमारा भाईंदर पूर्व मौजे नवघर आरक्षण २१९, २२०, २२९ हे मंजुर विकास योजनेत शाळेचे आरक्षण दर्शवलेले आहे. त्यापैकी आरक्षण क्र. २२० प्राथमिक शाळा व मैदान वगळून म्हणजे हे तीन्ही आरक्षण शाळेचे आहेत का? मग त्याच्या मधला एक आरक्षण फक्त शाळेसाठी देतो आणि बाकीचे दोन आरक्षण बाजूबाजूचे आपण ठेवतो ना शाळेसाठी. मग त्यात काय झाले शाळा तर बाजूला आहे.

**मर्लिन डिसा :-**

रिटाजी प्रायमरी सेक्शन और सेकंडरी सेक्शन के लिए अलग अलग होगा।

**मा. महापौर :-**

जिसको में संधी दुंगी वही उठके बोलेगा आप बोलिए।

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम मी ठराव वाचतो. तर तुम्ही आयुक्त साहेब ह्या सभागृहामध्ये हे जे बिल्डींगचे कॉर्नर आहेत त्याठिकाणी पत्राशेड उभारुन मार्केट बसवायचे ठराव झालेला आहे. म्हणजे मार्केट पाहिजेत किती मला अशी भिती वाटते बायबँकचा ठराव झालेला आहे. उदया हे आरक्षण बदल झाल्यानंतर विकासकाला परत आपण देणार आणि त्याठिकाणी मार्केट नव्हता कदाचित जर मॉल उभा राहिला तर आपल्याला आश्चर्य वाटायला नको. **आता मी ठरावाचे वाचन करतो . मिरा भाईंदर महानगरपालिका मा . महासभा दि. ०३/११/२०१८ प्रकरण क्र. १०२, भाईंदर (पूर्व) मौजे नवघर आरक्षण क्र. २१९, २२०, २२९ हे मंजूर विकास योजनेत शाळेचे आरक्षण म्हणून दर्शविलेले आहे . त्यापैकी आरक्षण क्र . २२० प्राथमिक शाळा व मैदान वगळून मार्केट करणेस महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदल करणेस मंजूरी मिळणेकरीता निर्णय घेण्याचा विषय विषयपत्रिकेवर प्रस्तावित केले आहे . परंतु प्रशासनाने सदर विषयी बाबतचा गोषवारा दिलेला नाही . त्याअर्थी प्रशासनाची भुमिका या विषया वर स्पष्ट होत नाही. तरी सदरचा विषय प्रशासनाचा गोषवारा नसल्याचे अभावी फेटाळण्यात येत आहे , असा मी ठराव मांडत आहे.**

**जुबेर इनामदार :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

सचिव महोदय दोन ठराव आलेले आहेत. मतदान घ्या.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १०२ साठी दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्री. धृवकिशोर पाटील, अनुमोदन श्री. मनोज दुबे. दुसरा ठराव सुचक श्री. अनिल सावंत, अनुमोदन श्री. जुबेर इनामदार. प्रथम दुसरा ठराव मी मतदानास पुकारतो. सुचक श्री. अनिल सावंत ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असेल त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक श्री. धृवकिशोर पाटील ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असेल त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. महापौर :-**

सुचक श्री. धृवकिशोर पाटील यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ५४, विरोधात ०८, तटस्थ ०१ इतकी मते पडलेली आहेत. श्री. धृवकिशोर पाटील यांनी मांडलेला ठराव बहुमतांनी मंजूर करण्यांत येत आहे.

**गणेश भोईर :-**

साहेब ३० तारखेला आपली प्रभाग समितीची मिटींग होती.

**संजय दोंदे :-**

हो सर.

**गणेश भोईर :-**

३० तारखेला मी उपोषणाला बसलेलो होतो. याची तुम्हाला कल्पना आहे का?

**संजय दोंदे :-**

हो सर.

**गणेश भोईर :-**

तुम्हाला मी काय प्रॉमीस केले होते. सर्व सभासद पण होते समोरच्या पक्षाचे पण होते. तुम्ही काय आश्वासन दिले?

**संजय दोंदे :-**

कारवाई करतो म्हणून.

**गणेश भोईर :-**

किती दिवस कारवाई केली?

**संजय दोंदे :-**

कारवाई रोज होते.

**गणेश भोईर :-**

कधी केलेली सकाळी करा ना. दुपारी करा. १ ते २ करा ना कारवाई. कारवाईचा टाईमिंग कोणता असतो. ६ ते १० फेरिवाले बसतात. तुम्ही कारवाई कधी करता ४ ते ६. ४ ते ६ दरम्यान कोण असते.

**मा. आयुक्त :-**

कोणत्या वेळेस कारवाई करणे अपेक्षित असते?

**गणेश भोईर :-**

६ ते १०.

**मा. आयुक्त :-**

यांची नोंद घ्या.

**संजय दोंदे :-**

चालेल.

**गणेश भोईर :-**

तुम्ही दुसऱ्या दिवशी कारवाई केली ४ ते ६ मध्ये तिसऱ्या दिवशी कारवाई केली. ४ ते ६ मध्ये नंतर कारवाई पण बंद केली असे का?

**संजय दोंदे :-**

७ च्या नंतर आम्ही पुन्हा कारवाई करु.

**गणेश भोईर :-**

म्हणजे हफ्त्यातून एक दिवस की महिन्यातून एक दिवस.

**संजय दोंदे :-**

सर रेग्युलर कारवाई करतो.

**गणेश भोईर :-**

धन्यवाद.

**प्रकरण क्र. १०२ :-**

**भाईंदर पुर्व मौजे नवघर आरक्षण क्र.२१९,२२०,२२९, हे मंजुर विकास योजनेत शाळेचे आरक्षण म्हणून दर्शविलेले आहे. त्यापैकी आरक्षण क्र २२० प्राथमिक शाळा व मैदान वगळून मार्केट करणेस महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदल करणेस मंजुरी मिळणेबाबत.**

**ठराव क्र. १०१ :-**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) शासन अधिसूचना क्र. टीपीएस-**1296/847/**सीआर-**162/96/**युडी-**12,** दि.**14/05/97** अन्वये मंजूर करण्यात आलेली असून दि **.15/07/97** पासून अंमलात आलेली आहे . वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना क्र . टीपीएस-**1298/941/**सीआर-**89/98/**युडी-**12,** दि.**25/08/2000** अन्वये मंजूर झालेली असून दि **.15/10/2000** पासून अंमलात आलेली आहे . मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र . टिपीएस-**1208/1346/**प्र.क्र.**267/08/**नवि-**12,** दि.**29/08/2009** अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रासाठी मंजूर विकास योजनेत आ .क्र. 220 (प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान) मौजे नवघर / गोडदेव परिसरात दर्शविलेले आहे. मंजूर विकास योजनेनुसार आ.क्र. 220 (प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान ) चे एकूण क्षेत्र 5800 चौ.मी. असून मिरा भाईंदर महानगरपालिकेने विकास हक्क प्रमाणपत्राच्या मोबदल्यात विकासकाने 5723.85 चौ.मी. महानगरपालिकेकडे हस्तांतरीत केलेले आहे.

सदर आ.क्र. 220 (प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान ) या आरक्षणाच्या सभोवताली आ.क्र. 219 (माध्यमिक शाळा व खेळाचे मैदान ), आ.क्र. 223 (प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान ), आ.क्र. 228 (माध्यमिक शाळा व खेळाचे मैदान ), आ.क्र. 229 (प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान ), आ.क्र. 234 (प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान) ही आरक्षणे शाळेसाठी आरक्षित आहेत.

सदर आरक्षणाच्या 1 कि.मी. परिसरामध्ये अनेक प्रसिध्द शाळा असून लोकसंख्येच्या मानाने त्या शाळा पुरेशा आहेत तसेच रस्त्यावर फेरीवाले बसल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे . याबाबत अनेक नगरसेवकांच्या तक्रारी येत आहेत व सभागृहामध्ये याबाबत वारंवार चर्चा होत आहे . सध्या त्याठिकाणी आरक्षण क्र.219, 227, 229 अशी तीन शैक्षणिक आरक्षणे असून त्यापैकी 219 व 229 ही आरक्षणे तशीच ठेवण्यात यावीत.

सदरच्या परिसरातील जनतेची आवश्यकता लक्षात घेता जनतेच्या सोईसाठी आ.क्र. 220 (प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान ) या आरक्षणाचे नाव बदलून मार्केट म्हणून नामाभिदान करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 नुसार फेरबदल करणेस तसेच त्याअनुषंगीक सर्व वैधानिक कार्यवाही पुर्ण करुन अंतिम मंजूरीसाठी प्रस्ताव शासनास सादर करणेसाठी मा . आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना अधिकार देण्यास हि सभा मंजूरी देत आहे.

सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदक :- श्री. मनोज रामनारायण दुबे

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता डिंपल विनोद | १ | मेहरा राजीव ओमप्रकाश | १) जैन गीता भरत |
| २ | वैती चंद्रकांत सिताराम | २ | सावंत अनिल दिवाकर | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | इनामदार जुबेर अब्दुल्ला | |
| ४ | पाटील धृवकिशोर मन्साराम | ४ | शेख रुबीना फिरोझ | |
| ५ | गेहलोत हसमुख मोहनलाल | ५ | डिसा मर्लिन मर्विन | |
| ६ | पाटील प्रभात प्रकाश | ६ | सपार उमा विश्वनाथ | |
| ७ | सिंह मदन उदितनारायण | ७ | परदेशी गिता हरीश | |
| ८ | भानुशाली वर्षा गिरधर | ८ | अहमद साराह अकरम | |
| ९ | यादव मिरादेवी रामलाल | | | |
| १० | शाह रिटा सुभाष | | | |
| ११ | हसनाळे ज्योत्सना जालींदर | | | |
| १२ | गोहिल शानू जोरावर सिंह | | | |
| १३ | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | | | |
| १४ | भोईर सुनिता शशिकांत | | | |
| १५ | पाटील वंदना मंगेश | | | |
| १६ | सोंस नीला बर्नाड | | | |
| १७ | रावल मेघना दिपक | | | |
| १८ | मोकाशी दिपाली आनंदराव | | | |
| १९ | नाईक विविता विवेक | | | |
| २० | भावसार वंदना संजय | | | |
| २१ | बेलानी हेमा राजेश | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २२ | भोईर विणा सुर्यकांत | | | |
| २३ | सोनार सुरेखा प्रकाश | | | |
| २४ | मुखर्जी अनिता बबलू | | | |
| २५ | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | | | |
| २६ | म्हात्रे सचिन केसरीनाथ | | | |
| २७ | म्हात्रे परशुराम पदमाकर | | | |
| २८ | म्हात्रे मोहन गोपाळ | | | |
| २९ | शाह राकेश रतिशचंद्र | | | |
| ३० | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | | | |
| ३१ | तिवारी अशोक सूर्यदेव | | | |
| ३२ | अग्रवाल सुशील गोपीकिशन | | | |
| ३३ | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | | | |
| ३४ | शाह सीमाबेन कमलेश | | | |
| ३५ | रकवी वैशाली गजेंद्र | | | |
| ३६ | कांगणे मीना यशवंत | | | |
| ३७ | परमार हेतल रतिलाल | | | |
| ३८ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ३९ | म्हात्रे विनोद काशिनाथ | | | |
| ४० | म्हात्रे नयना गजानन | | | |
| ४१ | भोईर जयेश भानुदास | | | |
| ४२ | शेट्टी गणेश गोपाळ | | | |
| ४३ | थेराडे संजय अनंत | | | |
| ४४ | राय विजयकुमार सिस्थन नारायण | | | |
| ४५ | जैन राजेंद्र भवरलाल | | | |
| ४६ | विराणी अनिल रावजीभाई | | | |
| ४७ | जैन दिनेश तेजराज | | | |
| ४८ | गजरे दौलत तुकाराम | | | |
| ४९ | मांजरेकर आनंद दत्ताराम | | | |
| ५० | दुबे मनोज रामनारायण | | | |
| ५१ | व्यास रवि वासुदेव | | | |
| ५२ | पांडेय पंकज सूर्यमणि | | | |
| ५३ | भोईर गणेश गजानन | | | |
| ५४ | पारधी सुजाता यशवंत | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव :-

प्रकरण क्र. १०३, **शहरातील विविध पक्षाच्या अनधिकृत कार्यालयांवर कारवाई करणेबाबत.**

**धृवकिशोर पाटील :-**

महापौर मॅडम, मेरी आपसे यह गुजारीश है की, हा विषय आपण पुढच्या सभेत घ्यावा अशी माझी तुम्हाला विनंती आहे. अजून आमची दुसरी एक मिटींग आहे म्हणून माझी तुम्हाला विनंती आहे हा विषय पुढच्या सभेला घ्यावा.

**जुबेर इनामदार :-**

विशेष सभेमध्ये विषय घेताना सचिवांनी सांगावे. विषयाचे काय करावे लागेल निकाल लावावा लागेल.

**अनिल सावंत :-**

ठराव करावा लागेल. निकाल तर लावावाच लागेल. तुम्ही ठराव मांडा.

**धृवकिशोर पाटील :-**

आमची तयारी आहे. आम्ही त्यांना विनंती करतो.

**अनिल सावंत :-**

आमचे अनधिकृत कार्यालये आहेत. कारवाई करु नका असा ठराव मांडा.

**धृवकिशोर पाटील :-**

हा आधी विषय आणला आहे.

**जुबेर इनामदार :-**

नियम काय बोलतो काय करावे लागेल. विशेषतः निकाल लावावा लागेल. विषय असा तुम्हाला ठेवता येत नाही. रद्द करता येत नाही विषय विषयपटलावर आला की आला.

**मा. उपमहापौर :-**

मा. महापौर मॅडम आजच्या जो विषय आपल्या सभागृहासमोर की शहरातील विविध पक्षाच्या अनधिकृत कार्यालयांवरती कारवाई करणेबाबत. हा विषय वास्तवतः आतापर्यंत यायलाच पाहिजे होता. आज विषय आलेला आहे. निश्चित पण एक बाब लक्षात आली. आमची चर्चा चालली होती की, आपल्याला ह्या शहरामध्ये ह्या विषयी एक भुमिका मांडावी लागेल. सदनामध्ये मी सर्व सदस्यांना विनंती करतो की ह्या शहरामध्ये जो न्याय आम्हाला तो सगळ्यांना ह्या दृष्टीकोनातून काम करायचे आहे. म्हणजे विषय तर हटकेशमध्ये एक कार्यालय डांबरी रस्त्यावरती आहे. ही शोकांतिका आहे. गेल्या ७ वर्षापासून ह्या विषयात सातत्याने लोकांनी विरोध दर्शविलेला आहे. पण त्याच्यात २ वर्षापूर्वी त्याच्यात इनोव्हा गाडी घुसली आणि गाडी कव्हर होऊन राहिली ही परिस्थिती आहे. आयुक्त साहेब ह्या विषयामध्ये माझे असे मत आहे की आपल्याकडून ह्या संपूर्ण मिरा भाईंदर क्षेत्रातील सर्व राजकीय पक्षांच्या कार्यालयाचा डाटा कलेक्ट केला पाहिजे. ज्या-ज्या ठिकाणी आपल्याला असे वाटेल की यांना परवानगी देऊ शकतो किंवा त्यांच्या जवळ त्याची कागदपत्र आहेत. मालकी जागा आहे, खरेदी आहे तर त्यांना परवानगी देता येण्याची जर आपल्याला सोय करता येईल. ती पण सोय आपण केली पाहिजे. परंतु अगदीच रस्त्यावरती टाकल्यास आणि त्याचा उपद्रव रहदारीसाठी होतो. वाहतुकीसाठी उपद्रव होतो तर त्यांना आपण निष्काशित करण्याची भुमिका घेतली पाहिजे. परंतु हे करताना सभागृह किंवा आम्ही ह्या ठाम मताचे आहोत की जो न्याय एकाला द्याल तोच न्याय सर्वांना करायचा आहे. तर याचा आपण डाटा कलेक्ट करा. तर आपल्याला हे कारवाई करायला अधिक सोपे राहिल.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर महोदय मी पक्षाचे नाव घेत नाही. काही राजकीय पक्षांनी पत्र दिले की, एका याच्यावर कारवाई न करता शहरात जे काही अनधिकृत करत आहेत रस्ते आर.जी, ओपन स्पेस वर असे राजकीय पक्षांचे जे कार्यालय आहेत. त्याच्यावर सगळ्यांवर कारवाई करावी. एकाच याच्यावर नाही.

**रोहिदास पाटील :-**

आपला साहेब याच्यावर प्रयत्न असा रहावा की, हा ठराव जो होईल हा एक मताचाच करायचा.

**मा. आयुक्त :-**

यामध्ये प्रभाग निहाय सर्व्हे करुन काय वस्तुस्थिती आहे इन्ड्यूज्वल इश्यू ओरेन्टेड त्याची यादी करुन त्याच्याबद्दलचे अभिप्राय सभागृहाला सविस्तर माहिती दिली जाईल. सभागृहात त्याच्यावर एक मताने चर्चा करुन आपण पुढे आम्हाला अधिकार दिला तर अजून शहरामध्ये एक वेगळा मॅसेज जाईल. अशा प्रकारचे निर्णय इतर महापालिकेत झालेत आणि सामुहिक कारवाई सुध्दा झालेल्या आहेत. आपण त्याची सुध्दा माहिती घेऊ शकता.

**रोहिदास पाटील :-**

आम्ही आपणांस अधिकार देतो ना.

**मा. आयुक्त :-**

ठिक आहे. तशी पुढच्या सभेमध्ये याची सविस्तर माहितीसह प्रस्ताव आपल्याकडे सादर करता येईल.

**गिता जैन :-**

साहेब फक्त एकच विचारायचे आहे. कार्यालय सोडा काहीही अनधिकृत जेव्हा तोडायचे असेल तेव्हा महासभेने तुम्हाला अधिकार द्यायचे की तुमचा तो अधिकार आहे.

**मा. आयुक्त :-**

तो आमचाच अधिकार आहे. पण लोक सहभाग लोकांचा विरोध न होता सगळ्यांना सगळ्या पध्दतीने काम होणे ही आज काळाची गरज आहे.

**गिता जैन :-**

फक्त कार्यालये किंवा जे काही अनधिकृत आहे ते सगळच काही तोडणार. काल तुम्ही एक मंदिर तोडले बरोबर आहे इथे एक मंदिर होते अजून बाजूच्या बिल्डींगवाल्यांनी तुम्हाला लेटर दिलेले आहे. मी तुम्हाला विनंती करते अजून देव बसलेले नाहीत. देव बसल्यानंतर जर तुम्ही मंदिर तोडायचा विषय आणि देवाचा अपमान करायचा असेल त्यापेक्षा अजून देव बसले नाही त्या आधी तिथे कारवाई करा. नंतर तुम्ही कारवाई करुन जातात. आणि आमचा देवाचा अपमान होतो कशाला ते जेव्हा होते तेव्हा तुम्हाला कम्पलेंट देऊन सुध्दा तुम्ही त्यावर ॲक्शन घेत नाही आणि मग आमचा देव बसला की तुम्ही तिथे मंदिर तोडायला जातात का?

**मा. आयुक्त :-**

कुठले म्हणत आहात?

**गिता जैन :-**

इथे गिता नगरमध्ये होत आहे ते तुम्हाला एक माणूस त्यासाठी कोर्टात गेला आहे. बिल्डींग वाल्यांनी तुम्हाला त्यांच्या सर्वांच्या हस्ताक्षर सकट लेटर दिलेले आहे. त्यावर कारवाई नाही. गिते साहेबांनी ते थांबवले होते. त्यावर कारवाई नाही.

**मा. आयुक्त :-**

मी त्याच्यावर एम.आर.टी.पी करायला सांगितले. ते थांबवायला सांगितले आहे आणि त्यांनी त्या संस्थेने काहीतरी रेग्युलराईजेशनसाठी आर.जी. मध्ये १० टक्केचा जो प्रस्ताव असतो. त्यामध्ये काहीतरी प्रस्ताव दिल्यानंतर..................

**गिता जैन :-**

साहेब तुम्ही जर प्रस्तावावर कंस्ट्रक्शन करुन देत असाल तर मी असे सगळे प्रस्ताव टाकून कन्स्ट्रक्शन चालू करते.

**मा. आयुक्त :-**

जैन मॅडम यामध्ये ते काम थांबवायला सांगितलेले आहे. त्याच्यावर एम.आर.टी.पी. करण्याचे निर्देश दिलेले आहेत. पोलिस केस करण्याचे आणि जो प्रस्ताव आलेला आहे त्याच्यावर सुध्दा तत्काळ निकाल देण्यात येईल.

**गिता जैन :-**

साहेब ते थांबवायचा नाही थांबवायचा तुमचा निर्णय आहे. माझी फक्त एकच विनंती आहे.

**मा. आयुक्त :-**

ते नियमात बसत असेल तर ते सुध्दा आणून देऊ.

**गिता जैन :-**

देव बसल्यावर तिथे जर पुजा चालू झाली तुम्ही ते मंदिर तोडतात आणि हे तुम्ही होऊ देणार आणि त्यानंतर २ वर्षांनी परत ते तोडायला येणार कशाला ते एकदा ठरवून घ्या ना की हे अधिकृत अनधिकृत आहे.

**मा. आयुक्त :-**

ठिक आहे आपण कारवाई करु.

**धृवकिशोर पाटील :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत असलेले विविध राजकीय पक्षांचे अनधिकृत कार्यालयांवर कारवाई करणेबाबत प्रशासनाने सविस्तर माहिती घेवून विषय पुढील सभेत सादर करावा असा ठराव मांडत आहे.**

**रवि व्यास :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

प्रकरण क्र. १०३ :-

**शहरातील विविध पक्षाच्या अनधिकृत कार्यालयांवर कारवाई करणेबाबत.**

**ठराव क्र. १०२ :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत असलेले विविध राजकीय पक्षांचे अनधिकृत कार्यालयांवर कारवाई करणेबाबत प्रशासनाने सविस्तर माहिती घेवून विषय पुढील सभेत सादर करावा असा ठराव मांडत आहे.**

**सुचक :- श्री. धृवकिशोर पाटील अनुमोदक :- श्री. रवि व्यास**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**रोहिदास पाटील :-**

महापौर मॅडम आयुक्त साहेब मी दोन लोकांचा शोकप्रस्ताव मांडत आहे. मिरा भाईंदर शहरामध्ये स्व. श्री. हरिश्चंद्र नारायण पाटील यांचे निधन झालेले आहे. हरिश्चंद्र नारायण पाटील बद्दल ह्या सभागृहात दोन शब्द बोलणे गरजेचे आहे. ज्यावेळी ग्रामपंचायत काळामध्ये नवघर, खारी, गोडदेव, बंदरवाडी अशी चार पूर्वीची गावे त्याच्यात एक पाटील कुटुंब म्हणून सधन कुटूंब होते. यांच्या औद्योगिक वसाहतीत संबंध होता. ग्रँट रोड वर कारखाना चालायचा आणि त्यांची जिद्द होती की आपण ज्या ठिकाणी आहोत त्याठिकाणी हा कारखाना औद्योगिक क्षेत्र व्हायला पाहिजे. ज्यावेळी लाईट नव्हती त्यावेळी त्यांनी जनरेटरवर इथे त्यांचे स्वतःचा कारखाना चालू केला. योगायोगाने शहर वाढले त्यांचा ही कारखाना वाढला. त्याठिकाणी अनेक कारखाने आले. ते एक झाले तसेच जसे आपण म्हणतो की सगळ्यांची तळमळ आहे सभागृहाची की ह्या शहरामध्ये शैक्षणिक क्रांती होणे गरजेचे आहे. तर जे पूर्वीच्या पश्चिमेच्या भाईंदर सेकंडरी स्कुलचे डायरेक्टर होते त्यांनी आणि प्रफुल्ल पाटलांनी भाईंदर पूर्वेकडे अभिनव विद्या मंदिर, अभिनव शेतकरी शिक्षण मंडळ स्थापन करुन अभिनव विद्या मंदिर सुरु केले. आज त्याठिकाणी १५-१६ हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत आणि अनेक सामाजिक धार्मिक कामामध्ये शेट हरिश्चंद्र नारायण पाटील यांचा सहभाग होता. त्यांचे दुःखद निधन झालेले आहे. त्याचबरोबर गोडदेव गावातील नंदकुमार महादेव पाटील हे उद्योजक दानशुर, व्यक्ती त्यांचेही निधन झालेले आहे. त्या दोघांच्यासाठी अन्य कोणी असतील त्यांची ही नाव सांगावी ह्या ठिकाणी मी शोकप्रस्ताव मांडत आहे. नसतील तर दोन मिनिटांसाठी सर्वांनी उभे रहावे.

**दुख:वठा ठराव क्र. १०३ :-**

मिरा भाईंदर शहरामध्ये स्व. श्री. हरिश्चंद्र नारायण पाटील यांचे निधन झालेले आहे. हरिश्चंद्र नारायण पाटील बद्दल ह्या सभागृहात दोन शब्द बोलणे गरजेचे आहे. ज्यावेळी ग्रामपंचायत काळामध्ये नवघर, खारी, गोडदेव, बंदरवाडी अशी चार पूर्वीची गावे त्याच्यात एक पाटील कुटुंब म्हणून सधन कुटूंब होते. यांच्या औद्योगिक वसाहतीत संबंध होता. ग्रँट रोड वर कारखाना चालायचा आणि त्यांची जिद्द होती की आपण ज्या ठिकाणी आहोत त्याठिकाणी हा कारखाना औद्योगिक क्षेत्र व्हायला पाहिजे. ज्यावेळी लाईट नव्हती त्यावेळी त्यांनी जनरेटरवर इथे त्यांचे स्वतःचा कारखाना चालू केला. योगायोगाने शहर वाढले त्यांचा ही कारखाना वाढला. त्याठिकाणी अनेक कारखाने आले. ते एक झाले तसेच जसे आपण म्हणतो

की सगळ्यांची तळमळ आहे सभागृहाची की ह्या शहरामध्ये शैक्षणिक क्रांती होणे गरजेचे आहे. तर जे पूर्वीच्या पश्चिमेच्या भाईंदर सेकंडरी स्कुलचे डायरेक्टर होते त्यांनी आणि प्रफुल्ल पाटलांनी भाईंदर पूर्वेकडे अभिनव विद्या मंदिर, अभिनव शेतकरी शिक्षण मंडळ स्थापन करुन अभिनव विद्या मंदिर सुरु केले. आज त्याठिकाणी १५-१६ हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत आणि अनेक सामाजिक धार्मिक कामामध्ये शेट हरिश्चंद्र नारायण पाटील यांचा सहभाग होता. त्यांचे दुःखद निधन झालेले आहे. त्याचबरोबर गोडदेव गावातील नंदकुमार महादेव पाटील हे उद्योजक दानशुर, व्यक्ती त्यांचेही निधन झालेले आहे. ह्या ठिकाणी दोघांच्यासाठी मी शोकप्रस्ताव मांडत आहे.

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील** **अनुमोदक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

**आजची सभा संपली असे मी जाहिर करते.**

(सभा संपल्याची वेळ दु. २.३५ वाजता)

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका